आंतरभारतीय पुस्तकमाला

सेतु

सेतू

द्विवेदुल विशालाक्षी

अनुवाद

गिरिजा कीर

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली

1977 (शके 1899)

~~1976 (शके 1898)~~

Original title : *Varadhi* (Telugu)
Marathi translation : *Setu*

मूल्य : रु. 6.75

वितरक
पॉप्युलर प्रकाशन
35 सी, ताडदेव रोड, मुंबई 400034

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया,
ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली 110016
मुद्रक : मु. शं. किर्लोस्कर, किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकर नगर, पुणे 411009

भूमिका

सामान्यत: गेल्या शंभर एक वर्षांपासून तेलुगू कादंबरी, तेलुगू लोकांचे जीवन प्रकट करीत आहे. स्वर्गस्थ श्री. कंदुकूटि वीरेशलिंगम पंतुलुजी हे, तेलुगू साहित्यातील नवयुगाचे प्रणेते समजले जातात. राजा राममोहन राय यांच्याप्रमाणेच, वीरेशलिंगम हे समाज-सुधारक होते. साहित्याच्या माध्यमातून तेलुगू समाजात आधुनिक विचार प्रवाहांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी अविश्रान्त परिश्रम केले. याच उद्दिष्टाने त्यांनी पहिली कादंबरी लिहिली. तिचे नाव होते-- 'राजशेखर चरित्रमु' (1878). साहित्यिक दृष्टीने ही पहिली महत्त्वपूर्ण तेलुगू कादंबरी. इंग्रजी शिक्षणामुळे गाव आणि शहर यांतील रूढिवादी, पारंपरिक विचार नष्ट होतील व जनसामान्यांना नवी दृष्टी येईल असे समजले जात होते. ह्या कार्याकरिता त्यांनी कादंबरी हाताशी धरली. 1894 मध्ये, 'रामचंद्र विजयमु' ही दुसरी महत्त्वपूर्ण तेलुगू कादंबरी प्रकाशित झाली. स्व. चिलक मूर्ति लक्ष्मी नरसिंहम पंतुलु यांनी ती लिहिली होती. ते वीरेशलिंगम यांचे अनुयायी होते. इंग्रजीच्या अध्ययनामुळे एका गरीब ब्राह्मणाची कशी उन्नती होते, याचे चित्रण त्या कादंबरीत केलेले होते.

1925–33 च्या दरम्यान, सामाजिक दृष्टिकोनात बदल घडला. त्या वेळेपर्यंत राष्ट्रीय आंदोलन गतिमान झाले होते आणि देशात आर्थिक समस्या निर्माण झाल्यामुळे, लोकांच्या मनावरून इंग्रजीचा पगडा हलके हलके कमी होत होता. देशात बेकारी वाढली, इंग्रजी शिकलेल्या लोकांना उदरनिर्वाह करणे कठीण जाऊ लागले,

या स्थितीचे वर्णन, कुटुंब रावजीच्या चदुवु (शिक्षण) या कादंबरीत करण्यात आले आहे. खेड्यांना पुनर्जीवन, अस्पृश्यांचा प्रश्न, इत्यादींकडे लोकांचे लक्ष जाऊ लागले होते. याच सुमारास उन्नव लक्ष्मी नारायण पंतुलु यांची 'मालपल्लि' प्रकाशात आली. त्यात गांधीवादाचे चित्रण होते. तेलुगू कादंबरीमध्ये 'मालपल्लि'चे स्थान महत्त्वाचे आहे.

राष्ट्रीयतेच्या प्रचारामुळे भारत व पाश्चिमात्य राष्ट्रे यांच्या सामाजिक आचाराविचारांत जो फरक होता, तो लोकांना कळू लागला आणि त्याच काळात 1934 मध्ये श्री. विश्वनाथ सत्यनारायण यांची 'वेयिपडगलु' (सहस्रफणी) ही कादंबरी प्रसिद्ध झाली. तेलुगू साहित्याच्या इतिहासातील ही सर्वांत महत्त्वाची कादंबरी. इंग्रजी शिक्षणाच्याद्वारे, पाश्चिमात्य विचारांचे भारतातील आगमन आणि त्यामुळे आलेली भारतीय आचारविचारांची नष्टप्रायता, यांचे या कादंबरीत चित्रण झालेले आहे. त्याच काळात, श्री. सत्यनारायणांचे समकालीन, चलम यांनी, 'दैव मिधिन भार्या' (देवानं दिलेली बायको) (1923), 'अरुणा' (1935) आणि 'जीवितादर्शन' (1948), अशा तीन कादंबऱ्या लिहिल्या. वीरेशलिंगम यांचे अनुयायी असलेले चलम, सुधारणावादी दृष्टिकोनात आपल्या गुरूच्याही चार पावले पुढे सरकले. त्यांनी प्रस्थापित विवाहव्यवस्थेवरच प्रहार केला.

1940 च्या नंतर, तेलुगू कादंबरीवर मार्क्सवाद, साम्यवाद, फ्राइडकृत मनोविश्लेषण यांचा प्रभाव पडला. स्व. गोपीचंद, श्री. राचकोंड विश्वनाथशास्त्री, श्री. व्ही. कृष्णराव, बुच्चिबाबू उर्फ राममोहन राव यांच्या कादंबऱ्या, उदाहरणादाखल घेता येतील. एवढे मात्र निश्चित की, इंग्रजी साहित्याच्या अभ्यासामुळे तेलुगू साहित्याचा विश्वसाहित्याशी परिचय झाला. तेलुगू कादंबरीत नावीन्य आले व तिच्या कक्षा रुंदावल्या. जागतिक युद्धानंतर, विश्वसाहित्यात स्वच्छंदतावाद कमी होत गेला असे म्हणण्यास हरकत नाही. युद्धोत्तर निर्माण झालेल्या नैराश्यामुळेच नव्हे तर, मार्क्सवाद, फ्राइड्चे तत्त्वज्ञान यांनीही ही सामाजिक शिथिलता निर्माण करण्यास भरपूर हातभार लावला. 1940 मध्ये तेलुगू कादंबरी-क्षेत्रात नवयुगाचा प्रारंभ झाला आणि 1947 पर्यंत त्याने अंतिम सीमा गाठली. कादंबरीत ग्रामीण व नागरी संस्कृतींच्या संघर्षाचे चित्रण कमी होऊ लागले आणि व्यक्तीच्या मनात जो संघर्ष चाललेला असतो, त्याचे चित्रण होऊ लागले. अस्तित्ववाद, त्याचप्रमाणे प्रत्याख्यानवाद यांनी कादंबरीत मूळ धरले. त्यामुळेच कादंबरीतून नैतिक समस्यांचेही चित्रण होऊ लागले. तेलुगू कादंबरीचा हा पूर्वरंग होय.

आज तेलुगूत कित्येक कादंबऱ्या लिहिल्या जात आहेत, प्रकाशित केल्या जात आहेत. हे लेखन एवढ्या विपुलतेने होत आहे की, त्यांचे परिशीलन करून मानवी जीवनाचे सम्यक् अध्ययन करणे ही गोष्ट अवघड होऊन बसली आहे. आजकालच्या कादंबरीत, समकालीन जीवनाची एक समस्या– एक संघर्षकारण नजरेसमोर ठेवून परिवाराचे जीवन पहाण्याचा – पारखण्याचा प्रयत्न होत आहे. सिनेमाच्या प्रभावामुळे काही विसंगत गोष्टींचे, घटनांचे विपुल चित्रण होत आहे– त्याच्या तपशिलात मी जात नाही. तेलुगूमध्ये एक गोष्ट मात्र विस्मयकारक आहे– कादंबरी लेखिकांची संख्या दिवसेंदिवस वाढती आहे, ही काही कमी आनंदाची गोष्ट नव्हे.

शंभर वर्षे चालत आलेल्या परंपरांचा, प्रवृत्तींचा तेलुगू कादंबरीवर प्रभाव असणे अगदी स्वाभाविक आहे. तेलुगू कादंबरी क्षेत्रात प्रारंभी प्रबोध, नंतर काव्य आणि तदनंतर मनोवगाहन यांचे राज्य राहिले आहे. आजच्या तेलुगू कादंबरीत यांतील एखादी तरी गोष्ट असतेच आणि ती वास्तवाच्या कसोटीवर पारखून पाहिल्यास खरी ठरते.

श्रीमती विशालाक्षी यांच्या कादंबरीत प्रबोधन नाही, मनाचे चित्रण आहे. परंतु ते केवळ विश्लेषणात्मक नाही; ते थेट काळजाला हात घालते. या कहाणीतून कित्येक गोष्टी स्पष्टपणाने सूचित होतात.

या कादंबरीत, ग्रामीण व नागर जीवनांमधील संघर्षाचे चित्रण आहे. त्याचबरोबर, बाल्यावस्थेतून यौवनात पदार्पण करणारी व्यक्ती 'मोठी' होते– अशा व्यक्तीच्या प्रगतीची समस्या उभी केली आहे. नियतीच्या प्रभावाने निर्माण झालेले सुखदुःख, जीवित व मृत यांच्यातील मायेचे धागे, माया व द्रव्य यांच्यातील विषमता या समस्यांचेही त्यात चित्रण आहे. जीवनाच्या निरनिराळ्या हेतूंमध्ये आणि आदर्श विचारांमध्ये सेतू बांधता येईल किंवा नाही, आणि असा सेतू उभारण्याकरिता काय करावे लागेल, हे समजून घेण्याची व त्यावर विचार करण्याची संधी या कादंबरीच्या वाचकांना देण्यात आली आहे.

आज शहरांत, वरदराजूसारखी कितीतरी मुले शिकत आहेत. शहरी शिक्षण घेतलेली माणसे शेतीसारख्या कामांकरिता गावी जातात. गावाच्या बाजूलाच शहर आहे, शहराला लागूनच गाव आहे. पण या दोघांना वेगळे करते नदी ! ती सतत वाहातच असते. गावांची शहरांशी गाठ घालून देण्याकरिता नदीवर सेतू–पूल असतो. हा पूल म्हणतो, 'दोघांची भेट घालून देणं हे माझं काम आहे. त्यांच्या मीलनाचं साधन झालो तर ठीकच आहे.' आधुनिक शिक्षण हेदेखील त्यांची भेट घालून देण्याचं एक साधन आहे. यामुळेच तर राघवय्यांच्या मुलीबरोबर, वरद-

राजूचे लग्न होऊ शकले. पण, केवळ तेवढ्यामुळे त्या दोन कुटुंबांत एकोपा निर्माण झाला नाही. वरदराजूचे शिक्षण, ती सेतूची भूमिका बजावू शकले नाही असे म्हणणे भाग आहे. त्याकरिता आणखी काही तरी आवश्यक होते. वरदराजूचा जुना मित्र– नावाडी– त्याला नदीपार नेतो. शिक्षित वरदराजू आणि अशिक्षित जोगडु, दोघे स्नेहबंधनाने एकत्र येतात. ते बंधन प्रेमाचे आहे, माणुसकीचे आहे. तेच प्रेम व तीच माणुसकीची भावना 'सेतू' होते. इथेच कादंबरी संपली आहे.

वरदराजू शिकत असताना मीनाक्षीने त्याला दिलेली कठोर वागणूक हृदयाला स्पर्श करते. मीनाक्षीच्या तशा वर्तनामुळे वरदराजूची वहिनीविषयीची भावना बदलते, राजूला वाटत असतं– 'वहिनीला माझं सुख नकोय, माझा आनंद नकोय... तिला फक्त पैसा हवाय ! मी खूपखूप शिकावं, नोकरी करावी, पैसे मिळवावेत आणि ते वहिनीला द्यावेत. तिला हेच हवं आहे !' परंतु, मीनाक्षी अचल राहते. तिला वरदराजूचे दुःख समजत असते. पण त्याचा भावी काळ नजरेसमोर ठेवून ती कठोर होत रहाते. मीनाक्षीच्या मनात स्वार्थी उद्देश नाहीच; राजूचे हित, हेच तिचे लक्ष्य आहे. राघवय्यांचा स्वभाव नेमका या विरुद्ध आहे. ते वरदराजूला मोकळं सोडू इच्छित नाहीत. वरदराजूच्या पायांत त्यांना सोनेरी शृंखला बांधायच्या आहेत. आपल्या लोकांसाठी काहीही करू न शकणाऱ्या वरदराजूची असहायता, दुःख पाहूनही ते त्याला मदत करीत नाहीत. त्यांना वाटतं –एका जागेचं रोपटं दुसरीकडे लावलं की काही दिवस ते मलूल दिसणारच ! मीनाक्षीच्या परिवारातून राजूला दूर काढण्याच्या उद्देशाने नवदांपत्याला परदेशी पाठवायचा यत्न ते करतात. मीनाक्षी आणि राघवय्या– दोघांनाही राजूचे चांगले व्हायला हवे आहे यात संदेह नाही. पण दोघांचे मार्ग वेगवेगळे आहेत – ते कादंबरीत व्यवस्थित चित्रित केले आहेत. या दोघांच्या संघर्षात राजू भरडला जातो, मानसिक दुःखाचा भार वाहतो. मीनाक्षीचे वागणे स्वाभाविक वाटते. कल तिच्याकडेच विशेष रहातो. लेखिकेने मीनाक्षीची तुलना पक्षिणीशी केली आहे, आणि राघवय्यांची माळ्याशी.

पूर्णच्या मृत्यूच्या दिवशी खूप पाऊस पडतो. अनुराधेच्या मृत्यूच्या दिवशी नुसता पाऊसच पडत नाही, नदीला पूरही येतो. पूल कोसळणे, मरणसमयी अनुराधेची वरदराजूशी भेट न होणे ही नियतीची कठोर चेष्टा आहे. गरीब वरदराजूने श्रीमंत होणे आणि अनुराधेच्या मृत्यूनंतर पूर्ववत गरीब होणे ही विधात्याची अगाध लीला होय ! एकदा राजू अनुराधेला म्हणतो– 'राधा, हे सगळं एखाद्या सुखस्वप्नासारखं आहे. डोळे उघडायला भय वाटतं. वाटतं, हे सारं स्वप्न मिटून जाईल !' राधा म्हणते, 'सुखानं फुलून जायचं नि संकटांनी दुःखी व्हायचं, हे

ठीक नाही. आपले पाय नेहमी जमिनीला राहतील याकरिता आपण प्रयत्नशील राहिलं पाहिजे. राजू ! वाऱ्यासमोर मान झुकवून नेहमी दृढ राहणाऱ्या लव्हाळ्या- सारखं आपण दृढ राहायला हवं !' या वाक्यांत कादंबरीचे अवघे सार आहे.

गाव आणि शहर यांच्या दरम्यान सेतू उभारण्याच्या कल्पनेने, लेखिकेने वाचकांच्या विचारांना नवी चालना दिली आहे.

जोगडु म्हणतो– 'राजू, तुझा पैसा पाहून मी तुला नदीपार नेलं असं वाटतं तुला ? शहरी माणसं, साऱ्या गोष्टी पैशांनी विकत घ्यायला बघतात. ती मोठी चूक आहे त्यांची.' शिवय्या आणि राघवय्या या दोघांनाही द्रव्याचा लोभ सोडून या समस्येवर तोडगा काढता आला नाही. राघवय्याचे लक्ष स्वार्थाकडे आहे, तर शिवय्या स्वाभिमानाला महत्त्व देतो. या ओढाताणीत बिचारी प्रेमाची वेल सुकल्यासारखी होते. मानवतेची भावनाच लोपून जाते. या लोपभावनेतच पूर्णा व अनुराधा यांचाही अंत दर्शविला आहे. राघवय्या आणि शिवय्या हे दोघेही, अनुराधा आणि पूर्णा यांच्या रूपाने माणुसकीच गमावून बसतात. माणुसकी व पैसा याच्यात सामंजस्य आणणे शक्य असते, परंतु, माणसे पैशाला अधिक प्राधान्य देतात. त्यामुळे सामाजिक जीवनाचा अंत होतो. कादंबरीला हे सत्य दाखवून द्यावयाचे आहे.

अनुराग, प्रेम मृत्यूने संपत नाही. 'जन्मान्त सौहृदानि' प्रमाणे प्रेम, अनुराग यांचा पुन्हा पुन्हा पुनर्जन्म होत असतो. तो एक नाजूक भावबंध असतो– त्याची पुनरावृत्ती होतेच. अन्नपूर्णा आणि मीनाक्षी या दोघा सासूसुनांची वागणूक कधीच तशी झाली नाही. त्या एकमेकीत जणू मिसळल्या होत्या. अन्नपूर्णेच्या पुत्राला मीनाक्षीने कधी दीर मानले नाही. स्वतःचा मुलगाच मानले. मीनाक्षीला मूलबाळ नव्हते, म्हणून गावाने तिची हरतऱ्हेने हेटाळणी केली होती. काही भगिनींनी सल्ला दिला होता– 'तू सासूला नवस बोल. सासूला वाटतंय की तुला पोर झालंच तर तू तिच्या मुलाचा नीट सांभाळ करणार नाहीस.' मीनाक्षी तसे करते. पूर्णा जन्मास येते. अन्नपूर्णेचे नाव पूर्णा ठेवले जाते. अन्नपूर्णा व वरदराजू ह्या दोन्ही वात्सल्य- मूर्ती आहेत. लग्नानंतर वरदराजूबरोबर शहरात राहून शिकावे असे पूर्णेला वाटत असते. मुलगी अत्यवस्थ असते. मृत्युशय्येवर पडते, तेव्हाही मीनाक्षीला एक विचार जाणवत राहतो– छोट्या पूर्णेचा चेहरा म्हणजे मोठ्या अन्नपूर्णेच्या चेहऱ्यासारखाच असतो. मीनाक्षीला त्याचेच भय वाटते, ती ओरडते. अखेरीस मीनाक्षीला तिची चूक उमगते. ती म्हणते– 'माझी सासू मला सोडू शकली नाही, म्हणून तर ती माझ्या पोटी जन्माला आली. म्हणूनच तर छोट्या पूर्णेला वरद एवढा हवासा वाटतो. तिनं मुलाचं लग्न बघितलंय. काम संपलं तशी निघून गेलीय !' देह नष्ट झाला तरी

भावना नाहीशा होत नाहीत, ही एक श्रद्धा आहे. या श्रद्धेवरच तर समाजाचे अस्तित्व असते. या श्रद्धेनेच त्याला कधी दुःखही भोगावे लागते.

'मीनाक्षीनं मायेनं वाढवलं, राघवय्यांनी शिकवलं, मोठं केलं. मी कोणाचा आहे? शिवय्याचा भाऊ आहे की राघवय्यांचा जावई?' वरदराजूची व्यक्तिगत समस्या धार्मिक समस्येसारखी बनली. या समस्येचे निराकरण, शिक्षण किंवा पैशाचा विचार करून होत नाही. जीवनाच्या अनुभवांतूनच मार्ग शोधता येतो. मनाचा निर्धार होण्यापूर्वीच तो एकाकी झाला. अखेरीस राजूला राधेच्या उद्गारांचे स्मरण होते, 'राजू, पाय जमिनीवरच राहायला हवेत रे! नियतीच्या कठोर आघातांसमोर मान वाकवता कामा नये..' शेवटी राजू निर्धार करतो– 'राधा, मी तुझी आज्ञा पाळीन!'

तो नदीच्या बाजूला गेला...

सूर्य विचारू लागला, 'तू कोण आहेस? शिवय्यांचा भाऊ की राघवय्यांचा जावई?'

वरदराजूच्या मनात नेमका हाच प्रश्न होता.

जोगडूनेही तोच प्रश्न विचारला.

'मी वरदराजू आहे, मी वरदराजू आहे–' हे राजूचे उत्तर होते.

'न वा रे जायायै कामाय जाया प्रिया भवति....

आत्मनस्तु कामाय जाया प्रिया भवति ।

...आत्मनि बलवते दृष्टे...इदं सर्वं विदितम्...'

हे उपनिषदातील वाक्य आहे.

हाच 'सेतू' साहित्यिक दृष्टीने एक सुंदर कलाकृती आहे.

–आर. एस. सुदर्शनम.

1

घण घण घंटानाद करत बैलगाडी दारासमोर येऊन उभी राहिली. शिवय्या घरातून बाहेर आले. बैल माना हलवत होते. असं वाटत होतं की बैलांना पोटभर 'दाणे' खाऊ घातलेत. बैलांच्या गळ्यातले काळ्या चामड्याच्या पट्टीवर शिवलेले मोठमोठे घुंगुर उन्हात चमकत होते.

अप्पण्णांनी नवी बैलजोडी घेतली होती. बैलजोडी रस्त्यानं चालायला लागली, की वाटायचं ही मोटारीशी स्पर्धा करू शकेल. रामुलू मनाशीच विचार करीत होता.

"आली का गाडी ? मी गाडीचाच विचार करीत होतो. कालच अप्पण्णा सांगत होते – आज सकाळी आमची गाडी शहरात जाणार आहे म्हणून" – शिवय्या म्हणाले.

"बैल नवे आहेत. पेंड दाणे खाऊ घालता घालता जरा उशीर झाला. ही सगळी कामं मी स्वतः करतो म्हणून तर बैल माझं ऐकतात." रामुलू म्हणाला. रामुलू अप्पण्णांचा नोकर होता. गाडी हाकणं हे त्याचं काम होतं.

"काही सामान असलं तर त्या पोत्यांवर ठेवा. वरदराजू बाबू माझ्याजवळ बसतील. ही पोती वाण्याच्या घरी पोचवून मला शहरातून लवकर गावी परतायचंय. लवकर आटपा." रामुलू घाई करू लागला.

"राजू, मीनाक्षी, आटपा लवकर. गाडी उभी आहे." शिवय्या ओरडले.

"हे आलोच," म्हणत वरदराजू जुनी लोखंडी पेटी घेऊन आला आणि मीनाक्षी जुन्या सतरंजीची वळकटी घेऊन बाहेर आली.

पेटी आणि वळकटी पोत्यांवर ठेवून वरदराजू चाकावरून गाडीत चढला आणि रामुलूशेजारी बसला.

"बाबू, नीट बसा. दांडा धरा." मीनाक्षीनं खालून सूचना दिली.

"राजू कधी गाडीत बसला नाहीच वाटतं ! असं काय शिकवतेयस तू ?"

शिवय्याने मीनाक्षीची टर उडवली.

" तरीपण बैल नवे आहेत. आपल्याला सावध राहायलाच हवं . . ."

" काही काळजी करू नका ताई, राजूबाबूंना मी सुरक्षित शहरात पोचवीन. " रामुलूनं आश्वासन दिलं.

गाडी चालू लागली. वरदराजूनं भावाकडं आणि वहिनीकडं भरल्या डोळ्यांनी पाहिलं. भावाला विचारलं, " तुम्ही रविवारी नक्की याल ना ? "

" नक्की येईन. काही कारणानं मी येऊ शकलो नाही तर तू घाबरून जाऊ नकोस. आता तू मोठा व्हायला लागलायस. एकट्यानं राहायची तुला सवय करायला हवी. तिकडे हॉस्टेलमधे तुझ्या वयाची कितीतरी मुलं असतील. त्यांच्यात मिळून-मिसळून राहायला हवं " गाडी बरोबर चालता चालता शिवय्या उपदेश करू लागले.

रामुलूनं बैल हाकले. बैल धावू लागले.

" वहिनी, येतो. "

" घाबरू नकोस राजू. शहरात आपल्या गावचे लोक जात येत असतात. काही लागलं सवरलं तर निरोप पाठव. "

घंटांच्या नादात बोलणं अस्पष्ट झालं. बैलगाडी गाव सोडून शेताडीत शिरली. राजू मागे वळून गावाकडे पाहात होता. जसजशी गावातली घरं दृष्टिआड होऊ लागली तसतसे त्याचे डोळे आसवांनी भरून आले. त्याला एकदम रडू कोसळलं.

" राजूबाबू ! हे तुम्ही काय चालवलंय ? छी : छी: ! तुम्ही काही सासरी जाणारी मुलगी नाही आहात. रडताय काय ? आणि ते शहर तरी गावापासनं कितीसं लांब आहे ? पुलापलीकडं दहा पावलं गेलं की शहर ! " रामुलूनं धीर दिला.

रुमालानं डोळे पुसून राजूनं शेतांकडे पाहिलं. हरभऱ्याची शेतं हिरवा गालिचा पसरावा तशी दिसत होती. तिथेच अप्पण्णांची आमराई होती. काही लोक टोपल्यातून काही भाज्या घेऊन शेतातून शहराकडे चालले होते. तेही गाडीजवळ येऊन रामुलूला विचारू लागले– हीच का अप्पण्णानी घेतलेली नवी बैलजोडी ? केवढे आहेत हे बैल ! गाडीत काय आहे ? कोणत्या वाण्याकडे पोती पोचवायची आहेत ?

रामुलू उत्तरं देत देत गाडी हाकत राहिला. पाऊलवाट आणि हमरस्ता यात अंतर पडायला लागलं तशी थोडा वेळ चढ्या आवाजात बोलणं चाललं. नंतर ऐकायला त्रास पडायला लागला, तशी ही प्रश्नोत्तरं बंद पडली. राजूला वाटलं, संध्याकाळी किंवा रात्री राममंदिरात जेव्हा हे सगळे लोक भेटतील तेव्हा या सगळ्या गप्पा मारल्या तर नाही का चालायचं ? आताच एवढं कशाला ओरडायला हवं ?

रामुलूनं बैलांच्या शेपटचा पिरगळल्या. बैल धावू लागले. गाडी जवळजवळ पुलाशी पोचली. शेतामधल्या पाऊलवाटेनं आलं तर पूल गावापासून मैलभराच्या अंतरावर आहे. पण गाडीरस्त्यानं आलं तर तीन मैल अंतर होतं. म्हणून लोक बहुधा पाऊलवाटेनंच शहरात जात. काही सामान न्यायचं असलं तरच गाडीचा उपयोग करीत आणि गाडीरस्त्यानं जात. खेडं असल्याकारणानं कोणाची गाडी कोणत्या वारी शहरात जाते हे गावात सर्वांना ठाऊक असायचं. 'तुमच्या गाडीत जागा आहे का? गुळाच्या दोन ढेपा शहरात न्याल का?' 'मिरचीचं एकच पोतं आहे, अमक्या-तमक्या दुकानात पोचवायचं आहे.' असं म्हणत लोक नेहमी गाडीवाल्यांची मदत मागत असत.

अशाच तऱ्हेनं जेव्हा शिवय्यांना कळलं की अप्पण्णांची गाडी शहरात जातेय, तेव्हा त्यांनी राजूला शहरात पोचवण्याची गोष्ट काढली.

अप्पण्णांनाही खूप आनंद झाला. ते म्हणाले, "जरूर घेऊन जाईन. आपल्या गावचा एक मुलगा कॉलेजात शिकतोय ही गोष्ट आपल्या गावाला गौरवास्पद आहे."

पण गाडीत इतकं सामान होतं की बिचाऱ्या राजूला बसायला जागाच नव्हती. म्हणूनच राजूला रामुलूशेजारी बसावं लागलं.

तोंडावर ऊन येत होतं म्हणून हात आडवा धरून राजूनं पुलाकडे नजर टाकली. उंच पुलाखालून पाण्याची बारीक धार वाहात होती. वर्षातून आठ महिने त्या नदीची हीच परिस्थिती असे. गावातल्या स्त्रिया वाळूत झरे खोदून पिण्याचं पाणी भरत. शिवय्यांच्या गावात काही विहिरी होत्या. पण त्यांचं पाणी खारं होतं. त्यामुळं त्याचा स्वयंपाकाला व पिण्याला उपयोग नव्हता.

पावसाळ्यात नदी काठोकाठ भरे, पण जितक्या लवकर भरे तितक्याच लवकर रिकामीही होई. इतक्या बारीक धारेच्या नदीवर एवढा मोठा पूल का बांधला हे राजूच्या लक्षात येत नव्हतं. पण त्याला असं कळलं की, या नदीला तीन-चार वेळा इतका मोठा पूर आला होता की पुलावरनं पाणी वाहू लागलं. पूल जर एवढा मोठा नसता तर पुरानं वाहून गेला असता.

गाडी पुलावरून चढत होती. राजूला वाटलं, कोणीतरी आपल्याला हाक मारतंय. त्याला शंका आली, वहिनी तर नसेल? गाडीतून मागे पाहिलं तर एकदम गाडीच्या दांड्यावर तोंड आपटलं. दुखायला लागलं तशी राजूनं तोंड हातानं दाबलं. रक्त यायला लागलं म्हणून रुमालानं दाबून धरलं. रामुलूनं विचारलं, "काय झालं राजू?"

"रामुलू, मला वाटतं वहिनी मला हाक मारतेय. कदाचित् पाणी भरायला

नदीवर आली असेल."

"वहिनी तर सकाळीच पाणी नेतात, आता कशाला येतील ? तुम्ही नीट गाडीत बसा; नाहीतर एखादा दांडा लागेल." रामुलू म्हणाला.

एवढ्यात 'वरदम' अशी कुणाची तरी हाक कानावर आली. रामुलूनंही ती हाक ऐकली आणि झटकन् गाडी थांबवली.

वहिनीच आहे हे पाहून वरदमनं गाडीतून उडी मारली. जुन्या साडीची एक लहानशी पुरचुंडी घेऊन मीनाक्षी वेगानं गाडीजवळ येत होती. वाऱ्यानं तिचे केस उडत होते. ती घामाघूम झाली होती. 'वरदम ! ' मीनाक्षीनं पुन्हा हाकारलं.

वरदराजूला आपल्या जखमेची आठवण झाली. वहिनीनं पाहिलं तर. . . त्यानं रुमाल खिशात टाकला. जमिनीवरची माती जखमेवर चोळली. " काय झालं वहिनी ? इतक्या लांब कशी आलीस ? पूर्णेचा ताप कमी आहे ?" प्रश्नावर प्रश्न केले.

पूर्णा शिवय्याची मुलगी होती. चार वर्षांची होती. तिला काकाचा खूप लळा होता. राजूला म्हणायची की मी पण शहरात येईन. गेले सात-आठ दिवस पूर्णेला रोज रात्री थोडा ताप यायचा. पूर्णेला सोडून शहरात जायची राजूची इच्छा नव्हती. पण कॉलेज उघडून चार-पाच दिवस झाले होते. शिवय्यांनी खूप समजावल्यावर राजू शहरात जायला तयार झाला.

राजूला वाटलं, वहिनी म्हणेल पूर्णा तुझ्या आठवणीनं रडतेय. घरी परत चल. एक दिवस राहून मग तू शहरात जा.

खरं म्हणजे शहरात जायची राजूची इच्छाच नव्हती. मॅट्रिक पास आहोत, एवढं शिक्षण बस झालं असं त्याला वाटत होतं. गावात राहून भावाबरोबर शेतीचं काम पाहाण्याची इच्छा होती.

त्या गावात पाचवीपर्यंत शाळा होती. नंतरचं शिक्षण शहरात व्हायचं. राजू रोज सकाळी जेवून शहरात जायचा आणि संध्याकाळी घरी परतायचा. दुपारी खाण्यासाठी वहिनी काही ना काही करून द्यायची, ते खाऊन पाणी प्यायचा.

वर्गमित्र कधी कधी राजूला चिडवायचे – 'शहरात दोसे, इडली वगैरे सगळं मिळतं. तुझा भाऊ चिक्कू आहे म्हणून पैसे देत नाही.' त्यावर राजू म्हणायचा, मला तसलं काही आवडत नाही.

शाळा सुटल्यावर इतर मुलं बागेत वगैरे जायची तर राजू सरळ घरी यायचा. शहरात सिनेमा वगैरे बघण्यापेक्षा घरी वहिनीशी गप्पा मारण्यात त्याला जास्त आनंद वाटायचा.

लोकांच्या कौतुकाचा विषय असलेल्या त्या शहराची राजूला एवढीशी ओढ

नव्हती. म्हणूनच शहरात राहून शिकण्याची त्याची मुळीच इच्छा नव्हती.

"मला पुढे शिकायचं नाहीय." राजूनं वहिनीला एके दिवशी सांगून टाकलं.

मीनाक्षीला हे कळलं तेव्हा तिनं त्याला समजावलं, 'जमाना बदलतोय. गावातल्या गावात राहायचे आता दिवस राहिले नाही. चारचौघांत मिळून राहणं, चार गोष्टी शिकणं आता आवश्यक आहे. शहरात जा आणि शीक.'

शिवय्या मीनाक्षीशी सहमत होते. राजूला समजवायचं काम मीनाक्षीवर सोपवलं गेलं.

"राजू, तुला शिकायचं नाही ? मला शिकलेले लोक आवडतात. मला एक भाऊ होता. खूप हुशार होता. पण गरिबीमुळे माझ्या वडिलांना त्याला शिकवता आलं नाही. तेव्हापासून मला शिक्षणाबद्दल फार आकर्षण आहे."

राजूच्या लगेच मनात आलं, आपल्या शिक्षणासाठी भाऊ जे पैसे खर्च करणार आहेत ते वहिनीच्या भावाच्या शिक्षणासाठी खर्च केले तर किती बरं होईल !

राजूनं वहिनीला तसं सांगितलंसुद्धा.

"माझा भाऊ हयात नाही"– मीनाक्षीनं डोळे टिपले. "राजू मला जर मुलगा असता तर मी नक्की त्याला शिकवलं असतं."

"मग पूर्णेला शिकव ना."

"पूर्णा अजून लहान आहे. ती शिकेल. तिचं लग्न होईल. त्यासाठी पैसा लागेल. तू शिकून चांगली नोकरी धरशील, पैसा कमवशील तेव्हाच कुठं या सगळया गोष्टी होतील."

यावर वरदराजू कबूल झाला. तो शिकेल, पैसा मिळवील आणि पूर्णेला शिकवील

"वहिनी, पूर्णेची तब्येत कशी आहे ?" राजूनं विचारलं.

"पूर्णेला अजून बरं नाही. बहुधा आज तिला ताप येणार नाही. तिला बरं वाटेल. राजू लाडवाचा डबा मी गाडीत ठेवायलाच विसरले बघ. म्हणून आले." मीनाक्षीनं उत्तर दिलं.

"लाडवाच्या डब्यासाठी इतक्या लांब आलीस ?"

"लाडू तुझ्यासाठीच तर केले होते."

"रविवारी भाऊंबरोबर पाठवायचे."

"ताजे–ताजे चांगले लागतात. जानकम्मा पाण्याला येतच होती, मीही तिच्या-बरोबर आले." मीनाक्षी म्हणाली.

"उशीर होतोय. जाऊ या." रामुलु म्हणाला. राजू गाडीत चढला.

गाडी चालू झाली.

मीनाक्षी घरी परत गेली. तेव्हा शिवय्या पूर्णेला खांद्यावर घेऊन इकडे तिकडे फिरत होती.

"कुठे गेली होतीस ? पूर्णा तुझ्यासाठी रडत होती." शिवय्या म्हणाले.

मीनाक्षी घामाघूम झाली होती. आत्ताच न्हाऊन आल्यासारखी वाटत होती.

"अशीच मैदानाकडे गेले होते..."

मीनाक्षीच्या हातात तांब्याबिब्या नव्हता— तिला वाटलं आपली चोरी बाहेर पडली.

"राजू दिसला का ? गाडी फार लांब गेली नसणार !" शिवय्या म्हणाले.

त्यांचं बोलणं कानाआड टाकून मीनाक्षी आत गेली. शिवय्या चकित होऊन तिच्याकडे पाहात होते. तेवढ्यात लक्ष्मय्यानं विचारलं, "शिवा ! भाऊ शहरात गेलाय का ?"

"बाबूजींच्या चेहऱ्याकडे पाहून कळत नाही का लक्ष्मय्या ? सावत्र भावावर इतकं प्रेम करणारे फार थोडे लोक सापडतील." असिरिगाडूनं समर्थन केलं.

"राजूबाबूंचीच गोष्ट करताय नं ? शिवय्यांना राजू मुलापेक्षाही जास्त आहे." गंगुलूनं आपलं मत दिलं.

शिवय्यांचं उत्तर ऐकण्यासाठी न थांबताच लक्ष्मय्या वगैरे मंडळी आपापल्या कामाला निघून गेली.

खेड्यातल्या गोष्टी विचित्रच. हातात ट्रंक आणि वळकटी पाहूनही लोक विचारतील— तुम्ही कधी आलात ? पैलवानासारख्या माणसाला विचारतील— तुम्हाला ताप आलाय असं आम्ही ऐकलं. आता कशी आहे तब्येत ?

राममंदिराकडे जाता जाता असिरिगाडूनं गंगुलूला उपदेश केला—"हे पाहा, कुणासमोर असं कधी बोलू नये."

"त्यात काय झालं ? मला तर यांच्या सगळ्याच गोष्टी टाऊक आहेत." गंगुलूनं उत्तर दिलं.

शिवय्यांच्या वडिलांचं नाव रत्तय्या होतं. शिवय्या सहा वर्षांचे असताना त्यांची आई वारली. वृद्ध मुत्यालम्मा सुनेच्या मृत्यूनं खूप रडली. रत्तय्याला आणि शिवय्याला रांधून वाढत राहिली. जिवंत असेतो, ती मुलाला सांगत होती, तू लग्न कर आणि मला या कष्टातून सोडव. रत्तय्याचं आपल्या पत्नीवर फार प्रेम होतं अशातला भाग नाही; तरी पण त्यानी दुसरं लग्न केलं नाही खरं !

शिवय्या दहा वर्षांचा झाला आणि एके दिवशी कॉलऱ्यानं मुत्यालम्मानं डोळे मिटले. तेव्हापासून बापलेक दोघं घरचं आणि शेतीचं काम पाहू लागले.

मुत्यालम्माच्या मृत्यूनंतर गावातल्या मोठ्या लोकांनी रत्तय्याच्या लग्नाची गोष्ट मनावर घेतली. तेव्हा रत्तय्या म्हणाले, "मला लग्नाची जरुरी नाही, मी शिवाचं लग्न लवकर करून टाकीन."

शिवय्या वीस-एकवीस वर्षांचा झाला तेव्हा रत्तय्या पन्नास पंचावनच्या घरात पोचले. इतके दिवस बापलेक दोघं अर्धकच्चं शिजवून खात होते, पण रत्तय्यांच्या मनात आलं, बाईच्या हातचा स्वयंपाक खावा, घरात सून आणावी.

शिवासाठी मुलगी बघायला शेजारच्या गावी ते गेले, ते दहा दिवस परत आलेच नाहीत.

लोक म्हणाले, "शिवा! तू त्या गावी जाऊन चौकशी करून ये. रत्तय्या का आले नाहीत ते पाहून ये."

"त्याची काय जरूर आहे? ते काही लहान नाहीत. काही कामानिमित्त राहिले असतील." शिवा म्हणाला.

एक दिवस शिवय्या शेतात नांगर चालवत होता तेव्हा, चिन्नी गाडूचा मुलगा बसवा यानं बातमी दिली. "तुमचे वडील गावी परतलेत."

शिवय्यांच्या मनात अनेक तरंग उठले. वडील मुलगी ठरवून आले असतील. म्हणजे आहे ना की सून गोरी असेल तर मागं वंश गोरा होईल. वडिलांनी गोरी मुलगीच पसंत केली असेल.

बसवा तिथंच उभा होता म्हणून शिवानं विचारलं, "आणखी काही बातमी?" बसवानं काही उत्तर दिलं नाही.

"मेनानामारखा उभा काय राहिलायस? उत्तर का देत नाहीस?" शिवा गुरगुरला.

"तुमचे वडील. . . .

"हां हां माझे वडील. . . .काय झालं सांग"

"एका मुलीला बरोबर घेऊन आलेत— लग्न करून."

"बसवा, तू काय झोकून आलास का काय?"

"नाही, खरंच सांगतोय."— बसवानं शपथ घेतली आणि म्हणाला, "गावात लोक म्हणतायत, आपल्या सोन्यासारख्या मुलाचं लग्न ठरवायला जाऊन रत्तय्या स्वतःच लग्न करून आलेत."

आणखी काही ऐकायची शिवाला इच्छाच राहिली नाही. तो म्हणाला, "बरं तू जा."

वडिलांनी खरंच लग्न केलं असेल?— या वयात? म्हणूनच यायला उशीर झाला का? वडिलांना लाजही वाटली नाही. एकून मलाच लाज वाटायला

लागलीय. शिवा विचार करीत राहिला.

शिवय्या गावात आला. तशी सगळे लोक त्याच्याकडे करुणेनं पाहू लागले. शिवय्याला ती दृष्टी आवडली नाही. तो घरी पोचला.

घरी वडील चिरूट तयार करीत होते. दहा दिवसांत रत्तय्या बरेच बदलल्या-सारखे वाटले.

" शिवा आलास तू ? " वडिलांनी विचारलं.

" हो, आलो. " शिवा उत्तरला.

बोलणं कसं सुरू करावं, बापलेकाना –दोघांनाही समजेना. शिवय्याला वाटत होतं, गोष्ट खरी असेल तर वडील स्वत:च सांगतील.

सून आणायला जाऊन बायको आणली हे रत्तय्या तरी कसे सांगणार ?

वडिलांच्या तोंडून शब्द फुटेना तेव्हा शिवा म्हणाला, " मी आत जाऊन अंघोळ करून येतो. "

तशी रतय्या म्हणाले, " घरात तुझी आई आहे, पाणी तापवायला सांग. मीही अंघोळ करीन."

रत्तय्यांनी हे इतक्या सहजपणे सांगितलं, की जणूकाही ही रोजचीच बाब आहे.

शिवा चकित होऊन उभाच राहिला.

रत्तय्या कोरडेपणानं म्हणाले, " शिवा ! जा, आपल्या आईला भेटून ये. "

बसवा तिथेच उभा राहून बापलेकांचं बोलणं ऐकत होता.

ते रत्तय्यांना आवडलं नाही. ते म्हणाले, " बसवा घरात जाऊन मोठ्या आईंना सांगून ये, म्हणावं छोटे बाबू आलेत. "

बसवा घरात निघून गेला.

स्वयंपाकघरात काम करणाऱ्या अन्नपूर्णेचं बसवाकडे लक्ष गेलं. बसवानं निरोप सांगितला आणि तिथून निघून गेला.

शिवय्यानं त्या तरुणीकडे पाहिलं. धुतल्या मोत्यासारखा चेहरा होता तिचा. शिवय्याला आपल्या वडिलांचा खूप राग आला. त्याला वाटलं, वडिलांनी या तरुण स्त्रीवर अन्याय केलाय. आई वारली तेव्हाच लग्न केलं असतं तर बरं झालं असतं.

किंवा निदान मोठ्या बाईशी तरी लग्न करायचं !

त्या युवतीला आई कशी मानायची असा प्रश्न पडला शिवाला.

अन्नपूर्णेला वाटलं होतं, शिवय्या खूप लहान असेल. शिवय्याला पाहून ती चकितच झाली. ती एकटक शिवय्याकडे पाहात राहिली. त्यावेळी अन्नपूर्णेच्या मनात कुठले भाव उमटले, कोणत्या सप्तरंगांची चित्रं मनाच्या फलकावर आकारली आणि कोणत्या जगात तिच्या आकांक्षा भ्रमण करून आल्या हे सांगणं

कठीण आहे.

तिच्या डोळ्यांत जी चमक आली ती दुसऱ्याच क्षणी आकाशातल्या विजेसारखी नाहीशी झाली. आपल्या घरी आईवेगळ्या सहा मुलांचा सांभाळ करणाऱ्या अन्नपूर्णेला त्या तरुणाला बाबू म्हणणं जड गेलं नाही. तिच्या समृद्ध अनुभवविश्वानं तिला शिवाची आई केलं.

"नाव शिवय्या आहे नं ?"

" माझं नाव शिवरामय्या आहे."

शिवाच्या स्वरात कटुता होती.

अन्नपूर्णेनं तिकडे लक्ष दिलं नाही. म्हणाली, "पाणी तापलंय. चला अंघोळ करा. थांबा, गरम पाणी लहान भांड्यात काढून देते."

" त्याची जरूर नाही. मला पाणी घेता येतं."

अन्नपूर्णेबरोबर त्या घरात चैतन्य आलं. बापलेकांच्या चेहऱ्यावरही ते चैतन्य दिसत होतं. सगळ्यांच्या सवयी अन्नपूर्णेनं स्वतःच जाणून घेतल्या होत्या. न सांगता ती सगळं तयार ठेवायची.

शेतावर जाण्यापूर्वीच शिवरामय्याला विचारून घ्यायची, "आज कुठली भाजी करू ?" संकोचामुळं शिवरामय्याला नीट उत्तर देता यायचं नाही.

शिवाला कारलं आवडायचं. त्याला वांगीही आवडत होती. आपल्या आणि शिवाच्या आवडीचे पदार्थ रत्तय्या स्वतः अन्नपूर्णेला सांगायचे.

या लग्नानंतर बापलेकांत अंतर पडलं. अगदीच जरूर पडली तर जरासं बोलणं व्हायचं. या गोष्टीचं रत्तय्याना फार दुःख होई. दोनतीनदा त्यांना वाटलं, मी लग्न केलं हे काही फारसं चांगलं झालं नाही. पण अन्नपूर्णेचं वागणं पाहून मात्र ते ते चकित होत होते. शिवय्याची आई जरी जिवंत असती तरी तीही कदाचित बापलेकांवर एवढं प्रेम करू शकली नसती.

शिवाचं लग्न झालं असतं तर परिस्थिती जरा सुधारली असती. पण त्या विषयावर बोलायला शिवा तयारच नव्हता. गावातल्या दोघांतिघांनी रत्तय्यासमोर असा प्रस्तावही मांडला होता.

"स्वयंपाक करायला घरात एक आई आहेच, मग माझ्या लग्नाची जरूरच काय ?" हे शिवाचं उत्तर होतं.

काही ना काही निमित्त काढून स्वतः शिवा दिवसभर शेतावरच राहायचा. अन्नपूर्णेला त्या घरात येऊन सहा महिने झाले तरी शिवाच्या मनात तिच्याबद्दल

आईची भावना जागलीच नाही. अन्नपूर्णेपासून तो दूरदूरच राहायचा प्रयत्न करीत होता. काही वेळा अन्नपूर्णेला आई म्हणण्याचा त्यानं प्रयत्न केला; पण त्याच्या तोंडून शब्दच फुटला नाही.

अन्नपूर्णेच्या घरात राहाण्यानं आणि शिवाच्या शेतावर राहाण्यानं गावात अफवा पसरू लागल्या. लग्नाबद्दल शिवा जितका निरुत्साह दाखवी, तेवढं अफवांना खत-पाणी मिळू लागलं. लोक म्हणायला लागले, घरात सुंदर तरुण बाई आहे. लग्नाची जरूरच काय?

अन्नपूर्णा दिसली की बायकांत हळूहळू कानगोष्टी सुरू व्हायच्या. टोमणे मारायला सुरुवात व्हायची. सुरुवाती सुरुवातीला या गोष्टी अन्नपूर्णेच्या लक्षात आल्या नाहीत. पण हळूहळू तिच्या लक्षात आलं. तेव्हा तिला फार दुःख झालं. मनातल्या मनात तिनं वडिलांना दोष दिला, म्हातारा माझ्या गळ्यात बांधलाय. तिला शिवाचाही राग आला. त्यानं लग्न केलं असतं तर तिची या बदनामीपासून सुटका झाली असती.

या गोष्टी बापलेकांच्याही कानी पडू लागल्या. पण तिकडे त्यांनी दुर्लक्ष केलं. काटा पानावर पडला काय किंवा पान काट्यावर पडलं काय, नुकसान पानाचंच होतं.

रोज थाळीत भात वगैरे वाढून, दह्याची वाटी शेजारी ठेवून अन्नपूर्णा शिवाशी न बोलताच स्वयंपाकघरात निघून जायची. मधे एकदोनदा येऊन हवे ते पदार्थ वाढून जायची.

त्या दिवशी दह्याची वाटी दिसली नाही. जेवण संपता संपता शिवय्यानं दह्या-साठी इकडे तिकडे पाहिलं, स्वयंपाकघरात काही आवाज येत नव्हता. शिवानं पाण्याचा तांब्या उचलून जोरात खाली ठेवला, हेतू हा की आवाज ऐकून अन्नपूर्णा दही आणील. स्वयंपाकघरात बांगड्या किणकिणल्या.

"आज दही नाही आहे का?" शिवानं विचारलं.

"का नाही? मी विसरले—" म्हणत अन्नपूर्णा दही घेऊन बाहेर आली. शिवाजवळ बसून तिनं दही वाढलं.

ती दही वाढीत असताना शिवाला आपल्या आईची आठवण आली. दही वाढून झाल्यावर अन्नपूर्णा तिथेच बसली. असं कधी झालं नव्हतं. शिवाला आश्चर्य वाटलं. शिवानं अन्नपूर्णेकडे पाहाण्याचा प्रयत्न केला, पण त्याची मान वर उचललीच नाही.

"घरात सून कधी येणार?" अन्नपूर्णेनं विचारलं. शिवय्यानं मान उचलून अन्नपूर्णेकडे पाहिले. अन्नपूर्णेचं वय साधारण अठरा-वीस वर्षांचं असावं. तिचं बोलणं एखाद्या पोक्त बाईसारखं होतं. इतक्या लहान वयात हिला एवढा पोक्तपणा

कसा आला ? शिवय्या पाहातच राहिला.

"हे पाहा बाबू ! तुम्ही दोघंही आपलाच हट्ट चालवता. बापलेक दोघं जेव्हा शेतावर जाता तेव्हा घरात मी एकटीच राहाते. बाई घरात एकटी राहिली की, चार लोकाना चार तऱ्हेनं बोलायची संधी मिळते. सून आली असती तर ती माझ्याबरोबर राहिली असती . . . . . ."

अन्नपूर्णेचा गळा दाटून आला. तिने पदरानं आपले डोळे पुसले.

शिवय्याला अन्नपूर्णेच्या मनाची वेदना समजली. लोकांच्या बोलण्यानं अन्नपूर्णेला किती दुःख होत होतं हेही लक्षात आलं. आपल्यामुळं तिला त्रास व्हावा हे त्याला आवडलं नाही, तो म्हणाला, "आपल्याला आवडेल ती मुलगी निवडा, तिच्या गळ्यात मी मंगळसूत्र बांधीन."

अन्नपूर्णेला खूप आनंद झाला. "ठीक आहे. मी तुमच्या वडिलांना सांगेन."

सहा महिन्याच्या आत शिवाचं मीनाक्षीशी लग्न झालं. अन्नपूर्णा आणि मीनाक्षी जवळजवळ सारख्याच वयाच्या होत्या. त्या दोघी सासू-सुना वाटतच नव्हत्या. बहिणीच वाटत. साऱ्या गावात सासू-सुनेचं कौतुक होऊ लागलं.

काही बायकांचं म्हणणं होतं की अन्नपूर्णा सुनेला फार डोक्यावर बसवते आहे. सावत्र मुलगा आहे. सुनेला ताब्यात ठेवलं नाही तर शेवटी पस्तावायला लागेल.

मीनाक्षीचा पाय घरात पडताच त्या घराचा प्रश्न चुटकीसरशी सुटला. गावातल्या अफवा थंडावल्या. घरात शांतता नांदू लागली. सर्वांचे चेहरे उजळले. एवढ्यात मकरसंक्रांतीचा सण आला. मीनाक्षीच्या वडिलांनी जावयाला आणि मुलीला आमंत्रण दिलं. शेतीच्या कामामुळं शिवाला जाता आलं नाही. मीनाक्षीला पाठवायचा प्रयत्न केला; पण मीनाक्षीनं ऐकलं नाही. नवऱ्याला घेऊन माहेरी गेली अन् तीन दिवसांत सासरी परत आली.

गावातल्या बायका म्हणायला लागल्या, या मीनाक्षीला नवऱ्याला सोडून एक दिवस राहावत नाही.

गावातल्या बायकांचं बोलणं शिवाला आवडलं. त्याला वाटलं, हीच गोष्ट बायकोच्या तोंडूनही ऐकावी.

"तू माहेरी का जात नाहीस ?" त्यानं विचारलंच.

आधी मीनाक्षीनं आढेवेढे घेतले. शिवानं पुन्हा पुन्हा विचारल्यावर म्हणाली, "घरात सासूबाई एकट्या पडतील." या उत्तरानं शिवाचं मन उदास झालं. त्याला जे उत्तर ऐकायचं होतं ते मिळालं नाही.

"सासूसाठी तू माहेरी जात नाहीस ? तू या घरात येण्याआधीही सासू एकटीच राहायची."

"त्या नेहमीसारख्या नाहीत. म्हणूनच मी जात नाही."

"म्हणजे ? "

"म्हणजे असं की तुम्हाला भाऊ किंवा बहीण होणार आहे."

शिवाचा विश्वासच बसेना.

"तुम्ही आत्ताच वाच्यता करू नका. अजून चौथा महिना पूर्ण झाला नाही." मीनाक्षी म्हणाली.

"वडिलांना माहीत आहे ?"

"माहीत असेलच."

शिवा गप्प झाला.

पाचवा महिना लागता लागता ही गोष्ट सगळ्यांना कळली.

गावातले म्हातारे म्हणाले, "बरं झालं. म्हातारपणी आधार होईल."

"आजोबा पितार्जी होतायत." काही लोकानी टोमणे मारले.

नऊ महिन्यानंतर अन्नपूर्णेला मुलगा झाला. मुलगा रोडकाच होता. पण काटक होता. अकराव्या दिवशी त्याचं बारसं झालं– नाव ठेवलं वरदराज् !

मुलगा दहा महिन्यांचा झाल्यावर गावात बातमी पसरली, अन्नपूर्णेचा मुलगा शिवासारखा आहे.

"रत्तय्या, तुमचे दोन्ही मुलगे एकसारखे आहेत. दोघांचे चेहरेमोहरे जुळतायत." कोणीतरी बोललंच. ऐकणारे तोंड फिरवून हसू लागले.

या गोष्टी जर मीनाक्षीच्या कानावर पडल्या तर काय होईल अशी शिवाला भीती वाटू लागली.

शिवा लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देत नव्हता. पण मुलापासून दूर राहात होता. अन्नपूर्णेशी बोलण्याची कधी जरूरच पडत नव्हती. मीनाक्षी सारं काही सांभाळून नेत होती.

हळूहळू गावाचं म्हणणं मीनाक्षीच्या कानावर पडलंच. तशी ती झटकन् म्हणाली, "भावाचा चेहरा भावासारखा नाही दिसणार तर कुणासारखा दिसणार ? "

एक दिवस शेतावरून आल्यावर शिवाला तासभर मीनाक्षी कुठे दिसली नाही. अन्नपूर्णेला विचारायचं शिवाला धाडस झालं नाही. मागील दारी जाऊन तो गरम पाणी लहान बादलीत काढू लागला. तेवढ्यात अन्नपूर्णा बाहेर आली अन् म्हणाली, "बाबू, मीना राजूला घेऊन गेली आहे. तो फार रडत होता. मी पाणी काढून देते."

शिवानं तिचं ऐकलं नाही. अंघोळ होईपर्यंत मीनाक्षी पण आली.

" आज खूप लवकर घरी आलात ? मामंजी अजून आले नाहीत का ? " मीनाक्षीनं विचारलं.

" मागून येताहेत. " शिवानं उत्तर दिलं.

" तुम्ही दोघं मिळून येऊ शकत नाही का ? " मीनाक्षीनं विचारलं. आणि म्हणाली, " कालपासून त्यांना बरं नाही. त्यांचं वय झालंय. "

" वयाचा फक्त तू न् मीच विचार करतो. " शिवा म्हणाला.

" म्हणजे काय ? "

" या वयात लग्न, मूल हे काय आहे ? " शिवा म्हणाला.

" गप्प राहा. त्या ऐकतील. "

" ऐकू देत. खरीच गोष्ट तर आहे. "

" तरी पण मला तुमचं म्हणणं योग्य वाटत नाही. "

" त्यात अयोग्य काय आहे ? "

" हे पाहा, सासूबाई माझ्यासारख्याच एक स्त्री आहेत. त्या स्त्रीवर अन्याय झालाय तो– "

" अन्याय झालाय ? "

" नाहीतर काय झालंय ? तुम्हाला काय वाटतं मोठ्या प्रेमानं त्यांनी तुमच्या वडिलांशी लग्न केलं ? तुम्हाला असं वाटतं का की, तुम्हा बापलेकांच्या मोठेपणानं भारावून जाऊन त्या या घरात आल्यायत ? चांगल्या कुळातली मुलगी तुमच्या घरची शोभा वाढवतेय, तुम्हाला तिच्याशी कृतज्ञ राहायला हवं.

" हे लग्न झालं त्यात त्यांचा काय दोष आहे जरा सांगा पाहू. लहान बाळा-कडे तुम्ही ढुंकूनही बघत नाही, त्याचं त्या आईला किती दुःख होत असेल, कधी विचार केलायत ? "

" सगळ्यांचा विचार करायला तू आहेस की ! " म्हणत शिवा बाहेर गेला.

वरदराजू सगळ्यात आधी ' भाऊ ' हा शब्द शिकला. जेव्हा शिवय्या शेतावरून परत यायचा तेव्हा राजू ' भाऊ, भाऊ ' करीत त्याच्याकडे झेप घ्यायचा.

शिवाचं शरीर पुलकित व्हायचं. तो मुलाला उचलून घ्यायचा, चुचकारायचा.

एक दिवस मुलाला उचलून घेतलं तर शिवाला मुलाच्या गालावर डास चावल्याची खूण दिसली. एक आठवड्याच्या आत त्यानं शहरातून मच्छरदाणी मागवली, मीनाच्या हातात दिली.

" ही कोणासाठी ? " मीनाक्षीनं विचारलं.

" मुलाला डास चावतायत. तेलही लावत नाहीस. गोष्टी तर मोठ्या मोठ्या

सांगतेस." शिवा म्हणाला.

मीनाक्षीला हसू आलं.

शिवय्या दर आठवड्याला शहरातून काही ना काही खेळणं मागवायचा, पण ते मुलाला स्वतः द्यायचा नाही.

मीनाक्षी हसायची. म्हणायची,

"त्या पिशवीत खेळणं होतं. मी राजूला दिलंय पाहा."

शिवाला मनातून बरं वाटायचं. तो गप्प राहायचा.

दिवसेंदिवस शिवाच्या मनात मुलाबद्दल प्रेम वाढत होतं. एके दिवशी विचित्र घटना घडली.

रात्री जेवल्यानंतर शिवा राममंदिराकडे निघाला असताना वडिलांनी 'शिवा म्हणून हाक मारली.

चिरूट तोंडात न धरता रत्तय्या ओटयावर बसलेले शिवानं पाहिले. लग्नानंतर प्रथमच रत्तय्यांनी शिवाला एवढ्या प्रेमानं हाक मारली होती. शिवा वडिलांजवळ आला. रत्तय्यांनी बोलायला सुरुवात केली, "शिवा, या वर्षाच्या सुरुवातीपासूनच माझी प्रकृती बरी नाही. शेतावर जाऊन महिना झाला.

"काल रात्रीपासून पोटात दुखायला सुरुवात झालीय, अन्नपूर्णा तुला उठवून ईश्वरय्याकडे पाठवणार होती पण मीच नको म्हटलं. गरम पाण्यात मध घालून प्यालो. पोटदुखी जरा कमी झालीय.

"माझे डोळे कधी मिटतील, काही सांगता येत नाही. तुझी धाकटी आई भोळीभाबडी आहे. वरदराजू तान्हा आहे. त्या दोघांना मी तुझ्या हाती सोपवतो."

का कोण जाणे, शिवय्या एकदम भडकला. "पन्नाशीत लग्न करताना तुमची अक्कल कुठे गेली होती? तुमचं वय काय, त्या मुलीचं वय काय हे तुम्हाला कळलं नाही? त्या मुलीचं जीवन सुखी होईल असं समजून का तुम्ही लग्न केलंत? कुणाचीही जबाबदारी डोक्यावर घ्यायची माझी इच्छा नाही. तुमची इच्छा असेल तर उद्याच इस्टेटीच्या वाटण्या होऊ द्यात." शिवा रुक्षपणे म्हणाला.

"हे बघ शिवा, माझी चूक झाली. तुझ्या वडिलांनी जी चूक केली त्याची शिक्षा त्यांना मिळावी हे मला मान्य आहे. शिक्षा वडिलांना व्हायला हवी; अन्नपूर्णेला नव्हे, वरदराजूलाही नव्हे. सावत्र आई असूनसुद्धा अन्नपूर्णेनं तुला विष नाही खायला घातलं. प्रेमानं तुझा आदरच केलाय.

"आपली सगळी इस्टेट ही माझी स्वतःची कमाई आहे. तरीही तो लहान

मुलगा इस्टेटीतला वाटा मागणार नाही. सगळी इस्टेट मी तुझ्या नावावर लिहून टाकतोय. तू अन्नपूर्णेला आधार दे, त्या मुलाला माणसात आण.

"हेही मी पित्याच्या हक्कानं मागत नाही आहे. काल रात्रीपासून माझं हृदय जळतंय. मी प्रार्थना करतोय. गोड बोलून जरा ही आग शांत करण्याचा प्रयत्न कर!"

रत्तय्यांचे डोळे आसवांनी भरले.

शिवा मान खाली घालून निघून गेला.

दोन दिवस रत्तय्यांनी शिवाच्या उत्तराची वाट पाहिली. वाट पाहता पाहता त्याच्या हृदयावरचं दडपण वाढत गेलं. मौन म्हणजे अर्धा होकार म्हणतात. पण रत्तय्यांचा त्यावर विश्वास बसेना. रत्तय्यांच्या मनानं पक्कं घेतलं की शिवा दगड आहे. त्या दगडाला पाझर फोडण्याची शक्ती आपल्यात नाही. शेवटी त्यांनी पूर्णेला सगळ्या गोष्टी सांगितल्या.

"अन्नपूर्णा, शिवानं माझं ऐकलं नाही. म्हातारपणी लग्न करून मी तुझ्यावर आणि त्या मुलावर अन्याय केलाय. तू भोळीभाबडी आहेस. राजू लहान आहे. तुम्ही दोघं कसे दिवस काढाल हीच माझी व्यथा आहे. आणखी काही दिवस मी जगलो असतो तर तुम्हा दोघांसाठी काही केलं असतं. ती आशा दिवसेंदिवस क्षीण होत जातेय. देवच तुमचं दोघांचं रक्षण करो! तुझं चांगलं उदार मनच तुमचं रक्षण करील."

रत्तय्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. अन्नपूर्णेला दुःख झालं. ती चांगल्या कुटुंबातली मुलगी होती. कुटुंबाला गरिबी आली होती. वडील हुंडा देऊ शकत नव्हते म्हणून रत्तय्यांशी तिचं लग्न झालं होतं.

प्रत्येक व्यक्तीला खूप काही हवं असतं, पण सगळ्या गोष्टी मिळतात कुठे? जे काही मिळतं त्यावरच समाधान मानावं लागतं ही गोष्ट तिला चांगलीच ठाऊक होती.

सासरी स्वर्गसुख मिळेल अशी तिनं अपेक्षाच केली नव्हती. तिला ठाऊक होतं की, आयुष्यात आनंदाची अपेक्षा करणं मृगजळासारखं आहे. तिनं ठरवलं, इतरांच्या सुखासाठी आपल्या आयुष्याचा उपयोग झाला तरी खूप झालं.

नवऱ्याबद्दल अन्नपूर्णेच्या मनात प्रेम नव्हतं की अनुराग नव्हता. होती फक्त दया. याचसाठी नवऱ्याला दुःख होईल अशी गोष्ट तिनं कधीही केली नाही.

नवऱ्याच्या बोलण्यावरून त्याच्या मनात आपल्याबद्दल व मुलाबद्दल केवढा

ओलावा आहे हे तिला कळलं. तिनं पदरानं नवऱ्याचे डोळे पुसले. त्याच्या पांढऱ्या झालेल्या केसांवरून हात फिरवत म्हणाली, " आमच्यासाठी तुम्ही दुःखी होऊ नका. शिवा वरून खूप कठोर वाटतो, पण आतून फार हळवा आहे. शिवा माझ्यावर किंवा राजूवर कधीही अन्याय करणार नाही. [तुम्ही का काळजी करता ? तुमच्याच हातून राजू मोठा होईल. "

रत्तय्यांना अश्रू आवरले नाहीत. त्यानी अन्नपूर्णेला हृदयाशी धरलं.

त्या रात्रभर अन्नपूर्णा नवऱ्याची समजूत काढीत राहिली. धीर देत राहिली. चार वाजण्याच्या सुमाराला रत्तय्यांचा डोळा लागला.

भल्या पहाटे उठून नदीवर अंघोळ करून सूर्योदयापूर्वीच राम मंदिरासमोर उभं राहाण्याची सवय होती रत्तय्याना. अन्नपूर्णा नेहमीप्रमाणे लवकर उठली. गाई-म्हशींना चारा घातला आणि दुधाची भांडी घासून खोलीत आली तरी रत्तय्या झोपलेलेच होते.

सासूबरोबर उठलेल्या मीनाक्षीनं सासूला विचारलं, " मामंजी उठले नाहीत काय ? "

" रात्रभर झोप नव्हती. आत्ताशी कुठं डोळा लागलाय. " अन्नपूर्णेनं उत्तर दिलं.

थोड्या वेळानं शिवय्या उठला, राखुंडी हातात घेऊन शेताकडे गेला.

अन्नपूर्णेनं ताक केलं, लोणी काढून ठेवलं. तोवर राजू उठून रडू लागला. राजूला उचलून अन्नपूर्णा खोलीत आली. तोपर्यंत उन्हं खोलीत आली होती.

" उशीर झाला हो, उठा आता. " म्हणत अन्नपूर्णेनं रत्तय्यांच्या अंगावर हात ठेवला तर अंग गार लागलं. घाईनं तिनं चादर काढली तर तिथं रत्तय्यांऐवजी त्यांचं कलेवर होतं.

अन्नपूर्णेनं किंकाळी फोडली. मीनाक्षी, नोकर चाकर, सगळे धावत आत आले. क्षणात बातमी शेतावर पोचवली गेली. रडत रडत शिवय्या आला, वडिलांच्या शरीरावर त्यानं डोकं ठेवलं.

अन्नपूर्णा दगडासारखी बसून राहिली. तिच्या डोळ्यांतून एकही अश्रू गळला नाही. मन सुन्न झालं.

बारा दिवसपर्यन्त क्रियाकर्म चाललं होतं. लोक म्हणत होते, धाकट्या आईचं अन् मुलाचं कसं होणार ?

नातेवाईक निघून गेले. ओटा रिकामा झाला. रत्तय्या नेहमी तिथं बसलेले असायचे.

दही वाढता वाढता मीनाक्षी म्हणाली, " तुमच्या धाकट्या आई जायचं म्हणतायत."

जेवण थांबवून शिवानं विचारलं, " कुठे ? तिथं त्यांचा मान ठेवणारं कोण आहे ? "

" इथं तरी त्यांचा काय मान होतोय ?" मीनाक्षीनं विचारलं.

"तुला असं म्हणायचंय का, की गेल्या चार महिन्यांत मी त्यांच्याशी बोललो नाही म्हणून त्या दुःखी आहेत ?"

"एक म्हण आहे, तुम्हाला माहीतच आहे ती– घरून घालवणं मान्य नव्हतं म्हणून घरभर धूर केला. तुमचं वागणं त्या म्हणीसारखं नाही का ?"

"धाकट्या आईच्या बाजूनं माझ्याशी वाद घालणं तुला आवडतं हे मला ठाऊक आहे. तुझ्या मनात कोणतं किल्मिष आहे ते तरी सांग म्हणजे मला कळेल."

"ओरडता कशाला बाबू ! सूनबाईच्या मनात कोणतंही किल्मिष नाही, फक्त माझ्याबद्दल दया आहे. सूनबाईचं मन लोण्यासारखं आहे बाबू ! कोणत्या तरी जन्मी मी पुण्य केलं होतं म्हणून ती सून म्हणून आपल्या घरी आलीय.

"बाबू, आता माझे वडील नाहीत पण भाऊ आहे. लहान असो की मोठं, एक घर आहे. किती दिवस तुम्हा लोकांना त्रास देऊ ? मला स्वतःलाच जायचंय." अन्नपूर्णा म्हणाली.

वडिलांच्या मृत्यूनंतर शिवय्यानं आजच धाकट्या आईकडे पाहिलं. किती बदलली होती ती !

नवऱ्याच्या मृत्यूचा हिच्यावर एवढा परिणाम झाला ? म्हाताऱ्यावर हिचं इतकं प्रेम होतं ? शिवाला आश्चर्य वाटलं.

"घर सोडून तुम्ही का जाता ? या घरात तुमचाही वाटा आहे. माझ्याजवळ राहून तुम्हाला त्रास होत असेल तर उद्याच घराच्या वाटण्या करू."

"हे पहा बाबू, मी या इस्टेटीसाठी आणि घरासाठी या घरात आले नाही. या घराशी माझा संबंध फार थोडा आहे. इच्छा नसतानाही या घरात अन् बापलेकात अडसर झाले. मीच तर त्याला कारणीभूत झाले. इस्टेटीसाठी भांडून मी तुम्हाला दुःख देऊ इच्छीत नाही.

"मी जिवंत राहिले तर राजूला काही कमी पडू देणार नाही. चार-पाच घरची धुणीभांडी करून का होईना, त्याचं पालनपोषण करीन. पण माझी एकच विनंती आहे, मी जर जिवंत राहिले नाही तर तुम्ही राजूचा भार उचलावा.

अन्नपूर्णेचं हे वाक्य ऐकताच मीनाक्षीला जोरात रडू फुटलं. शिवा हात धुऊन बाहेर निघून गेला.

अर्ध्या तासानंतर शिवय्या घरात आला तर सासूसुना तशाच बसल्या होत्या.

"मीनाक्षी" शिवय्यानं हाक मारली.

मीनाक्षी शिवय्या जवळ गेली. तिनं डोळे पुसले.

"धाकट्या आईला कुठेही जायची गरज नाही. वडील नाहीत, पण मी आहे.

या घरच्या बायकांना दुसऱ्यांच्या घरची धुणीभांडी करण्याची आवश्यकता नाही. ” तो मोठ्यानं म्हणाला.

“ बाबू एवढं सांगतायत तर मला दुसरीकडे जाण्याची जरूरच काय ? मला आता राजूची काळजी नाही. माझे डोळे मिटले तरी बाबू त्याचं रक्षण करतील.. ” अन्नपूर्णा म्हणाली.

शिवय्या अन्नपूर्णेशी फार कमी बोलायचा. पण तिचं हवं-नको स्वतः पाहायचा.

अन्नपूर्णा शिवय्यासमोर न का येईना, पण घरच्या कामकाजात तिचा हात असलेला कळत होता.

तशात मीनाक्षीला दिवस गेले.

मासू मीनाक्षीची खूप काळजी घेऊ लागली.

पाचव्या महिन्यात मीनाक्षीची आई रमणम्मा आली. म्हणाली, ‘ मुलीला माहेरी नेते.’ मीनाक्षी म्हणाली, ‘ सातव्या महिन्यात तिकडे येईन.’

शिवय्यानं बायकोला खूप समजावलं पण मीनाक्षीनं ऐकलं नाही. म्हणाली, “ मी सासूबाईंच्या देखरेखीखाली बरी आहे. मी सातव्या महिन्यात तिकडे जाईन.”

रमणम्मा आठवडाभर तिथे राहिली, मग आपल्या गावी परत गेली.

घरातलं सारं काम अन्नपूर्णा करीत होती. पण पाणी आणायला नदीवर जात हती. दोन-तीन हंडे पाणी मीनाक्षी नदीवरून आणायची. इतर वापरासाठी लागणारं पाणी नोकर भरून ठेवायचे.

रमणम्मा आली नव्हती तोपर्यन्त मीनाक्षीच पाणी आणत होती, रमणम्मा म्हणाली, “आता तू पाणी आणता कामा नये. हंडा दे, मी घेऊन येते.”

रमणम्मा होती तोपर्यन्त तीच पाणी आणत होती. रमणम्मा गेल्यानंतर मीनाक्षीनं पाणी आणण्यासाठी पाहिलं तर हंडा पाण्यानं भरलेला होता.

सासूला विचारलं, “तुम्ही कधी नदीवर जाऊन आलात ?”

“ चांदणं पडलं होतं, दोन हंडे पाणी आणलं.” सासू म्हणाली.

“ एवढ्या रात्री तुम्ही एकट्या गेलात ? ”

दुसरे, तिसरे दिवशीही तसंच झालं.

मीनाक्षीनं विनवलं, “ एवढ्या रात्री तुम्ही नदीवर जाऊ नका. ”

शिवय्या म्हणाला, “ दोन हंडे पाणी मीच आणीन. ”

शिवय्या घरातला मुलगा आहे. त्याला पाणी आणायला लावणं योग्य नाही. असं अन्नपूर्णेचं मत होतं.

चार–पाच दिवसांत गोष्ट जुनी झाली. एक दिवस शेतकरी अन्नपूर्णेला म्हणाला, “ तुम्ही एवढ्या रात्रीच्या नदीवर येता हे बरं नाही. नदीजवळ

खूप साप आहेत."

सातवा महिना लागला. रमणम्मा मीनाक्षीला न्यायला आली.

अन्नपूर्णेच्या मनात मीनाक्षीला बांगड्या भरायच्या होत्या.

शिवय्याकडून कामाराकडे निरोप गेला. अन्नपूर्णा लवकर उठली. घरापुढचं अंगण झाडलं. रमणम्माला सांगून नदीवर गेली. मीनाक्षीच्या आंघोळीसाठी पाणी तापत होतं.

रमणम्मानं विचारलं, " मी पण येऊ का सोबत ? "

" मीनाक्षीला लवकर न्हायला घालायचंय. तुम्ही तिकडे बघा तोवर मी आलेच. "

अन्नपूर्णा घरी परत आली. तेव्हा खूप अंधार होता. सात वाजता बांगड्या भरायचा मुहूर्त होता. वाजंत्रीवाले आले होते. स्वयंपाकघरात बसून अन्नपूर्णा आपला पाय बघत होती.

" काय झालं ? " रमणम्मानं विचारलं.

" पाणी आणत होते. तेव्हा काटा मोडलायसं वाटतं."–

" थोडं लोणी लावा म्हणजे बरं वाटेल." रमणम्मा म्हणाली.

अन्नपूर्णा जेव्हा पाणी आणत होती तेव्हा पायाला काहीतरी गार लागलं. पाय झटकला तेव्हा काहीतरी खाली पडलं. पण काटा टोचल्यासारखं वाटलं. दोन मिनिटांत पाचोळ्यातून आवाज येऊ लागला. काहीतरी तिथून जात होतं. अन्नपूर्णा ही गोष्ट विसरलीच. जेव्हा रक्त यायला लागलं तेव्हा तिचं लक्ष तिकडे गेलं हळूहळू दुखायला लागलं. मीनाक्षीला बांगड्या भरल्या. सर्व बायकांनी मीनाक्षीला आशीर्वाद दिला.

अन्नपूर्णा आधी आशीर्वाद द्यायला तयार नव्हती. रमणम्मानं आग्रह केला म्हणून काहीतरी बोलणार तर तोंडून फेस यायला लागला. ती खाली पडली.

लोकांना वाटलं तिला मूर्च्छा आली.

रमणम्मा म्हणाली, " अन्नपूर्णा पाय बघत होती. "

" साप तर नाही डसला ?" सगळ्यांच्या तोंडून वाक्य निघालं.

गारुडी आला. मंत्र–तंत्र घालून प्रयत्न केले. पण काही उपयोग झाला नाही. नऊ वाजता अन्नपूर्णेचा प्राणपक्षी उडून गेला. मधे एक मिनिटभर मीनाक्षीचा हात धरला. काहीतरी शोधलं, काही बोलण्याचा प्रयत्न केला, पण तिचे डोळे कायमचे मिटले.

बारा दिवसांच्या क्रियाकर्मानंतर मीनाक्षी वरदराजूला आपल्याबरोबर माहेरी घेऊन गेली.

शिवय्यानं विचारलं, " मुलगा तुझ्या बरोबर का नेतेस ? "

" मग कुठे राहाणार ? "

राजूनं विचारलं, " वहिनी, आई कुठं गेली ? "

" देवाकडे " — उत्तर मिळालं.

वहिनीच्या खांद्यावर डोकं टेकता– टेकता राजू म्हणाला, " मला वहिनी फार आवडते. "

बायको गेल्यानंतर शिवय्याला सारं घर सुनंसुनं वाटायला लागलं. त्याला वडिलांची आठवण आली. अन्नपूर्णेचीही आठवण आली.

अन्नपूर्णेशी आपलं वागणं नीट नव्हतं असं शिवय्याला वाटलं.

तीन महिन्यांनी मीनाक्षी घरी परत आली. आपल्या मुलालाही शिवय्या बघू शकला नाही. जन्माला आल्यानंतर सहा तासाच्या आत मूल गेलं.

तरी पण वरदकडे पाहून मीनाक्षी आपलं दुःख विसरली.

वरदचं पालनपोषण मीनाक्षीनं मोठ्या प्रेमानं केलं. तो मोठा झाला. हायस्कूलात जाऊ लागला.

मध्यंतरी मीनाक्षीला तीन वेळा दिवस गेले आणि तिन्ही वेळा तिसऱ्या महिन्यात गर्भपात झाला. लोक म्हणायला लागले, सासूचं भूत झालंय आणि मीनाक्षीला त्रास देतंय. तिला भीती वाटतेय की मीनाक्षीला मुलं झाली तर राजूचं पालनपोषण नीट होणार नाही. काही बायकांनी मीनाक्षीला उपदेश केला, " या खेपेला तू नवस कर. म्हणावं मी राजूचं नीट पालनपोषण करीन. "

शिवय्याच्याही मनात शंका उभी राहिली. मीनाक्षीला माहेरी पाठवायची तयारी केली.

मीनाक्षीनं विचारलं, " मी माहेरी गेले तर राजूकडे कोण बघेल ? "

" या घरात राहून कदाचित हेही मूल वाचणार नाही. राजूला काही होणार नाही. त्याची मी चांगली व्यवस्था करीन. " शिवय्यानं तिला दिलासा दिला.

" गावातल्या बायकांचं म्हणणं तुम्हालाही पटतं का ? "

शिवय्याला धड 'हो' ही म्हणता येईना आणि 'नाही' ही म्हणवेना.

" सासूबाई या घराचं रक्षण करतील. आपल्यावर अपकार कधीही करणार नाहीत. मी इथेच राहीन. काहीही होणार नाही." मीनाक्षी दृढ स्वरात म्हणाली.

परीक्षा देऊन वरदराजू घरी आला तर त्याला मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला.

"बहीण झालीय," शिवय्यानं सांगितलं.

वरदराजू खोलीकडे धावला.

"कपडे बदलून ये–" रमणम्मानं सांगितलं. लवकर लवकर कपडे बदलून, हात-पाय धुऊन राजू खोलीत गेला.

"वहिनी, बहीण दाखव." घाईत चुकून राजूनं आपला शर्ट न घालता भावाचा घातला होता. मीनाक्षीला हसू आलं.

अकराव्या दिवशी मुलीचं नाव अन्नपूर्णा ठेवलं गेलं. तिसरा महिना संपता संपता मुलगी देखणी दिसू लागली. वरदमला पूर्णा फार आवडायची. एक मिनिटभरही तो पूर्णेला विसंबत नसे.

2

मोटरी व बसेस चुकवत बैलगाडी विवेकानंद होस्टेलच्या आवारात आली. सर्व मुलांनी गाडीतल्या सामानाकडे आणि त्यात बसलेल्या मुलाकडे आश्चर्यानं पाहिलं.

वरदराजू पैसे भरण्यासाठी तिकडे गेला होता, पण कुठे उतरायचं, कुणाला भेटायचं हे त्याला नीटसं ठाऊक नव्हतं.

भावाचं बोलणं आठवत होतं. गेटच्या आत उजव्या हाताला एक लाल इमारत दिसली. सत्तिबाबूच्या येण्याची वाट बघत राजू तिथेच बसला.

"कुणाला भेटायचंय ?" चौकीदारानं विचारलं. रामुलू म्हणाला, "हा मुलगा शिकायला आलाय. होस्टेलमध्ये राहाणार आहे."

मग तिथल्या हॉलमध्ये त्याचं सामान ठेवण्यात आलं.

रामलू जायला निघाला तसा राजूनं एक लहानसा कागद त्याच्या हातात देऊन म्हटलं, "हा भावाला दे."

रामलूनं कागद पागोट्याच्या आत ठेवला आणि निघाला तेव्हा राजू त्याला काहीतरी म्हणणार होता. एवढ्यात रामुलूच म्हणाला, "काही घाबरू नका बाबू!"

वरदराजूनं डबा उघडून चार लाडू त्याच्या हातावर ठेवले.

गाडीचा आवाज दूर जात चालला तसं राजूचं काळीज धडधडायला लागलं.

खुंटाला बांधलेल्या वासराला आईची आठवण व्हावी तशी राजूला आपल्या

भावाची–वहिनीची आठवण झाली.

त्या दिवशी मंगळवार होता. सकाळचे अकरा वाजले होते. सगळं होस्टेल रिकामं झालं होतं. कॉलेजला न जाणारे, उशिरा उठणारे विद्यार्थी इकडे तिकडे फिरत होते.

माळी झाडाची गळलेली पानं एका जागी गोळा करत होता. दोन शेळ्या काटेरी तारा ओलांडून आत येऊन गवत खात होत्या. राजूला शेळ्या आवडल्या. तो एकटक त्यांच्याकडे पाहू लागला.

हळूहळू शेळ्या फुलझाडांकडे वळल्या, तेव्हा माळी काठी घेऊन धावत शेळ्यां-जवळ आला.

माळ्याला पाहाताच शेळ्या तार ओलांडून पळू लागल्या. पण एका शेळीच्या पायाला काटा लागला आणि ती बें बें करायला लागलेली पाहून राजूला फार दु:ख झालं.

माळी जोरात म्हणाला, "तू कोण आहेस ? शेळ्यांना बघत काय उभा राहि-लायस ? "

वरदराजू घाबरला.

"मी. . मी. . " त्याच्या तोंडून शब्दच फुटेना.

"तेच मी विचारतोय –कोण आहेस तू ? "

एवढ्यात सत्तिबाबू तिकडे आले. म्हणाले, " राजू, कधी आलास ?"

सत्तिबाबूंनी खादीचं धोतर आणि टोपी घातली होती. सत्तिबाबूंना पाहाताच माळी गप्प झाला. त्यांना विचारलं, " आपला मुलगा आहे का ?"

"आमच्या नातेवाइकाचा मुलगा आहे. होस्टेलमधे राहायला आलाय."

माळी निघून गेला.

" राजू चल लवकर. तुझ्या भावानं तुझा बोजा माझ्यावर टाकलाय. मला क्षणाचीही फुरसत नाही "– असं म्हणून सत्तिबाबू पुढे निघाले.

वरदराजू सत्तिबाबूंच्या पाठोपाठ गेला.

सत्तिबाबू गेल्यानंतर वरदराजू घाईघाईनं आपल्याला मिळालेल्या खोलीत आला अन् त्यानं दार बन्द केलं. त्याला भीती वाटत होती, या शहरात आता मला एकटं राहायचंय. डोळे मिटून तो भीती विसरण्याचा प्रयत्न करू लागला. या होस्टेलच्या खोलीत आपण एकटे आहोत हेही त्याला विसरायचं होतं. भाऊ, वहिनी आणि पूर्णा यांचे चेहरे त्याच्या डोळ्यांसमोर तरळत असतानाच त्याला झोप लागली.

डोळे उघडले तेव्हा त्याला ऊन कमी झालेलं दिसलं. भूक लागली.

सत्तिबाबूंनी जाण्यापूर्वी हॉस्टेलची सारी व्यवस्था दाखवली. " ही तुझी खोली. सध्या तू इथे एकटाच असशील. आणखी विद्यार्थी आले तर या खोलीत आणि एका विद्यार्थ्याला जागा देतील. तो तिकडे संडास. ते स्नानगृह. तो जेवणाचा हॉल. त्या मैदानात मुलं खेळतात. कार्यालयाच्या जवळच वॉर्डनचं घर आहे. काही अडचण आली तर तू वॉर्डनला सांगत जा.

" धोबी येतो. त्याला हवे तर कपडे देत जा." एक व्याख्यान ठोकून सत्तिबाबू निघून गेले. कधीतरी सत्तिबाबू एक वर्ष हॉस्टेलवर राहिले होते म्हणून शिवय्यानं त्यांची मदत मागितली होती.

थंड पाण्यानं हात तोंड धुऊन, खोलीला कुलूप लावून वरदराजू मेसकडे गेले. दुपारी हॉल रिकामा होता पण आता भरला होता मंडळी मोठमोठ्यानं बोलत होती, काही जण गात होते, काहींनी ग्लासावर ताल धरला होता.

वरदराजूनं दरवाजाशी उभं राहून इकडेतिकडे पाहिलं. मग व्हरांड्यातल्या एका लहानशा बाकड्यावर तो बसला. कोणी राजूकडे पाहिलंच नाही. तिथे बसल्या बसल्या वरदराजूला डुलकी आली.

डोळे उघडले तेव्हा हॉल रिकामा दिसला. दोन-तीन वेटर इकडेतिकडे फिरताना दिसले. राजू हॉलमध्ये गेला. खुर्चीवर बसला. कप उचलणाऱ्यानं विचारलं, " तुम्ही कोण ?"

" माझं नाव वरदराजू."

" नाव नाही विचारलं, मी म्हणतोय तुम्हाला काय हवंय ?"

" जोगण्णा, कोण आलंय ?" आतून कुणीतरी विचारलं.

" कोणी तरी एक मुलगा आलाय " जोगण्णानं उत्तर दिलं.

" आता का आलाय? जेवायची वेळ अजून झाली नाही." म्हणत एक म्हातारा आतून हॉलमध्ये आला.

" जेवणाचं काही नाही. मी अजून न्याहरीच केली नाहीय." राजू म्हणाला.

" आता न्याहरी करणार ? वाजले किती माहीत आहे का ?"

" मी आधीच आलो होतो. इथं जागा नव्हती म्हणून बाहेर बसलो होतो.

' मागितल्याशिवाय आई पण काही देत नाही. हॉस्टेलमध्ये तू जेवलास की नाही हे कोण बघणार? कोण विचारणार ? दोन–तीन वेळा मागून खायचं असतं— ' हा वहिनीचा सल्ला होता.

" बाहेर बसून झोपलास की काय? नोकर पण निघून गेले. आता न्याहरी कुठली ? " जोगण्णा म्हणाला.

वरदराजूच्या डोळ्यांत पाणी आलं. म्हाताऱ्या वेटरच्या ते लक्षात आलं. असे काही मुलगे त्याच्या पाहाण्यात होते. त्यानं विचारलं, "बाबू, तुम्ही हॉस्टेलमध्ये नव्यानंच आलात का ? "

म्हाताऱ्याचं बोलणं ऐकून राजूच्या डोळ्यांतून अश्रू वाहायला लागले. "हो, मी नवीनच आहे." त्यानं उत्तर दिलं.

"हे पाहा बाबू, कॉफी आणि न्याहरीचं काम अर्ध्या तासात संपतं. आता सात वाजायला आलेत. उद्यापासून तुम्ही लवकर येत चला–" असं म्हणत म्हातारा आत गेला. ब्रेड बटर आणि थोडा जाम घेऊन आला. गुरुनाथम्नं कपभर कॉफी आणली.

"तासाभरात स्वैपाक होईल. उशीर करू नका " म्हाताऱ्यानं सल्ला दिला. "बरं " म्हणून राजू खोलीवर निघून गेला.

दोन–तीन दिवसांतच होस्टेलचं जीवन राजूच्या अंगवळणी पडलं. पण सहकाऱ्यांशी मैत्री जोडणं जरा जड गेलं. इतर सगळे विद्यार्थी राजूची टर उडवू लागले.

हायस्कूलमधे शिकत असताना इतर विद्यार्थी राजूशी मैत्री वाढवण्याच्या प्रयत्नात असत. राजूला गणितात आणि इतर विषयांत चांगले मार्क मिळायचे. शिक्षकही राजूचं खूप कौतुक करायचे. एकही दिवस शाळा बुडवायची राजूला इच्छा होत नसे.

पण इथलं कॉलेजातलं वातावरण त्याला विचित्र वाटू लागलं. कॉलेजला जायला त्याचे पाय वळत नसत. राजूला काही कळेनासंच झालं होतं.

खोलीत आणि वर्गात त्याला विद्यार्थी त्रास देऊ लागले. त्याला धडपणी जेवूही देत नसत. कधी कधी राजू जेवण टाकून निघून जायचा.

जेव्हा त्याचं मन स्थिर नसायचं, तेव्हाही ढोलकं बडवत दहा मुलं त्याच्या खोलीसमोर उभी राहायची.

एक विद्यार्थी म्हणायचा, "मंत्रीमहाशय, आज वरदराजू महाशय जेवणाच्या हॉलमधे आले नाहीत. कदाचित अपचन झालं असेल. दरबारी वैद्यांना बोलावणं पाठवावं."

"असं नाही महाराज ! वरदराजूला घरची आठवण झाली आहे, ही आताच आमच्या गुप्तहेरानं बातमी आणली आहे." दुसरा विद्यार्थी उत्तर द्यायचा.

"ही तुमची फक्त कल्पना आहे. खरी गोष्ट मी सांगतो. स्वर्गात जाता जाता

राजूच्या आजीनं सांगितलंय की बेटा राजू, अमावास्येच्या दिवशी जेवू नकोस. "

"पण दोस्त, आज अमावास्या नाही. आकाशात चांदणं पसरलंय. "

"सूर्य मावळण्यापूर्वीच वरदराजूनं आपली खोली बन्द केलीय. त्यानं चंद्र पाहिला नाही. म्हणून त्याला वाटलंय आज अमावास्याच आहे. "

होस्टेलवर ही रोजचीच रड होती. रोज काही ना काही अशा तऱ्हेची गोष्ट घडायची.

वर्गातही अशीच अडचण पडायची, गणिताच्या वर्गात चौथ्याच दिवशी एक घटना घडली. त्यामुळं वरदराजूला फार दुःख झालं.

राजूला गणित फार आवडायचं. वर्गात सर्वांत कठीण उदाहरण सोडवणं चाललं होतं. त्याचं मन त्यावरच एकाग्र झालं होतं. एका खोडकर विद्यार्थ्यानं हळूच राजूची एक चप्पल पुढच्या बाकाकडे सरकवली. पुढच्या बाकावरच्या मुलानं ती आणखी पुढे सरकावली. शेवटी ती शिक्षकांच्या टेबलापर्यंत पोचली आणि त्यांच्या पायाला लागली.

हातातल्या छडीनं चप्पल उचलून शिक्षकांनी विचारलं, "कुणाची आहे ही चप्पल?" त्यांचे डोळे आग ओकत होते.

सगळे विद्यार्थी गप्प राहिले.

शिक्षक आणखीच चिडले. त्यानी विचारलं, "कोणी उत्तर का देत नाही ? "

सर्वांनी, "माझी नाही "– चा गिल्ला केला.

वरदराजूलाही तसंच म्हणायचं होतं, पण त्यानं झटकन खाली पाहिलं तर एकच चप्पल तिथं होती. दुसरी शिक्षकांच्या छडीवर होती.

"माझी आहे!" वरदराजूनं उत्तर दिलं.

शिक्षक म्हणाले, "ही चप्पल घ्या, आणि वर्गातून चालते व्हा."

राजूला फार वाईट वाटलं. तो निर्दोष होता. त्यानं बोलण्याचा प्रयत्न केला पण शिक्षक आणखीच चिडले.

राजूला खाली मान घालून वर्गाबाहेर जावं लागलं. ही गोष्ट साऱ्या हॉस्टेल-भर झाली. काही विद्यार्थी राजूच्या खोलीजवळ येऊन घोषणा देऊ लागले, "शिक्षकांवर चप्पल फेकणाऱ्या हीरोचा जयजयकार असो ! वीराधिवीराचा जयजयकार असो! वरदराजूचा जयजयकार असो!

त्या रात्री राजू खूप रडला. त्यानं ठरवलं, उद्या भाऊ येतील. मी कॉलेज सोडून निघून जाईन. शेतीच्या कामात भाऊंना मदत करीन. या माकडांपासून सुटका करून घेईन. आणखी एक दिवस त्रास सोशीन.

रविवारचा सूर्य राजला फार सुंदर दिसला. त्याला वाटलं, सूर्य आपल्या गावा-वरूनच आकाशात चढतोय. आज भाऊ येणार. पूर्ण पण इकडे यायचा हट्ट करील. तिची समजूत पटवायला भाऊंना खूप जड जाईल.

राजूनं अंघोळ केली. चांगले कपडे घातले. न्याहरी करून आपल्या खोलीत आला. भावाच्या येण्याची वाट पाहू लागला.

मिनिटा-मिनिटाला तो गेटाकडे पाहात होता. बसेस, मोटारी दिसत होत्या पण त्याच्या गावची एकही गाडी दिसली नाही.

दोन वाजले. राजू खोलीतच बसूनच राहिला. म्हातारा वेटर डब्यातून जेवण घेऊन आला.

"बाबू, काल रात्रीही तुम्ही जेवला नाहीत ! आज सकाळी न्याहरी केलीत पण जेवायला आला नाहीत. इथले विद्यार्थी म्हणजे शुद्ध माकडं आहेत. ते काही ना काही खोडया करीत राहातात. आपण तिकडे लक्ष देता कामा नये. तुम्ही जेवण सोडू नका. मी रोज तुमच्या जेवणाकडे लक्ष देईन. निराळं वाढीन." म्हातारा म्हणाला.

राजूनं डबा हातात घेऊन म्हटलं, "आजोबा मी तुमचा ऋणी आहे." वेटरच्या डोळ्यांत पाणी आलं. तो म्हणाला, "माझा नातू होता तोही तुमच्यासारखंच बोलायचा."

"आता तो कुठं आहे ?"

"आता तो मुलगा आजोबांना भेटायला येऊ शकत नाही. तो येणार नाही. . तो इहलोकात नाही."

वेटर गेल्यानंतर राजू पोटभर जेवला. जेवण झाल्यावर त्याला झोप अना-वर झाली. डोळे उघडेपर्यंत पाच वाजले रात्रही झाली. त्या रात्री पुन्हा राजू जेवला नाही. दुसरे दिवशी सकाळी जेव्हा राजू न्याहरी करायला गेला तेव्हा कळलं, हृदयक्रिया बन्द पडून म्हातारा वेटर वारला. न्याहरी मधेच सोडून राजू उठला.

होस्टेलच्या मागच्या बाजूला नोकरांच्या खोल्या होत्या. राजू म्हाताऱ्या वेटरच्या खोलीशी गेला. खोलीसमोर काही वेटर जमले होते. शवयात्रेची तयारी चालली होती. राजूचे डोळे आसवांनी भरले. हा विद्यार्थी एका वेटरसाठी का अश्रू ढाळतोय, हे कुणालाच कळेना. लोकांना वाटलं हा वेटरचा कुणी नातेवाईक असेल. काल वेटर याच्या खोलीत जेवण घेऊन गेला होता.

कुणीतरी विचारलं, "म्हातारा तुमचा कोण होता ?"

काही न बोलता राजू तिथून निघून गेला.

रविवारी मीनाक्षी वारंवार राजूची आठवण काढीत होती.

मीनाक्षीनं नवऱ्याला म्हटलं, " राजू वाट पाहील. तुम्ही शहरात जाऊन या. "

" तिथं जाऊन मी काय करणार ? सत्तिबाबूंनी सारी व्यवस्था केली आहे. "

" तुम्ही एकदा बघून आलात तर दोघांनाही बरं वाटेल. राजू फार भिडस्त आहे. त्याला कसे मित्र मिळतील, काही कळत नाही! "

" म्हणजे तू त्याला घरी परत बोलावणार की काय ?

" नाही, नाही --"

" मग आपण नेहमी नेहमी जाता कामा नाही. सारखी घरची आठवण करून दिल्यानं त्याच्या अभ्यासात व्यत्यय येईल. तू समजतेस तेवढा राजू नादान नाही. रामुलूनं काय म्हटलं आठवतंय ना ? शहर बघूनच राजू एकदम खूप झालाय. "

मीनाक्षीची कल्पना होती की संध्याकाळपर्यंत शिवय्या नक्कीच शहरात फेरी टाकून येतील.पण जेव्हा ते शेतावरून घरी परत आले तेव्हा मीनाक्षीची निराशा झाली.

मीनाक्षीला वाटत होतं, शिवय्या राजूची आपल्यावरची जबाबदारी जाणतात, पण, त्या मुलाबद्दल त्यांच्या मनात माया नाही. त्यामुळं तिचा नवऱ्यावरही राग नव्हता. परिस्थितीच्या प्रभावाची तिला कल्पना होती. मीनाक्षीनं ठरवलं, शिवय्या गेले नाहीत तर आपण नक्की पत्र लिहायचं.

चिरंजीव राजूला शुभाशीर्वाद.

काल तू दिवसभर भाऊंची वाट पाहिली असशील. भाऊ येणार होते, पण पायात काटा रुतल्यामुळे येऊ शकले नाहीत. शिवाय काल आपल्या गावातल्या गाड्याही शहरात गेल्या नाहीत. भाऊ न आल्यानं काळजी करू नकोस. तू शहाणा आहेस. नीट अभ्यास करून वहिनींची इच्छा पूर्ण कर.

पूर्णेला काकाकडे यायचंय. ती हट्ट करते. भाऊ लवकरच शहरात येतील. पूर्णेचा ताप कमी झालाय. ती नीट खेळत असते.

तू गेल्यानंतर लाल गाईचं वासरू तुझी आठवण करत होतं. मी जेव्हा त्याला सांगितलं की राजू शिकायला शहरात गेलाय, तेव्हा त्यानं मान हलवून आपली संमती दिली. तू शिकावंस असं त्यालाही वाटतं.

तुझी
वहिनी.

पत्र लिहून मीनाक्षीनं ब्लाउजमधे ठेवलं. पूर्णेला कडेवर घेऊन अप्पण्णांच्या घरी गेली. अप्पण्णा तंबाखू ओढत बसले होते.

मीनाक्षीनं पत्र अप्पण्णांच्या हाती देऊन सांगितलं, ' राजूला पाठवायचंय. ' अप्पण्णानी पत्र हातात घेऊन म्हटलं, " अवश्य पाठवीन. "

मीनाक्षी पत्र देऊन परत घरी आली. तोपर्यंत शिवय्या घरी परत आले होते. कडी बघून ओटयावर बसून राहिले. वडिलांना पाहून पूर्णा धावली.

"कुठं गेली होतीस ?" शिवय्यांनी विचारलं.

"अप्पण्णांच्या घरी शहरातली चौकशी करायला गेले होते," मीनाक्षीनं उत्तर दिलं. पण पत्राबद्दल काही बोलली नाही. शिवय्यांना वाटत होतं राजूला ऊठसूट घरची आठवण देऊ नये. उलट अधूनमधून भावाकडून धीर मिळाला तर राजूचं मन खंबीर होईल, असं मीनाक्षीचं मत होतं. मीनाक्षी तसं म्हणाली असती तर शिवय्या बोलले असते, 'राजूपेक्षा तुलाच त्याची जास्त काळजी वाटतेय.'

त्या दिवशी राजू वर्गात गेला नाही. विचार करत बसून राहिला, भाऊ का आले नसतील ? अधूनमधून वेटरची आठवण येत होती.

वेटरनं माझ्यावर किती उपकार केलेत ! खोलीत जेवण आणलं. प्रेमानं माझं सारं केलं. चांगल्या लोकांना देव लवकर आपल्याजवळ घेऊन जातो. वेटरमारखेच माझे आईवडील चांगले होते. दोघांनाही देवानं लवकर आपल्याजवळ बोलावून नेलं. भाऊ, वहिनी आणि पूर्णा हेही चांगले आहेत. हा विचार मनात आल्या-बरोबर त्याच्या अंगावर शहारे आले.

भाऊ का आले नाहीत ? त्यांची प्रकृती बरी असेल ना ? पूर्णेचा ताप कसा असेल ?

राजूचं मन विकल झालं. त्याची खोलीत बसायची इच्छा नव्हती. तो वेड्या-सारखा रस्त्यानं भटकू लागला. फिरत राहिला. चार वाजता भूक लागली. त्यानं थोडे चुरमुरे घेऊन खाल्ले. जेव्हा पाय दुखायला लागले तेव्हा एका दुकानाच्या ओटयावर बसला. त्या दिवशी दुकान बंद होतं.

त्या ओटयासमोर एक छानसं मोठं घर होतं. घरासमोर सुंदर बाग होती. तऱ्हेतऱ्हेची झाडंझुडपं लावली होती. बाहेर लोखंडी फाटक होतं फाटकासमोर चौकीदार बसला होता. एक कुत्रा घरासमोर इकडे तिकडे फिरत होता.

घर फार छान होतं. तो एक वाडा होता. राजूच्या मनात तऱ्हेतऱ्हेचे विचार आले. मोठा झाल्यावर मी पण असा मोठा वाडा बांधीन. वाडा बांधल्यावर कोण कोणत्या खोलीत राहाणार हेही ठरवलं. उजवीकडची खोली भाऊंची. हिरव्या पडद्याची खोली पूर्णेला देऊ. समोरच्या खोलीत बाहेरून आलेले लोक बसतील. वरच्या मजल्यावरची एक खोली आपल्या अभ्यासाची, एक झोपायची. बाकीच्या

खोल्यांतून इतर नातेवाईक राहातील.

राजूनं तसला वाडा कधी पाहिला नव्हता. कधीतरी पाहावा अशी इच्छा झाली. राजू विचार करत होता एवढ्यात एक कार आली, गेटजवळ थांबली तेव्हा चौकीदारानं सलाम करून गेट उघडलं. गाडी पोर्चमधे उभी राहिली. एक मुलगी हातात पुस्तकं घेऊन त्या कारमधून उतरली. एक प्रौढ स्त्री घरातून बाहेर आली. तिनं मुलीच्या हाताला धरून जवळ घेतलं. ती स्त्री बहुतेक मुलीची आई असावी.

मुलगी किती भाग्यवान आहे! शिकायला दुसऱ्या शहरात जायची तिला जरूर नाही. होस्टेलच्या माकडांमध्ये वेळ घालवण्याची मुळीच आवश्यकता नाही. जेवण सोडून मधेच उठायची जरूर नाही. भाऊ शहरात राहात असते तर हॉस्टेल-मधे राहायच्या त्रासापासून मी वाचलो असतो. वहिनीनं खाण्यापिण्याची व्यवस्था केली असती. पण भाऊ शहरात राहाणार कसे? त्यांना शेती करायची आहे. ते शिकलेले आहेत थोडेच?

पण यावर काही उपाय नाही का? मी जर शिकून नोकरी केली तरच हे शक्य होईल. त्यानं ठरवलं, आतापासून आपण नियमित वर्गात जायचं. नीट अभ्यास करायचा. मग तिथून तो उठला. हॉस्टेलकडे पायी निघाला.

हॉस्टेलवर पोचेपर्यंत खूप रात्र झाली होती. हॉस्टेलचं गेट बंद झालं होतं. सिनेमा पाहून भिंतीवरनं उड्या मारून आलेले विद्यार्थी राजूनं सुरुवातीच्या दिव-सात पाहिले होते. त्यांच्यासारखाच तोही भिंतीवरून उडी मारून आत आला.

दुसरे दिवशी काही विद्यार्थी राजूच्या खोलीत आले आणि एक फोटो दाखव-वून विचारू लागले, "हा फ़ोटो तुझाच का?"

रात्री तो जेव्हा भिंतीवरून उडी मारत होता तेव्हा कोणीतरी त्याचा फोटो काढला होता. फोटो त्या वेळचा होता. राजूला त्याबद्दल काही माहीत नव्हतं.

एकदा त्याच्या गावात गावच्या प्रेसिडेंटचा फोटो काढला होता. तो चांगला निघाला नाही तर लोक म्हणाले, ऊन कमी असल्यानं तसं झालं. त्याला शंका आली, रात्री कसा काय फोटो निघाला?

"हो माझा फोटो आहे." राजूनं उत्तर दिलं.

"रात्रीच्या वेळी होस्टेल सोडून बाहेर जाणं, भिंतीवरून उडी मारून येणं नियमबाह्य आहे. हे तुला ठाऊक आहे ना?" एका विद्यार्थ्यानं विचारलं.

"ठाऊक आहे."

"मग नियमाचं उल्लंघन कसं केलंस? हा फोटो वॉर्डनला दाखवण्यात येईल. ही सूचना आम्ही आधीच देतो."

राजू रडकुंडीला आला. तो म्हणाला, "पुन्हा कधी असं करणार नाही.
"तर मग दहा उठाबश्या काढ." राजूनं तसं केलं.
"इथून पुढे सावध रहा." म्हणून फोटो फाडून मुलं निघून गेली.

पाण्याचा हंडा ठेवून मीनाक्षी मागे वळली तर तिला वरदराजू दिसला. तिला आश्चर्य वाटलं.

"वरदम ! कधी आलाम ?" तिनं विचारलं.

"तुझ्या पाठोपाठच आलो वहिनी."

"कसा आलाम ?"

"चालत."

"ते नाही विचारलं. आता काही सुट्टी नाही. मध्येच कमा आलाम ?

"मला तिथे शिकणं जमणार नाही."

"शिकणं जमणार नाही ?"

"नाही."

राजूला वाटलं होतं, आपण आलो म्हणून मीनाक्षीला आनंद होईल. पण ती नाराज होती. राजूला आश्चर्य वाटलं.

एवढ्यात शिवय्या शेताहून आले. म्हणाले, "राजू तू कधी आलाम ?"

"आताच आलाय. याला आपण एवढं शिकायला शहरात ठेवलं तर याच्या पायाला खाज सुटली आहे." मीनाक्षी म्हणाली.

"तू गप्प बस मीना. पोर एवढ्या लांबून आलाय, त्याला पाणीबिणी काही दिलं नाहीम– लगेच त्याच्यावर तुटून पडली !" शिवय्या म्हणाले.

राजूला वाटलं भाऊ किती चांगले आहेत. भावाच्या गळ्यात पडून तो रडू लागला.

"ऊठ, चल. वहिनी तुला गाईचं दूध देईल. ते पिऊन घे." म्हणून शिवय्यानं राजूला शांत केलं. मीनाक्षीला म्हटलं, "घरात आल्याबरोबर त्याला वस्कन ओरडलीस. काय झालं ते सावकाशीनं समजून तर घे."

रात्री मीनाक्षीनं राजूला साऱ्या गोष्टी विचारून घेतल्या. होस्टेलमध्ये फारशा चांगल्या गोष्टी चालत नाहीत एवढं तिच्या लक्षात आलं. तरी पण राजूला धीर देणं जरूर होतं. ती म्हणाली, "नवीनच गेलायस ना ? दहापंधरा दिवसांत सारं ठीक होईल. सहनशक्तीच्या बळावर साऱ्या गोष्टी जमतील.

" बरोबरीचे विद्यार्थी थट्टेनं काहीतरी म्हणत असतील. तू काही त्यांचा शत्रू नाहीस. तू जर त्यांना घाबरलास तर ते तुला आणखी घाबरवतील."

राजू म्हणाला, " वहिनी, हॉस्टेलची तुला काही माहिती नाही. ती मुलं मला धड जेवू देत नाहीत, धड अभ्यास करू देत नाहीत. चपलेच्या घटनेनंतर तर शिक्षकही माझ्याकडे किड्याकडे पाहावं तसं पहातात."

राजू झोपेपर्यंत मीनाक्षी त्याला उपदेश करीत होती. जेव्हा तो झोपला तेव्हा ती आडवी झाली.

" दिराला उपदेश करणं सपलं का ? " शिवय्यांनी विचारलं.

" राजू फार घाबरलाय असं दिसतंय. विद्यार्थ्यांनी असं केलंच का ? "

" विद्यार्थ्यांनी काही केलं नाही. सगळं काही तूच केलंयस. राजूला अगदी भित्रा करून ठेवलायस. हॉस्टेलमध्ये किती तरी मुलं राहातात. खातात, पितात. अभ्यास करतात. पण त्यांना तुझ्यासारखी वहिनी नाही. " शिवय्या म्हणाले.

" म्हणजे मी त्याला भित्रा केला ? फक्त त्याला सांगितलं अंधार पडायच्या आत घरी ये. एवढ्यानंच तो भित्रा झाला का ? "

" जाऊ दे. तुला हवं ते कर. उद्या मी लवकर शेतावर जाणार आहे. राजूला तू परत कॉलेजला पाठवणार का याचा विचार कर. " शिवय्या झोपले.

प्रकाशाचे किरण अंधाराला छेदत होते. उकळत्या दुधावर पाणी शिंपडून मीनाक्षीनं राजूला उठवलं.

" थोड्या वेळानं उठीन. " राजूनं पांघरूण घेतलं.

" उठून न्याहरी करून शहरात जायचंय. ऊठ " मीनाक्षीनं पुन्हा उठवलं.

" मी कॉलेजला जाणार नाही. "

" याचा अर्थ काय ? "

" मी त्या शहरात एकटा राहून शिकू शकणार नाही. " राजूनं दृढपणे उत्तर दिलं.

" मग काय जत्रेत ओझी वाहणार ? कुत्र्याला सोन्याच्या गादीवर बसवलं तरी तो आपला गुण सोडत नाही. तू कॉलेजला नाही जाणार, हे आधीच सांगितलं असतंस तर पूर्णेच्या गळ्यातली सोन्याची साखळी गहाण टाकली नसती. कॉलेजचा पैसा कसा उभा केलाय माहीत आहे का ? " बोलता बोलता मीनाक्षी मागीलदारी गेली.

वहिनीच्या बोलण्यानं राजूची झोप पूर्णपणे उडाली. तो खाटेवरून उठला. दोन-

तीन मिनिटं इकडे तिकडे पाहिलं. कपडे पिशवीत भरले.

"मी शहरात जातोय." दातही न घासता राजू म्हणाला.

"तोंड धुऊन घे. निदान दूध तरी पिऊन जा."

राजूनं वहिनीच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. तसाच निघून गेला. वहिनीकडं वळूनसुद्धा पाहिलं नाही.

राजूनं ठरवलं सगळ्या परीक्षा पास झाल्यावरच मी वहिनीच्या हातचं पाणी पिईन. वहिनीला माझं सुख, माझा आनंद नकोय. नोकरी करून पैसा कमवावा एवढीच तिची इच्छा आहे.

वरदराजूचं मन खूप दुःखी झालं. शेतात शिवय्या दिसले. त्यांनी विचारलं,

"राजू लवकर निघालायस ? काही खाल्लाप्यालास की नाही ?"

राजूनं काही उत्तर दिलं नाही. खाली मान घालून निघून गेला.

वरदराजू हॉस्टेलवर परत आला तेव्हा विद्यार्थ्यांपैकी कोणी काही म्हटलं नाही. तरीही राजू विद्यार्थ्यांपासून लांबलांबच राहायचा.

महिनाभरात शिक्षकांना कळलं, वरदराजू हुशार आहे. गणिताचे शिक्षकही खूष झाले.

एके दिवशी सत्तिबाबू दिसले. राजूला वाटलं वहिनीनं काही निरोप दिला असेल. सत्तिबाबू बाजूच्या गल्लीत सटकले.

गावाहून परत आल्यावर राजू रोज संध्याकाळी नदीच्या किनाऱ्यावर जाऊ लागला. तिथे बसल्यावर त्याला वहिनीची आणि पूर्णेची आठवण व्हायची. वहिनी एवढी कशी बदलली हे त्याच्या लक्षात येईना.

वहिनी बदलली तर मलाही बदलता येतं ; त्यानं मनाशी खूण गाठ बांधली. नदीकाठी जायचं सोडून दिलं. पुन्हा त्या वाड्याकडे जायला सुरुवात केली. वाड्यात आता तो वहिनीसाठी खोली ठेवणार नव्हता. पूर्णेसाठी मात्र ठेवणार होता.

एके दिवशी ओट्यावर बसला असताना उशीर झाला आणि अचानक त्या वाड्यात विजेचे दिवे चमकले. गेटच्या समोरचाही दिवा लागला. त्या प्रकाशात बाग फार सुंदर दिसत होती. तो आणखी थोडा वेळ बसला, मग हॉस्टेलवर जायला उठला.

चौकीदारानं जवळ येऊन विचारलं, "तुझं नाव काय ? तू रोज त्या ओट्या-

वर का येऊन बसतोस ? ''

" माझं नाव वरदराजू आहे. माझं ओटयावर बसणं तुम्हाला आवडत नाही का?"

" मला आवडतं, पण त्या घरात भुताटकी आहे. "

" कुठे ? " राजूनं घाबरत घाबरत विचारलं.

" या घरातली सून जळून मेली आहे. तीच भूत होऊन या घरात राहाते. कोणीही या घरात भाडयानं राहायला येत नाही. " चौकीदार म्हणाला.

" मला भुतांची भीती नाही. आमच्या गावातले लोक म्हणतात, चिंचेच्या बनात खूप भुतं असतात. पण मी एकटाच जातो. "

" गावच्या भुतांचं मला माहीत नाही. पण शहरातली भुतं फार खोडसाळ असतात. "

" काय खोडसाळपणा करतात ते पाहीन. " राजू म्हणाला.

" तू इथे का बसतोस ? तुला घरदार नाही का ? "

राजूनं आपली बाग बघण्याची इच्छा चौकीदाराला सांगितली.

" माझं गाव त्या नदीपलीकडे आहे. तिथे माझं घर आहे. शेती आहे. वहिनी आहे. भाऊ आहेत. मी इथे होस्टेलवर राहून शिकतो. "

" कॉलेजमध्ये फुटबॉल वगैरे खेळता येईल. इकडे का येतोस ? "

" उगीचच येतो. मला इथं बरं वाटतं. " चौकीदाराच्या मनात शंका उत्पन्न झाली. संधी साधून हा घरात तर घुसणार नाही ?

" ठीक आहे. तू जा. माझ्या मालकांनी बघितलं तर रागावतील. "

" तुमचे मालक कोण ? हे त्यांचंच घर का ? "

" छे छे: हे भुताटकीचं घर त्यांचं नाही. या शहरात त्यांची अनेक घरं आहेत. गिरण्या कारखाने आहेत. "

" तर मग ते खूप श्रीमंत असतील ? "

" हो, खूप श्रीमंत आहेत. " चौकीदार गर्वानं म्हणाला.

सिनेमात राजूनं एक राजा पाहिला होता. त्याची त्याला आठवण झाली.

" एवढया गप्पा झाल्यावर त्या दिवशी राजू निघून गेला. पण रोज त्या बाजूला जायचं त्यानं सोडलं नाही. चौकीदार रोज राजूला बघत असायचा. त्याचा संशय नाहीसा झाला.

एक दिवस राजूनं चौकीदाराला विचारलं, "मला आत येऊ द्याल तुम्ही ?"

" टायगर चावेल."

" टायगर कोण ?"

" तोच– तो कुत्रा. . ."

" कुणाला चावेल ? तुला की मला ?"

" मला नाही चावणार. तो एवढाएवढासा होता तेव्हापासून मी त्याला ओळखतो. तो नव्या लोकांनाच चावतो."

राजू निराश झाला.

चौकीदाराला राजूची दया आली. तो म्हणाला, " एक काम कर. जेव्हा टायगर मालकांबरोबर बाहेर जाईल तेव्हा मी तुला आत बोलवीन."

तोपर्यंत अंधार पडायला लागला होता. एक सूटबूटवाला माणूस कुत्र्याला घेऊन बाहेर गेला.

चौकीदारानं राजूला आत बोलावलं. झाडं दाखवू लागला. त्या अंधारात झाडं नीट दिसत नव्हती.

" हे बघ– हे गुलाब आहेत. कुठून कुठून मागवलेत. ही शेवंती आहे. तिकडे बघ– इंग्लिश फुलं खूप आहेत. त्यांची नावं मला माहीत नाहीत. माळयाला ठाऊक आहेत."

" वाड्याच्या मागच्या बाजूला फळझाडं आहेत. आंबे, नारिंग, संत्री, चिकू–" चौकीदार सांगत होता.

अचानक पोर्चमध्ये दिवा लागला. गेटपर्यंत उजेड पडला. गेटमधून मालक आणि कुत्रा आत येत होते. चौकीदाराची हबेलंडी उडाली. तो राजूला म्हणाला, " त्या मंदाराच्या मागे लपून बस. मालक आत गेल्याबरोबर बाहेर सटक."

लपायलाही वेळ नव्हता.

मालकांनी विचारलं, " हा कोण आहे?" कुत्रा गुरगुरायला लागला.

राजूचे पाय थरथरत होते.

" मी . . .मी. . . वरदराजू आहे. इथल्या कॉलेजमध्ये शिकतो." राजूनं उत्तर दिलं.

" कॉलेजमध्ये शिकतोस हे कबूल पण भलत्या वेळेला इकडे का आलास ?"

" याला आत कसं येऊ दिलंस ? " त्यांनी चौकीदाराला विचारलं.

" त्याला बाग पाहायची होती." चौकीदारानं भीत भीत उत्तर दिलं.

" मला तुमची बाग, तुमचा वाडा फार आवडलाय. म्हणून मी रोज त्या कट्ट्यावर बसून बघत असतो." राजू म्हणाला.

" आपण खूप थोर आहात, आपली पत्नी म्हणजे साक्षात् लक्ष्मी, अशी स्तुती ऐकून खुद्द देवही प्रसन्न होतो, तर राघवय्यांना का बरं वाटणार नाही ?

" वाडा छान आहे असं नुसतं म्हणून काय उपयोग ? आत ये आणि पहा तर !"

इतक्यात कारमधून उतरताना जिला पाहिली होती, ती मुलगी बाहेर आली.

“ बाबा, फिरायला नाही गेलात ?” मुलीनं विचारलं.

“ जरासा लांब गेलो तेवढ्यात तुझ्या सिनेमाची आठवण झाली. म्हणून परत आलो. बघ बाळ, या मुलाला आपला वाडा खूप आवडलाय. आत घेऊन जा आणि खोल्या वगैरे दाखव. ”

“ बरं बाबा. यांना तर मी ओळखते. ”

“ कसं काय ?”

“ हे रोज कट्ट्यावर बसून आपल्या घराकडे बघत बसतात. मी आईला म्हटलं तर तिनं लक्षच दिलं नाही. म्हणाली, ‘असेल कोणीतरी.’ ”

“ आपण सिनेमाला जा. मी उद्या येईन. ” राजू म्हणाला.

“ तुझी मर्जी—” राघवय्या म्हणाले.

“ माझं नाव अनुराधा, आपलं ? त्या मुलीनं विचारलं.

“ वरदराजू. ”

राजूला वाटलं, आपलं नाव चांगलं नाही.

चौकीदारानं राजूला बाहेर पाठवलं. आणि म्हणाला, “ पाहिलंस आमचे मालक किती चांगले आहेत ते ! उद्या जरूर ये, जरा चांगले कपडे करून ये. थोरा-मोठ्यांच्या घरी असे कपडे घालून जाऊ नये. ”

चौकीदाराचा उपदेश संपला. राजू निघून गेला.

वरदराजू होस्टेलवर पोचताच एका विद्यार्थ्यानं त्याला सांगितलं, “ राजू, तुझ्याकडे कोणीतरी आलेत. ऑफिसमधे बसलेत. ”

माझ्याकडे कोण येणार ? या शहरात माझी कुणाशी ओळख नाही. गावाहून रात्रीचं कुणी येणार नाही. विचार करीत राजू जेवणघराकडे गेला. राजूसारखे उशिरा येणारे दहापंधरा विद्यार्थी तिथे जेवायला बसले होते.

पडवळाची भाजी, काल्र्याची चटणी दोन्ही गोष्टी राजूला आवडत नव्हत्या. पण आज तेच होतं. राजूला म्हाताऱ्या वेटरची आठवण आली. वहिनीची आठवण झाली.

जेवण उरकून तो बाहेर येताच तो फोटोवाला मुलगा दिसला. त्यानं सांगितलं, “ तुझे भाऊ आलेत. तुझी वाट पाहातायत. ”

भावाचं नाव ऐकताच राजूचा चेहरा उजळला. घाईघाईत तो खोलीजवळ आला. शिवय्या व्हरांड्यात उभे राहून कुणा विद्यार्थ्याशी बोलत होते.

राजूनं खोलीचं कुलूप उघडलं.

शिवय्यांनी विचारलं, "मी सहा वाजल्यापासून इथे आहे. तू कुठे गेला होतास ?"

"जरा बाजारात गेलो होतो." उत्तर मिळालं.

तीन महिन्यांपूर्वी शिवय्यांनी हाक मारल्यावरही काही उत्तर न देता राजू शहरात आला होता. त्याचं कारण काय होतं, ते शिवय्यांना घरी गेल्यावर बायकोकडून कळलं होतं.

राजू निघून गेल्यावर मीनाक्षी खूप घाबरली होती. "तू मायाही करतेस आणि शिव्याही देतेस. राजूची काय कल्पना होईल तुझ्याबद्दल ?" शिवय्या म्हणाले.

"त्याला काही का वाटेना, तो माणसात आला तर तेवढं मला पुरे." मीनाक्षीनं उत्तर दिलं.

"घरी सगळं ठीक आहे ना ? सगळे बरे आहेत ?" राजूनं विचारलं.

राजू खूपच बदललाय असं शिवय्यांच्या मनात आलं.

"आठवड्यापूर्वी मी पोलय्याबरोबर निरोप पाठवला होता. तू उत्तर पाठवलंस, सुट्टीत मी गावी येणार नाही. वहिनी तुझी वाट बघतेय. पूर्णा 'काका काका' म्हणून हाका मारतेय. दहा दिवस गावी चल." शिवय्या म्हणाले.

"वेळ नाही. अभ्यासात मी मागे राहिलोय. सुट्टीत तो भरून काढायचाय."

"अभ्यास काय तिकडेही होईल."

"नाही. इकडे जास्त सोयी आहेत. लायब्ररी आहे. त्या खेड्यात लायब्ररी वगैरे नाही."

शिवय्या लक्षपूर्वक राजूचं बोलणं ऐकत होते. "बरं बाबा, तुझी मर्जी ! मी उद्या सकाळी जातोय. आज रात्रीच गावी परत जायचं होतं, पण तुला भेटल्याशिवाय जायची इच्छा नव्हती. तुझ्या वहिनीनं हे पत्र दिलंय. विचार करून तुला जे योग्य वाटेल ते कर." असं सांगून शिवय्या बाहेर गेले.

कागदावर लिहिलेल्या चार ओळी वरदराजूकडे पाहात होत्या. असं वाटत होतं, त्या ओळी म्हणतायत, 'राजू, तू आला नाहीस तर तुझ्याशिवाय मी कसा सण साजरा करू ?'

मी जाणार नाही, मुळीच जाणार नाही. जेव्हा तुला वाटेल तेव्हा येऊ, तुझी इच्छा नसेल तेव्हा नको येऊ ? मी तसला माणूस नाही. उजाडलं पण नव्हतं तर तू घरातून बाहेर काढलंस, शहरात पाठवून दिलंस.

'आई नव्हती. मी तुलाच आईच्या जागी मानलं. तूही माझ्यावर फार उपकार केलेस. आभारी आहे'. . . विचार करीत करीत राजूनं चिठ्ठी फाडून टोपलीत टाकली.

सकाळ झाली. राजूचं मन शांत झालं.

भावाच्या पैशावर मी शिकतोय. वहिनीनं बोलावूनसुद्धा मी न जाणं बरं दिसणार नाही. वहिनीवर राग आहे. तर तिच्याशी बोलणार नाही. पण पूर्णेनं माझं काय वाईट केलंय ?

घर वहिनीचं नाहीय. त्याचवेळी सोन्याच्या हाराचा प्रसंग आठवला. 'नोकरी मिळाली की असे वीस हार घेऊन देईन' राजूच्या मनात आलं.

संध्याकाळपर्यंत त्याचा निर्णय झाला. त्यानं पिशवीत कपडे भरले आणि गावचा रस्ता धरला.

3

"राजूला भेटलात ?" तांब्या हातात देता देता मीनाक्षीनं विचारलं.

"हो भेटलो. म्हणून तर रात्री तिकडेच राहिलो."

"कसा आहे ?"

"तो सुट्टीत इकडे येणार नाही."

"काही कारण सांगितलं ?"

"बहुतेक त्याला यायचं नाही आहे."

"माझं पत्र दिलंत ? त्यानं वाचलं का ?"

"पत्र मी दिलं, पण मला वाटतंय तो ते वाचणार नाही. राजू खूप बदललाय. यामुळं चांगलं होईल की वाईट, हे मला सांगता येत नाही. रात्री तो जवळजवळ दहा वाजल्यानंतर खोलीवर आला. विचारलं कुठे गेला होतास म्हणून तर उत्तर दिलं, बाजारात गेलो होतो. त्या उत्तरात मला बेजबाबदारी आणि अश्रद्धेची भावना दिसली. ठीक आहे. आपल्यालाही तेच हवं होतं ना ?" शिवय्या म्हणाले.

"राजू बदलला ? तो माझ्यापासून लांब राहायचं म्हणतोय ? ठीक आहे. माझ्या कडवट बोलण्यानं त्याचं मन दुखावलं असेल. कदाचित त्याला वाटलं असेल, वहिनीचं प्रेम कृत्रिम आहे."

प्रेम आणि मायेच्या मातीनं मीनाक्षीनं राजूचं चित्र घडवलं होतं. ममतेच्या रंगानं ते रंगवलं होतं पण असं वाटत होतं की ते चित्र नीट वाळण्यापूर्वीच हातातून निसटून पडलंय. काही का होईना पण राजूचं नुकसान होऊ नये, एवढीच तिची

इच्छा होती. मीनाक्षीनं एवढंच देवाला मागितलं.

"तुम्ही वरदमला ओळखत नाही. तो बदलला असेल, पण अजून माझा त्याच्यावरचा विश्वास ढळला नाहीय. मी जे काही करते ते त्याच्या भल्याकरता करते, एवढं तो नक्कीच समजेल. उद्या-परवापर्यंत वरदम नक्कीच येईल." मीनाक्षी निर्धारानं म्हणाली.

शिवय्यांना वाटलं, कदाचित् मीनाक्षीचंच म्हणणं बरोबर असेल. माझीच चुकीची समजूत झाली असेल.

दिवसभर मीनाक्षी राजूची वाट पाहात राहिली. गावकऱ्यांनी विचारलं, "तुमचा दीर अजून आला नाही का?"

"आज दिवसभर कॉलेज आहे. उद्यापासून सुट्टी लागेल." शिवय्यानी मीनाक्षीला आठवण करून दिली.

संध्याकाळ होत होती. मीनाक्षी पाण्यासाठी नदीवर जायच्या तयारीला लागली.

"सकाळचं पाणी संपलं?" शिवय्यानी विचारलं.

"एक हंडा स्वैपाकाला लागला. दुसऱ्या हंड्यात पूर्णेनं माती टाकली."

मीनाक्षी घाईघाईनं नदीवर गेली. नदीवर फारशा बायका नव्हत्या. ज्या होत्या त्याही लवकर लवकर पाणी भरून जात होत्या.

मीनाक्षीनं आपला हंडा चिंचेनं घासून लखलखीत केला. तिचे हात हंडा घासत होते पण डोळे पुलाकडे लागले होते. तोपर्यंत सर्व स्त्रिया निघून गेल्या होत्या. एखादीच राहिली होती. एकीनं विचारलं, "तू घरी जाणार नाहीस का?"

"जरा गरगरतंय, इथे गार हवेत बरं वाटतंय, थोड्या वेळानं जाईन." मीनाक्षीनं उत्तर दिलं.

सूर्य मावळायला आला होता. त्याची लाली चोहीकडे पसरली होती. तिचंही अंधारात रूपांतर होऊ लागलं होतं. तेव्हा मीनाक्षीला वाटलं, आणखी उशीर करणं बरं नाही. पूर्णा उठून रडत असेल. पाण्याचा हंडा डोक्यावर घेतला खरा, पण मीनाक्षीची नजर पुलाकडे वळली.

तीच चाल! तोच चेहरा! तोच येतोय! —तिची खात्री पटली.

'वरदम' मीनाक्षी ओरडली. हंडा तिथेच टाकून पुलाकडे धावली.

वरदराजूला आश्चर्य वाटलं. माझ्या येण्याचं वहिनीला कसं कळलं? ती इकडे कशी आली?

धावता धावता मीनाक्षीच्या मनात आलं, राजू धावत पळत माझ्याकडे येईल, पण हा हळू का चालतोय? खरंच राजू बदललाय. मीनाक्षीच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. त्या अश्रूंच्या मागे मातृहृदयाची हाक होती. राजूला ते चांगलं

आणवलं. वहिनी माझी वाट बघतेय ? आणि मी तिच्यावरच रागावतोय ? वहिनीवर स्वार्थीपणाचा आरोप करतोय ? राजूला पश्चात्ताप झाला. 'वहिनी' म्हणत राजू मीनाक्षीच्या गळ्यात पडला,

'वरदमबाबू ! तू आलास ? मला माहीत होतं तू येशील नक्की येशील, तू, वहिनीवर रागवणं शक्य आहे का ?' मीनाक्षीनं राजूला पोटाशी धरलं.

"अंधार झालाय, जाता जाता बोलू." जराशानं राजू म्हणाला. मीनाक्षी पाण्याचा हंडा आणायला घाटावर गेली.

दहा दिवस राजू उत्साहानं घरभर फिरत राहिला. मीनाक्षी खूप आनंदात होती. शिवय्या म्हणाले, "राजू आता स्वतंत्र विचार करायला लागलाय."

पूर्णा राजूला क्षणभरही सोडत नव्हती. दसऱ्याची सुट्टी संपली. राजूचं मन स्वच्छ झालं होतं. तो शहरात जायला निघाला होता. त्याला वाटलं, मूर्खपणा करून सुट्टीत गावी आलो नसतो तर किती नुकसान झालं असतं !

नवे कपडे घालून राजूनं वहिनीला आणि भावाला नमस्कार केला. पूर्णेला खांद्यावर बसवलं. मग तिला खाली उतरवलं. आणि निघाला.

वहिनीनं विचारलं, "पुन्हा कधी येशील ?"

"परीक्षा संपल्याबरोबर येईन. त्या आधी जरूर पडली तर तू बोलावशील त्या दिवशी येईन."

या उत्तराने मीनाक्षी खुष झाली.

होस्टेलवर परत आल्यावर राजू जेव्हा कपडे अन् पुस्तकं लावत होता तेव्हा त्याला वाड्याची आठवण झाली. वाडा पाहायला जायचं होतं, पण तो गेला नाही. कदाचित् त्या घरच्या लोकांना राग आला असेल.

चार वाजता तो वाड्याकडे निघाला. गेटसमोर कुणी दुसराच चौकीदार बसला होता. त्यानं राजूला आत जाऊ दिलं नाही.

"माझं नाव वरदराजू आहे. तू आपल्या मालकांना सांग."

"मालक गावात नाहीत."

"त्यांची मुलगी राणी, तिला सांग."

"राणी घरात नाही."

आतल्या बाजूला नजर टाकली तर कुणी दिसलं नाही. राजूला वाटलं, चौकीदार सांगतो ते खरंच असेल.

अनुराधेनं चार-पाच दिवस राजूची वाट पाहिली. आपली खोली साफ करवून घेतली. चांगले कपडे घालून बसून राहिली.

आई म्हणाली, "राजूला घर पाहायचंय तर सारं घर दाखवायची काय जरूर आहे? समोरची खोली दाखव म्हणजे झालं. मला शंका येतेय चोरांना घराची बातमी सांगणाऱ्यातला हा एक असेल."

अनुराधेला तिचं म्हणणं आवडलं नाही. "बाबाच म्हणाले — हे काही राजूनं सुचविलं नव्हतं."

त्याच दिवशी वडील आत येऊन म्हणाले, "तुझ्या आईची संपत्ती कोणीतरी घेऊन जाईल अशी तिला भीती वाटते."

अनुराधेची नजर गेटकडेच लागली होती.

"तो कोण आहे, कुठला आहे, काहीच माहीत नाही." राजम्मा म्हणाली.

"बरं जाऊ दे. तो मुलगा आलाच नाही. मोठा भिडस्त वाटतो." राघवय्या म्हणाले.

त्यानंतर दोन-तीन दिवस वाट पाहून अनुराधाही त्या मुलाला विसरली.

दहा दिवसांनंतर अनुराधेनं भरय्याला विचारलं तर तो म्हणाला, "तो मुलगा आला नाही."

सगळेजण ही गोष्ट विसरले.

राजू दहा मिनिटं तिथेच उभा राहिला. अनुराधेची मूर्ती त्याच्या डोळ्यांसमोर आली. ती मुलगी किती सुंदर आहे.

हळूहळू तो होस्टेलकडे गेला, अभ्यासात गुंग झाला.

सहामाही परीक्षा संपल्या. सुट्टीत राजू पुन्हा घरी जाऊन आला. परीक्षेत मार्क चांगले पडले होते. राजूला खूप आनंद झाला.

त्यानं वहिनीच्या नावानं पत्र टाकलं. बाजारात गाड्या शोधल्या तर रामुलू दिसला. वहिनीला देण्यासाठी पत्र रामुलूच्या हातात ठेवलं. नंतर नदीकडे गेला. वहिनीची आणि त्याची दिलजमाई झाल्यापासनं त्यानं पुन्हा नदीकडे जायला सुरुवात केली.

जेव्हा राजूचे आजोबा लहान होते, तेव्हा नदीवर पूल नव्हता. लोक नदी पार करून जायचे.

पावसाळ्यात नदी पाण्यानं भरून जायची. तेव्हा शहरात जायला फार त्रास

पडायचा. कोणी मोठा अधिकारी त्या गावात येत पण नसे.

त्याच दिवसांत एक दुःखद घटना घडली. त्याचा परिणाम म्हणून पुलाचा पाया घातला गेला. पावसाळ्याचे दिवस होते. पावसाची चिन्हं दिसत होती. दहा शेतकरी नदी पार करीत होते. कुठे पाऊस पडला कुणास ठाऊक. नदीला इतकं पाणी आलं की सगळे शेतकरी वाहून गेले.

त्यामुळं हाहाकार माजला. वर्तमानपत्रवाल्यांनी दखल घेतली. तेव्हा वर्षभरातच पूल तयार झाला.

पूर्वीच्या काळी म्हातारे लोक त्या पुलावरून जात नव्हते. त्यांना वाटायचं, लोकांच्या मृत्यूवर हा पूल बांधलाय. घटना इतिहासजमा झाली. आता सगळे लोक पुलावरून ये-जा करतात. त्या पुलामुळं शहर आणि खेडं जवळ आलं. गावातले काही विद्यार्थी रोज शहरात शिकायला जात-येत.

कॉलेजच्या मुली खूपदा सहलीला पुलाजवळ यायच्या.

एके दिवशी अंधार पडायला लागला तशी वरदराजू नदीकाठावरून उठून होस्टेलवर निघाला. कुठूनतरी ओळखीचा आवाज कानांवर पडला—

" तोच...तोच मुलगा आहे बाबा ! "

" मलाही तसंच वाटतंय. "

" नाव काय बरं सांगितलंस ?"

" वरदराजू आहे. "

आपलं नाव ऐकून वरदराजूनं तिकडे लक्ष देऊन पाहिलं. तीच मुलगी...त्या वाड्यातली...तिचे वडील...

चार पावलं पुढे जाऊन राजूनं वाड्याच्या मालकांना अभिवादन केलं.

" ओहो, तूच आहेस तर ! आम्हाला शंका आलीच होती. "

" मीच आहे. आपल्याला आपल्या बागेत भेटलो होतो. "

" इथे काय करतोस ?"

" रोज संध्याकाळी मी इकडे येतो. "

" तू आमचा वाडा विसरलास काय ?"

" नाही नाही ! "

" मग कबूल करून आला का नाहीस ?" अनुराधेनं विचारलं.

" त्याच दिवशी गावी गेलो होतो. गावाहून परत आल्यावर एके दिवशी संध्याकाळी आपल्या घरी आलो होतो, पण आपल्या चौकीदारनं मला आत येऊ दिलं नाही "

" भरैय्याच्या समोरचं घर दाखवायचं ठरलं होतं ना हो बाबा ?"

" गेटवर कुणी दुसराच चौकीदार होता. त्यानं सांगितलं घरात कोणी नाही. " राजू म्हणाला.

" म्हणजे हे माधवचं काम. माधव म्हणजे भरय्याचा मुलगा. चूक आमचीच आहे. वडील गावात नव्हते. कुणाही येणाऱ्या-जाणाऱ्याला आत पाठवायला आईनं मनाई केली होती. " अनुराधा म्हणाली.

" ठीक आहे. तू उद्या ये. " राघवय्या म्हणाले.

" जरूर येईन. चार महिन्यांपासून वाडा बघायची इच्छा मनातच राहिली आहे."

वडिलांबरोबर मुलगीही मोटारीत बसली. मोटार चालू झाली. " बाबा, वरद-राजू बराच बदलल्यासारखा वाटतो नाही ? " अनुराधेन विचारलं. " मोठा झालाय. "

दुसरे दिवशी रविवार होता. संध्याकाळी चार वाजताच राजू राघवय्यांच्या घरी पोचला.

" ये ये. फार दिवसांनी आलास. " भरय्यानं राजूचं स्वागत केलं.

माधवनं अडवल्याची गोष्ट भरय्याला सांगितली. तो हसला. म्हणाला, " माधव तसाच आहे. जेवढं सांगाल तेवढंच करील."

दोघं गेटच्या आत आले. टायगरनं राजूचे पाय हुंगले. अनुराधा टायगरच्या मागोमाग आली. अनूनं सांगितल्यावर टायगर निघून गेला.

राघवय्या हॉलमधे कोचावर बसून चिरूट ओढत होते. " ये वरदराजू– " राघवय्यांनी राजूचं स्वागत केलं. त्या मऊ गादीवर कसं बसावं राजूला कळेना.

" आज कॉलेजला सुट्टी आहे ना ?" राघवय्यानी विचारलं.

" तुम्ही असं काय विचारताय ? आज रविवार आहे. " अनुराधा हसत म्हणाली.

" परीक्षा संपल्या ? "

अनुराधा म्हणाली, " हाही प्रश्न बरोबर नाही. परीक्षा संपल्यावरच सुट्टी देतात ना ? सुट्टी संपल्यावर पुन्हा कॉलेज उघडतं. कॉलेज उघडलंय."

" ठीक आहे. परीक्षेत मार्क किती मिळाले ?"

हा प्रश्न अनुराधेला रुचला. वरदराजूचा अभ्यास कसा आहे हें अनुराधेला जाणून घ्यायचं होतं. ती म्हणाली, " बाबा, आता तुम्ही चांगला प्रश्न विचारलात."

बापलेकीचं बोलणं आश्चर्यानं ऐकत राजू उभा होता.

" अजून उभाच आहेस ? बस, बस, बाबा." राघवय्यांनी आग्रह केला. राजूनं अनुराधेकडे पाहिलं. अनुराधा सोफ्याला टेकून उभी होती.

राजूनं मिळालेले मार्क सांगितले.

" मग युनिव्हर्सिटीत पहिला येशील असं दिसतंय." राघवय्या म्हणाले.

राजू गप्प राहिला. "आमची अनुराधा परीक्षेच्या हॉलमध्ये गेली की वाचलेलं सारं विसरते. शन्यू मार्क मिळवते."

"तुम्ही खरं सांगत नाही आहात." राजू म्हणाला.

" तुम्हाला काय माहीत ?" अनुराधेनं विचारलं.

"ज्यांना शून्य मार्क मिळतात त्यांचे डोळे एवढे तेजस्वी आणि सुन्दर नसतात." राजूनं उत्तर दिलं

"म्हणजे तूही डोळे बघून फसलास की काय ?" राघवय्यांनी हसत विचारलं.

"बाबा, मी जातेच कशी ! तुम्हीच यांना घर दाखवा."

"अग ही सगळी थट्टा. राजूलाही हे सारं ठाऊक आहे. याला घरात घेऊन जा. सारा वाडा दाखव."

अनुराधेनं राजूची आईशी ओळख करून दिली. त्याचे मार्कही सांगितले. मार्क कळताच राजम्मा खूष झाली. मासा गळाला लागला.

अनुराधा राजूला वर घेऊन गेली. राजम्मा नवऱ्याजवळ येऊन म्हणाली, "मुलगा चांगला आहे. हुशारही आहे. पण त्याचे कपडे..."

"ते लोक शेतीवाडी करणारे आहेत. याच्यापेक्षा चांगले कपडे कसे घेऊ शकतील ?" राघवय्यानं समजावलं.

राजू निरोप घेऊन होस्टेलवर गेला. त्यानंतर दहापंधरा दिवस राजू त्या वाड्याकडे जाऊ शकला नाही. जेव्हा बोलावूनही तो आला नाही, तेव्हा राघवय्यांना वाटलं, मुलगा फार भिडस्त आहे.

राजू भेटल्यावर राजम्माचं मत बदललं, त्याच्याबद्दल चांगलं मत झालं.

" आईला पण आवडला म्हणजे राजू खरंच चांगला आहे नाही का हो बाबा ?" अनुराधेनं वडिलांना विचारलं.

"सगळ्यांच्यात मीच दोष काढते असंच तुला म्हणायचंय ना ? " राजम्मानं विचारलं.

हळूहळू त्या घरात सगळ्यांचंच राजूविषयी चांगलं मत झालं.

वार्षिक परीक्षा जवळ आल्यामुळे राजू राघवय्यांच्या घरी जाऊ शकला नाही. ते अनुराधेला फार जाणवू लागलं.

एके दिवशी मायलेकी कापडाच्या दुकानातून येत होत्या, तर राजू दृष्टीस पडला.

"आमच्या घरी येत का नाही ?" दोघींनीही विचारलं.

"परीक्षा जवळ आली आहे; अभ्यास व्हायचाय." राजूनं उत्तर दिलं.

"अभ्यासात व्यत्यय आणायची आमचीही इच्छा नाही. तरी पण येत्या रविवारी आमच्या घरी या. माझी बहीण आणि तिची मुलं आली आहेत. त्यांना तुम्हाला भेटायचंय." राजम्मा म्हणाली.

"ठीक आहे. जमलं तर येईन." राजू म्हणाला.

त्या दिवशी इंग्रजीच्या शिक्षकांनी खास वर्ग घेतला. राजूला राघवय्यांच्या घरी जाता आलं नाही.

रंगाराव राघवय्यांचा मित्र होता. रंगाराव शहरात आला. संध्याकाळी रंगाराव आणि राघवय्या दोघं पार्कमध्ये गेले.

"या बागेपेक्षा तुझ्या बागेतलीच झाडं चांगली आहेत." रंगाराव म्हणाला.

राघवय्यांनी दुरूनच राजूला पाहिलं. मित्राबरोबर ते राजूजवळ आले. राजू बाकावर बसला होता.

"परीक्षेचं नाव सांगून बागेत बसतोस काय?" राघवय्यांनी हसत विचारलं.

"बघ पुस्तक आहेत त्याच्याजवळ. अभ्यास करतोय.–" रंगाराव म्हणाला.

"संध्याकाळची वेळ आहे. बागेतही अभ्यासच करायचा असतो का?" राघवय्यांनी विचारलं.

"मी रोजच रात्री नऊ वाजेपर्यंत इथेच बसून अभ्यास करतो. होस्टेलमधे मुलं अभ्यास करू देत नाहीत."

"इथे एका बाजूला रेडिओ, येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या गप्पा, मुलामुलींचं येणं-जाणं यात तुझा काय अभ्यास होणार?" रंगारावनं विचारलं.

"इथे मला अभ्यास करायचा असतो तेव्हा कोणी माझ्या हातून पुस्तक काढून घेत नाही. होस्टेलमधे तसं होत नाही." राजू म्हणाला.

"हे बघ राजू, आमच्या घरी मी तुला अभ्यासाला एक खोली देईन. तू तिथे बसून अभ्यास कर." राघवय्या म्हणाले.

राजू गप्प राहिला. त्याला काही उत्तर सुचलं नाही.

"होस्टेलमधे अभ्यास होणार नाही. माझ्या घरी ये, हवा तेवढा अभ्यास कर."

"परीक्षा जवळ आली आहे. आता सगळीच मुलं नीट अभ्यास करतील." राजू म्हणाला.

"तुझी मर्जी!"

रंगाराव आणि राघवय्या बागेच्या फाटकाशी आले.

" मुलगा चांगला आहे " रंगाराव म्हणाला.

" चांगलाच आहे. " राघवय्या सहमत झाले.

" तुझ्या मुलीला असा नवरा मिळाला तर मुलगा नसल्याची तुझी उणीव भरून निघेल. " रंगाराव म्हणाला.

" पण हा मुलगा खेडवळ आहे. इस्टेट पण नाही. "

" तरी पण मुलगा चांगला आहे राघव. सांग बघू तुझी इस्टेट काही कमी आहे का ? मुलाला शिकव. पुढे आला तर चांगला होईल. "

राघवय्या हसत म्हणाले, " तुझ्या वकिली सल्ल्याबद्दल आभारी आहे. फीचं बिल उद्या पाठवून दे. "

दोघा मित्रांचं या विषयावर आणखी बोलणं झालं.

रंगारावचा सल्ला राजम्मापर्यंत पोचला.

जेवताना राजम्मानं अनुराधेसमोरच विषय काढला तेव्हा तिनं राजम्माकडे अशा नजरेनं पाहिलं की तिच्या लक्षात आलं, अनुराधा राजी आहे.

खोलीबद्दल बोलणं निघालं तेव्हा अनुराधेनं विचारलं, " ते खोलीवर कधी येणार ? "

" दोन-तीन दिवसांत येतील. "

तीन-चार दिवसांनी राघवय्या बागेत राजूला भेटले. म्हणाले, " उद्या गाडी पाठवतो. सामान घेऊन ये. "

" भाऊंना विचारल्याशिवाय मला येता येणार नाही. " राजू म्हणाला.

या बोलण्यामुळं त्यांचा राजूबद्दलचा आदर अधिकच वाढला.

4

पी. यू. सी. च्या परीक्षेचा निकाल लागला. राजूला बी. एस्. सी. च्या वर्गात घालण्याची व्यवस्था झाली. त्याला मार्क खूप चांगले मिळाले होते. कॉलेज आणि होस्टेलच्या खर्चासाठी शिवय्यानं सुब्बिशेट्टीकडून कर्ज काढलं.

शिवय्या जेव्हा शहरात जायला निघाले तेव्हा राजूनं राघवय्यांची सूचना भावाला सांगितली.

" तू लहान आहेस. अडचणीत आहेस असं समजून त्यांनी म्हटलं असेल, पण

तसं कसं चालेल ?" मीनाक्षीनं विचारलं.

सुट्टीत राजूनं वहिनीला शहरातल्या अनेक गोष्टी सांगितल्या होत्या. त्यात राघवय्यांचा वाडा, अनुराधा यांचाही उल्लेख आला.

अनुराधेबद्दल जेव्हा राजू सांगायला लागला तेव्हा मीनाक्षीला आश्चर्य वाटलं. तिच्या लक्षात आलं राजू आता मोठा झालाय.

" राजू, श्रीमंतांना गरिबाबद्दल घृणा असते. आदर करणाऱ्याकडून जेव्हा अपमान होतो तेव्हा तो सहन करणं कठीण पडतं. म्हणून सध्या त्या कुटुंबापासून लांबच राहाणं चांगलं असं मला वाटतं." शिवय्यांनी आपलं मत दिलं. " जोपर्यंत आदर होईल तोपर्यंत तिथे राहायचं, नाहीतर आपलं होस्टेल आहेच." राजू म्हणाला.

वाडा आणि त्या कुटुंबाबद्दल राजूच्या मनात ओढ आहे हे दोघांही नवरा-बायकोच्या लक्षात आलं.

" बरं, अनुभवानं त्याचं त्यालाच कळेल." मीनाक्षी म्हणाली.

" त्या कुटुंबाबद्दल जर तुझं मत चांगलं असेल तर आमची काही हरकत नाही. राहायचंय तुला, तुझी मर्जी." शिवय्या म्हणाले.

" मग मी होस्टेलचे पैसे भरत नाही. एखाद्या खानावळीत जेवीन."

त्या वाड्यातली कोणती खोली आपल्याला मिळेल याचे राजू मनात मनोरे बांधू लागला.

वहिनीला म्हणाला, " तिथे माझ्या अभ्यासात काही व्यत्यय येणार नाही. कॉलिजच्या वेळेला राघवय्यांची गाडी पण मिळेल. ती नेहमी इकडे तिकडे जात असते."

मीनाक्षीच्या सर्व काही लक्षात आलं. तिनं परमेश्वराची प्रार्थना केली. " परमेश्वरा! असा वर दे की हा ज्या पायरीवर चढतोय ती जमिनीवर घट्ट रोवलेली असू दे."

कॉलेज उघडायची राजू वाट पाहू लागला तेव्हा मीनाक्षीला थोडंसं दुःख झालं.

आतापर्यंत मीनाक्षीनं राजूला मायेच्या बंधनात गुरफटलं होतं. पण आता राजूला जीवनमूल्यांची जाण आली होती.

पंख फुटत नाहीत तोवर पिलू आईकडे बघतं. पण एकदा पंख फुटले की पक्षी उडू लागतो. त्याचं आईला दुःख होत नाही. जो उडतो तो आपला मार्ग शोधतोच.

" वहिनी, निघतो." राजूनं वहिनीचा निरोप घेतला. सामान गाडीत होतं.

"तब्येतीला जप आणि खूप अभ्यास कर." वहिनीनं उपदेश केला.

राजूनं भावाला नमस्कार केला, पूर्णेचा पापा घेतला. पूर्णा म्हणायला लागली, "मी पण शहरात येणार."

"पुढच्या खेपेला नक्की नेईन." राजू म्हणाला. त्याने अन्नपूर्णेला वहिनीकडे दिलं.

गाडी शहराकडे निघाली तेव्हा राजूला मागे वळून गावाकडे पाहायचीही इच्छा झाली नाही.

शहरातला तो वाडा, ती बाग, झाडंझुडपं हीच राजूच्या मनात होती.

राजू सरळ त्या वाड्यावर गेला नाही. सामान एका हॉटेलमधे ठेवलं. जेवण वगैरे उरकून संध्याकाळी चार वाजता राघवय्यांच्या घरी गेला.

"तुझ्याबद्दलच बोलणं चाललं होतं." राघवय्यांनी राजूचं स्वागत केलं.

"सामान कुठंय ?" राजम्मानं विचारलं.

"बैलगाडीनं येत असेल" अनुराधा म्हणाली.

"मी सकाळीच आलो. सामान दुसरीकडे आहे." जागा कुठली ते सांगण्याचं राजूनं टाळलं.

राघवय्यांना वाटलं राजू होस्टेलमधे राहिलाय. कदाचित संपत्तीचा दास व्हायची त्याची इच्छा नसेल.

"तुमचे भाऊ कबूल झाले नाहीत का ?" राजम्मानं विचारलं.

"ते काही म्हणाले नाहीत. माझ्यावरच सोपवलंय."

"मग तुझी इच्छा नाही का ?"

"तुमच्याशी बोलून मग सामान आणावं म्हणून हॉटेलमधे ठेवून आलो."

"तू अगदी भोळा आहेस." राघवय्या हसले.

"ठीक आहे. राजूनं बरोबरच केलं. निमंत्रण खूप जुनं झालं होतं" राजम्मा म्हणाली.

मालकाची आज्ञा होताच मोटार पोर्चमध्ये आली. "तर मग जाऊन सामान घेऊन ये. वरची खोली तुझ्यासाठी आहे." राघवय्यांनी सांगितलं.

मोटारनं राजू हॉटेलकडे गेला. मोटारची सीट अगदी मऊ होती.

मोटारीतून उतरणाऱ्या राजूला पाहून हॉटेलचा मॅनेजर चकित झाला. त्याचं हॉटेल साधारण होतं. पण हा मुलगा तर एवढ्या महागड्या मोटारीतून आलाय.

अर्ध्या तासात राजू वाड्यातल्या खोलीवर आला. मावळतीचे किरण पातळ पडद्यातून, नारळाच्या झावळातून खोलीच्या भिंतीवर पडले होते. खिडकीतून गुलाबाचा मधुर वास आत येत होता.

खोलीच्या मध्यावर मऊ खुर्च्या वगैरे होत्या.

आपलं सामान – जुनी सतरंजी, रंग उडालेली ट्रंक कुठे ठेवायची हे राजूला

कळेना. त्याच्या मनात आलं, राघवय्यांच्या घरी येताना नवा बिछाना, नवी पेटी घ्यायला हवी होती. माझ्या जुन्या वस्तू बघून ड्रायव्हरही मनात हसला असेल. या खोलीत जो कोणी येईल, तो माझं सामान बघून नक्कीच हसेल. कुणा एखाद्या नोकराला द्यावं म्हटलं तर ही ट्रंक वहिनीच्या माहेरची आहे. सतरंजी आईची आठवण करून देतेय.

थोडा वेळ विचार करून त्यानं ठरवलं, सामान घरीच पाठवणं चांगलं.

राजम्मा खोलीत आली. म्हणाली, "राजू तू सामान कपाटात ठेव. कॉट आहे. बिछाना आहे. तुझी ट्रंक वगैरे रामय्याला दे म्हणजे तो अडगळीच्या खोलीत ठेवील."

राजम्मा त्याला देवासारखी वाटली. तिनं प्रश्न सोडवला. राजू ट्रंकेतून सामान काढू लागला, तेव्हा राजम्मा आश्चर्यानं पाहात राहिली. तिनं विचारलं, "हे सगळं कशाला ?"

"होस्टेलवर हे सगळं लागत होतं."

"होस्टेलमधे लागत असेल. आमच्या घरी या सगळ्याची जरूर नाही. हा आरसा, तांब्या, राखुंडी सगळं ट्रंकेतच राहू दे."

राजम्माच्या सल्ल्यानुसार शेवटी चार कपडेच तेवढे कपाटात गेले. बाकी सगळ्या वस्तू ट्रंकेतच राहिल्या. ट्रंक, वळकटी वगैरे सगळं अडगळीच्या खोलीत गेलं.

आठवडाभरात राजूनं वहिनीला पत्रं लिहिलं. 'या घरचे लोक चांगले आहेत. नातेवाइकासारखा माझा मान ठेवतात, आठवडाभरात काही ना काही निमित्त काढून घरमालकिणीनं मला चार दिवस हॉटेलात जाऊ दिलं नाही.

'अनुराधेबद्दल मी आधी सांगितलंच आहे. फार चांगली मुलगी आहे. तिला जरासुद्धा गर्व नाही. माझ्याशी मोकळेपणानं बोलते.

'राघवय्या या घराचे मालक. अगदी विचित्र व्यक्ती आहे. मला एक दिवस बाजारात घेऊन गेले. मी नको नको म्हटलं तरी ऐकलं नाही त्यांनी.

'माझ्यासाठी त्यांनी पँट्स् आणि बुशशर्ट विकत घेतलेत. पँट्स् तंग आहेत. कॉलेजमध्ये सर्व विद्यार्थी तसल्याच पँट्स् घालतात.

'पूर्णा काय करते ? शेतीची कामं कशी चालली आहेत ? लाल गायीला वासरू झालं की नाही ? वहिनी, पत्र लिहीत जा. आपल्या गावचे लोक इथे आले तर कुत्र्याला पाहून घाबरतील. त्यांनी मारलेली हाक माझ्या खोलीपर्यंत पोचणार नाही. तू पत्र पोस्टात टाक. कुणाच्या हाती पाठवू नकोस.'

" मीनाक्षम्मा " पोस्टमननं हाक मारली. मीनाक्षी हात पुसत पुसत आली. पोस्टमननं पत्र दिलं. मीनाक्षीला आश्चर्य वाटलं. पूर्वी मीनाक्षीच्या भावाचं पत्र येत असे. आता भाऊ वारलाय. पत्र पाहिल्यावर लक्षात आलं की ते राजूचं आहे. ओटयावरच बसून ती पत्र वाचू लागली.

शिवय्यांनी विचारलं, " कुणाचं पत्र ?"

मीनाक्षी दूध घेऊन आली. नवऱ्याच्या हातात दिलं. म्हणाली, " पत्रात काय लिहिलंय तुम्ही विचारलंच नाहीत. ?"

" तो मोहात पडलाय. त्यात आणि काय असणार ? हेच सगळं असणार." शिवय्या म्हणाले.

" यात मोह कसला ?"

" मोह नाही तर काय ? एवढे श्रीमंत लोक. चार महिन्यांच्या ओळखीत घरी बोलावतायत यात नक्कीच काहीतरी डाव आहे. होस्टेलवर शेकडो मुलं राहातात त्या सगळ्यांना ते आपल्या घरी बोलावतात का ? आईबापावेगळा मुलगा. हुशार आहे. या मुलाशी त्यांच्या मुलीचं लग्न झालं तर जावई घरातच राहील, कदाचित् त्यांची हीच इच्छा असेल."

" असेलही. पण मग त्यात तुम्हाला का वाईट वाटतं ? बरदम श्रीमंतांचा जावई झाला तर चांगलंच."

" तर मग तू खूष हो. सारं घर धुऊन मी राजूला शिकवतोय. लोक म्हणतील, मीनाक्षीनं पालनपोषण करून राजूला घरजावई होऊ दिलं."

" म्हणजे परतफेडीची अपेक्षा धरून तुम्ही राजूला शिकवताय ? परतफेड झाली नाही तर काय राजू परका होईल ? "

" मीनाक्षी, जरा थंडपणे विचार कर. तू राजूचं मुलासारखं पालनपोषण करत आली आहेस. मुलाकडून वडिलांनी परतफेडीची अपेक्षा केली तर त्यात गैर काय आहे ? म्हातारपणी राजू आपल्याला मदत करील अशी अपेक्षा करणं चुकीचं नाही. आपण किती कर्ज काढलंय टाऊक आहे ?

" रांधलेलं अन्न आणि पिकलेलं धान्य कुणाच्या तरी हाती सोपवण्यात काही मोठेपणा आहे असं मला वाटत नाही. आपली वस्तू आपणच हरवून बसलो तर तो मूर्खपणा होईल."

नवऱ्याच्या युक्तिवादात मीनाक्षीला काही चूक आढळली नाही. मीनाक्षीच्या लेखी तोच मुलगा आणि तोच दीर. मोठा झाल्यावर राजू वेगळा होईल असं मीनाक्षीच्या मनातच आलं नाही. तो या घरचा मुलगा आहे, या घराची कीर्ती वाढवील अशी मीनाक्षीची समजूत होती. राजूच्या शिक्षणापायी शिवय्या कर्ज-

बाजारी होतायत हेही खरंच आहे. राजू जर वेगळा होणार असेल तर मीनाक्षी त्याला कशी आडवणार ? तो त्यांचा मुलगा नाही, मीनाक्षी त्याची आई नाही.

मीनाक्षीला वाटलं– आम्ही त्याच्याकरिता सारं काही करतो आहोत म्हणून नवऱ्याला वाटतं, राजूनंही आपलं कर्तव्य करावं. देव दोघा भावांचं रक्षण करो.

इतक्यात रंगय्यानं बाहेरून मीनाक्षीला हाक मारली.

मीनाक्षी बाहेर आली.

रंगय्यानं सांगितलं, " मी शहरात गेलो होतो. राजू भेटले, पूर्णेसाठी हे खेळणं दिलंय. "

मीनाक्षीनं खेळणं घेतलं. मीनाक्षीचे डोळे आसवांनी भरले––

' राजू तुझ्याबद्दल आमच्या मनात किती शंका आल्या. तू वहिनीला विसरणार नाहीस, पूर्णेवरची माया आणि भावाचा मान तू कधी कमी करणार नाहीस. '

राघवय्या सकाळी कॉफी पीत होते. नाक मुरडत राजम्मा नवऱ्याजवळ आली. म्हणाली, " तुमच्या कानावर ही बातमी आली का ?"

" कुठली बातमी ? तू सांगितली नाहीस तर मी कसा ऐकणार ? सगळ्याची चावी तर तुझ्याजवळच आहे."

" हसवण्यावारी नेण्याची गोष्ट नाही ही ! " राजम्मा रागानं म्हणाली, " काल राजू अनुराधेला आपल्या गावाला घेऊन गेला होता."

" मग परत आले ना ते ?"

" सगळं बोलणं तर ऐका."

" त्यात काय ऐकाचंय ?"

" बापासारखीच मुलगी."

" अनुराधा पण असंच म्हणाली का ? फार चांगलं केलं."

" तुम्हाला गोष्ट साधी वाटते. कुणाला सांगितल्याशिवाय राजूनं मुलीला आपल्या गावी नेलंच कसं ? एवढी मोकळीक त्याला कुणी दिली ? "

" मग तुझी मुलगी कशी गेली ?" राघवय्यांनी विचारलं.

" मुलगी लहान आहे. तिला काय कळतंय ?"

" मग मीनाक्षीही असंच म्हणेल, मुलगा लहान आहे त्याला काय कळतंय ? दोघं गेले, परत आले. यात फार मोठं काही नाही."

" तेवढंच नाही दोघं पायी आले. लोक काय म्हणतील ?"

" काय म्हणतील ? म्हणतील राजम्माच्या मुलीला पैशाची घमेंड नाही."

" कृपा करून तुम्ही वाद घालायचं सोडून त्या मुलाला समज द्या–पुन्हा त्यान असं कधी करू नये."

" कुणाला समज द्यायची आहे ? " असं विचारत अनुराधा खोलीत आली.

" तुलाच."

" माझं काय चुकलं ? "

" मोटार न घेता चालत गावी गेलीस. त्यामुळे तुझ्या आईवडिलांचा किती अपमान झाला, कल्पना आहे ? " राघवय्यांनी खोट्या रागानं विचारलं.

वडिलांचा आशय अनुराधेच्या लक्षात आला.

" आईला न सांगता तू निघून गेलीस तर आई किती काळजीत पडली ? "

" आधी जायचं ठरलं नव्हतं. नदीच्या काठावर बसून मी आणि राजू गप्पा मारत होतो. गावाचा विषय निघाला. माझ्या मनात गाव पाहायची इच्छा झाली. अंधार पडण्यापूर्वीच आम्ही गावाहून परत येणार होतो. पण राजूच्या वहिनीनं येऊ दिलं नाही. " अनुराधेनं सांगितलं.

त्याचं असं झालं, राजू राघवय्यांच्या घरी गेला तेव्हा पहिल्या वर्षी काही घडलं नाही. आठवड्यातून दोनतीन वेळा राजम्माच्या आग्रहावरून राजू त्यांच्या घरीच जेवायचा. अनुराधा राजूच्या खोलीत जाऊन कठीण धडा शिकून घ्यायची. ड्रायव्हर रोज आठवणीनं त्याला मोटारीनं कॉलेजला पोचवायचा.

दुसऱ्या वर्षी अनुराधा पी. यु. सी. च्या वर्गात आली तेव्हा राजूची आणि तिची मैत्री अधिकच दृढ झाली. दोघं मिळून कॉलेजला जायचे, मिळून घरी परत यायचे.

सुंदर मुलीबरोबर मोटारमधून उतरणाऱ्या राजूकडे सर्वांचं लक्ष जाणं साहजिकच होतं.

एकदोघांनी विचारलंसुद्धा, " ही मुलगी कोण ? " " लकी चान्स, " मित्र म्हणाले.

राजू आणि अनुराधेला अडवणारं त्या घरात कोणी नव्हतं. त्यामुळे ते खूप जवळ आले. स्त्री-पुरुषातलं आकर्षण हा मानवी स्वभाव आहे. लोक म्हणायला लागले, जोडा चांगला आहे.

ऑक्टोबर महिना संपल्यावरही नदीला खूप पाणी होतं. राजूबरोबर अनुराधाही संध्याकाळी त्या नदीच्या काठी जायची, दोघं तिथं बसून खूप उशिरापर्यंत गप्पा मारायचे. त्या दिवशी पोस्टमननं राजूला एक पत्र दिलं होतं. ते वहिनीचं पत्र होतं. नदीकाठी गेल्यावरच राजूनं ते पत्र उघडलं. अनुराधेनं आधीच मोटार परत पाठवली होती आणि ड्रायव्हरला सांगितलं होतं, एका तासानं ये.

राजूनं पत्र वाचलं. म्हणाला, " पूर्णा उद्या शाळेत जाईल."

" पूर्णा कोण ?"

" माझ्या भावाची मुलगी. तिची प्रकृती तेवढी बरी नसते. गेल्या वर्षीच तिला शाळेत घालायला हवी होती. पण झालंच नाही."

क्षणभर इकडे तिकडे पाहून राजू म्हणाला,

" मोटार गेली का ?"

" मी पाठवून दिली. तासाभरानं येईल."

" पूर्णेसाठी पाटी घ्यायची आहे "

" चला दोघंही बाजारात जाऊ. बाजार जवळच आहे. घेऊन टाकू."

लहानशी पाटी, एक लहानशी पिशवी, एक फ्रॉक, चित्रांचं पुस्तक वगैरे राजूनं खरेदी केलं.

राघवय्यांच्या घरी जेवत असल्यामुळे राजूजवळ जेवणाचे पैसे शिल्लक राहायचे. त्या पैशांतून काही ना काही खरेदी करून राजू पूर्णेसाठी किंवा भावासाठी पाठवायचा. वस्तू खरेदी करून दोघं परत नदीकाठी आले तरी मोटार आली नव्हती. राजू मोटारीसाठी वारंवार इकडे तिकडे पाहात होता.

अनुराधेनं विचारलं, " काय झालं ? "

" मोटार येताच तू घरी जा. मी गावी जाऊन येतो." सुरुवातीला राजू अनुराधेला 'अहो' म्हणायचा. मग अनुराधेनंच त्याला मनाई केली. तेव्हापासून ते दोघं एकमेकांना एकेरी संबोधू लागले होते.

" चल तर मग मी पण येते. दोघंही गावी जाऊन येऊ."

" मी पायी जाणार."

" मलाही पायी येता येतं."

रस्ताभर राजू काही ना काही सांगत चालला होता. गावाच्या सवयी, भांडणं, शेतं वगैरेबद्दल बोलत बोलत दोघं गावाला पोचले.

" ते लाल ओट्याचं घरच माझं आहे. वहिनी नेहमी ओटा सारवून स्वच्छ ठेवते. दर महिन्याला सगळं घर लिंपून काढते आणि रंगवते.

" कपडे मळके असतील, पण घर अस्वच्छ असणं वहिनीला सहनच होत नाही. एवढं काम करूनसुद्धा नेहमी हसत असते."

" भाटासारखी वहिनीची मोठी स्तुती करतोयस. जरा गप्प बस. तुझ्या वहिनीला मी पाहीन तेव्हा ठरवीन. "

ओटयावर शिवय्या पूर्णेला मांडीवर बसवून ‘ बेमन ’ची गाणी शिकवत होते. पूर्णा सही सही वडिलांचं अनुकरण करत होती. शिवय्यांना त्याचा खूप आनंद होत होता. घरासमोर येताच ‘ हे माझे भाऊ ’ म्हणून राजूनं शिवय्यांची ओळख करून दिली.

ती मुलगी पूर्णा आहे हे राधेच्या लक्षात आलं.

राजू आणि अनुराधेला पाहून शिवय्या चकित झाले. खादीचं जाडंभरडं धोतर, खांद्यावर पंचा, असलेले शिवय्या उठले आणि त्यांनी दोघांचं स्वागत केलं.

“ राघवय्यांची मुलगी अनुराधा ”–राजूनं ओळख करून दिली.

“ या, आत या. ”

पूर्णेनं राजूच्या पायांना मिठी मारली.

“ आमची पूर्णा उद्यापासून शाळेत जाणार ”–राजूनं पापा घेतला.

“ काका काका, मला दोन गाणी येतात. ” पूर्णा म्हणाली.

“ गाऊन दाखव बरं. ”

पूर्णेनं सुरुवात तर केली, पण अनुराधेला पाहून लाजली.

अनुराधेच्या मनात आलं, मला अशी एखादी लहान बहीण नाही. मागीलदारानं मीनाक्षी धार काढून आत येत होती. शिवय्या म्हणाले, “ मीना, कोण आलंय ओळख पाहू. ”

मीनाक्षी स्वयंपाकघरात दूध ठेवून बाहेर आली. वरदराजूशेजारी उभ्या असलेल्या मुलीला पाहून ती समजली की ती अनुराधा आहे. ‘ ही मुलगी जर राजूची बायको झाली तर नशीब उजळेल,’ तिच्या मनात आलं.

“ ही ”–राजूनं ओळख, करून द्यायला सुरुवात केली.

तेव्हा मीनाक्षी म्हणाली, “ मी ओळखलं, अनुराधा आहे. ”

“ वहिनींना माझं नावही कसं ठाऊक आहे ? ” अनुराधेनं विचारलं.

“ मग ही माझी वहिनी आहे हे तुला कसं कळलं ? ” राजूनं विचारलं.

‘ कळलं बरं ! ’ अनुराधेनं अंगठा दाखवला.

“ त्यात काय झालं, जी माणसं मला आवडतात त्यांची मी परस्पर ओळख करून देतोच. ” राजू म्हणाला.

भिंतीशी उभी केलेली नवारीची बाज घालून मीनाक्षीनं अनुराधेला त्यावर बसायला आग्रह केला.

अनुराधा बाजेवर बसून घराचं निरीक्षण करू लागली.

“ आमची घरं काही तुमच्या वाड्यासारखी नाहीत. ” मीनाक्षी म्हणाली.

“ ताडाच्या झावळ्यांची किंवा कुडाची घरं मी पाहिली होती पण —”

"या घराच्या छपरावरही गवत आहे. पण त्याच्याखाली माती लिंपलेली आहे. त्यामुळे आग लागायची भीती नसते. त्यांना (गवती) झोपड्या म्हणतात. छपराच्या खाली बांबूच्या चटया लावून त्यावर माती लिंपतात." मीनाक्षीनं सांगितलं.

अनुराधेला मीनाक्षीनं सगळं घर दाखवलं. व्हरांड्यात धान्याच्या दोन पुरुष-भर उंचीच्या कणग्या होत्या. स्वयंपाकघरात दोन चुलीच्या जोड्या होत्या. गोठ्यात पेंड भरलेली दोन गाडगी होती. अनुराधेनं सगळी माहिती करून घेतली. हेमेनं विहिरीचं पाणी शेंदून काढलं आणि म्हणाली, "या दोरानं शेंदलं तर हात रक्त-बंबाळ होतील."

"सवय व्हायला हवी. माझे हात बघ." मीनाक्षीनं आपले हात दाखवले.

अनुराधेनं मीनाक्षीच्या हाताकडे पाहिलं. मीनाक्षीच्या सोन्याच्या बांगड्या राजूच्या बी. एस्.सी. च्या दुसऱ्या वर्षाची फी भरायच्या वेळी गहाण टाकल्या होत्या. तिच्या हातात काचेच्या बांगड्या पाहून अनुराधेला आश्चर्य वाटलं.

"आमची शेतं जर नीट पिकली तर आम्हाला काहीही कमी पडणार नाही. गेली दोन वर्षं ऐनवेळेला पिकांवर कीड पडतेय. म्हणून वहिनीच्या बांगड्या माझ्या शिक्षणासाठी गहाण टाकल्यायत. माझं शिक्षण संपलं, मला नोकरी मिळाली की माझं पहिलं काम म्हणजे वहिनीच्या बांगड्या सोडवून आणणं–" राजू म्हणाला.

"परीक्षेत तू पहिला येशील–" अनुराधा म्हणाली.

"पहिला आलो तर तेवढ्यानं काय होतंय ? मला नोकरी पण मिळायला हवी, तरच पहिला आल्याचा काही उपयोग होईल." राजू म्हणाला.

"राजू, तू हे काय केलंस ? एकदमच या मुलीला घरी आणलंस. मोठ्या घरची मुलगी आहे. आपल्याकडे नीट खाणं-पिणं करायचीही सोय नाही." शिवप्पा म्हणाले.

"आधी माझं पण यायचं ठरलं नव्हतं. वहिनीचं पत्र मिळालं पूर्णेला शाळेत घालणार म्हणून. पाटी वगैरे देण्यासाठी मी आलो तर ही पण माझ्याबरोबर आली. तिला तर चालायचीही सवय नाही..."

"वा, मला अगदी पाठंगुळीला मारून आणल्यासारख्या गप्पा चालल्यायत महाराज ! माझं ओझं काय तुमच्या डोक्यावर लादलंय ?" अनुराधेनं विचारलं.

"येताना ओझं वहावं लागलं नाही. पण अंधार पडायला लागलाय. जाताना ते काम करावंच लागेल. बरं चल, आता आपण निघू या." राजू म्हणाला.

"वरदम, अनुराधेला तशीच घेऊन जाणार ? दूध पिऊन घ्या. नंतर बघू. आज शनिवार आहे. उडदाची उकड काढणार आहे. पीठ तयार आहे. तोपर्यंत

अनुराधेला आपला भाजीचा मळा दाखव." मीनाक्षीनं सांगितलं.

"भाजीचे मळे खूप पाहिलेत. पण उडदाची उकड कशी काढतात मला ठाऊक नाही. मी तुमच्याजवळ बसेन, सगळं पाहून घेईन." अनुराधा म्हणाली आणि स्वयंपाकघरात शिरली.

सर्वांना आश्चर्य वाटलं. मनात आलं, ही मुलगी किती चांगली आहे.

लाल लाल तापलेल्या मडक्यात पीठ घालून त्यावर निखारे ठेवले गेले.

पंधरा मिनिटांत उकड तयार झाली.

"ही उकड मला कधी करता येणार नाही." अनुराधेनं सांगून टाकलं.

"मला कुठं वीणा वाजवायला येते ? चांगलं गायला येतं का ? सगळी कामं सगळ्यांची नसतात." मीनाक्षी म्हणाली.

"म्हणजे राजू माझ्याबद्दल सगळी माहिती देतो वाटतं ?" अनुराधेनं विचारलं.

"विशेषतः तुझं संपूर्ण वर्णन . . ." मीनाक्षीनं अनुराधेच्या डोळ्यांकडे पाहिलं. अनुराधेचे डोळे चमकले. ती थोडीशी लाजली पण !

खाणंपिणं होता होता अंधार पडला होता. मीनाक्षी म्हणाली, आज रात्री इथंच राहा, अंधार झालाय. उद्या सकाळी दोघंही जा."

"मी राहिले असते, पण आईला सांगितलं नाही. तिला काळजी वाटेल." अनुराधा म्हणाली.

शिवऱ्यांनी गडबडीनं जाऊन अप्पांची गाडी आणली.

"राजूबाबू, पूर्णा शाळेत जाणार आणि तुम्ही राहाणार नाही ?" रामलूनं विचारलं. राजू म्हणाला, "अनुराधा बरोबर आहे."

"मग मी त्यांना सुरक्षित घरी पोचवून येतो." रामलू म्हणाला.

मीनाक्षी म्हणाली, "अनुराधा एकटी नाही जाणार, राजूही बरोबर जाईल."

अनुराधा म्हणाली, "मी एकटी जाईन, तुम्ही राहा."

"नाही, मी येतो ना." राजू तयार झाला. पूर्णेला उचलून म्हणाला, "पूर्णा तू नीट अभ्यास कर."

"काका, मी खूप शिकेन. इतकं शिकेन . . ." पूर्णेनं हात पसरून दाखवला.

"मग पुढच्या वेळेला मी मोठ्ठं पुस्तक आणीन." म्हणत अनुराधेनं पूर्णेचा पापा घेतला.

राजू बी. एस्.सी. ची शेवटची परीक्षा देऊन घरी आला. पूर्णा दुसरीत गेली. सुट्टी मोठ्या आनंदात गेली.

परीक्षेचा निकाल जवळ आला होता. राजूला वाटलं, आता आपण काय करावं ? एम्. एस्.सी. ला दोन वर्ष लागतील. खूप पैसा खर्च होईल. भाऊ तरी किती कर्ज काढणार ?

परीक्षेचा निकाल लागला.

राजू प्रथम वर्गात प्रथम क्रमांकानं उत्तीर्ण झाला.

मीनाक्षीनं वरदमला पोटाशी धरलं. मीनाक्षीच्या दृष्टीनं राजू अजून तोच धाकटा दीर होता.

" काय झालं ? काय झालं ? " शिवय्यांनी घाईघाईनं विचारलं.

" वरदम फर्स्ट क्लासमधे पास झाला. " मीनाक्षीचा चेहरा फुलला होता.

शिवय्याला खूप आनंद झाला.

मीनाक्षीनं जवळपासच्या घरांतून आपल्या दिराच्या यशाची बातमी दिली. जरा वेळानं घरी आली तर कुणी एक माणूस नवारीच्या खाटेवर येऊन बसलेला दिसला.

वरदराजू कपडे बदलून बाहेर आला— म्हणाला, " चला निघू या. "

मीनाक्षीला काही कळलं नाही. " हे राघवय्यांचे मुनीम आहेत. त्यांनी राजूला बोलवण्यासाठी यांना पाठवलय. राजू शहरात जातोय–" शिवय्या म्हणाले, " परीक्षेत पास झाल्याचं कळलं असेल. दोन वर्षं त्यांच्या घरी होता. मुलीलाही राजूबद्दल फार प्रेम होतं म्हणून निरोप पाठवला असेल. "

राघवय्या आणि राजम्मा दोघंही राजूची वाट पाहात होते. " ये ये. अभिनंदन ! " नवराबायकोनी राजूचं स्वागत केलं. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. नंतर राघवय्यांनी विचारलं, " आता पुढे तू काय करणार आहेस ? "

राजूनं काहीच ठरवलं नव्हतं. तो म्हणाला, " मला नोकरी करायची इच्छा आहे. " राजूच्या मनात आलं, राघवय्यांनी नोकरी दिली तर फार चांगलं.

" अजून तू लहान आहेस. आतापासूनच नोकरी करायची काय जरूर आहे ? एम्. एस्सी. हो. "

" वय लहान आहे खरं, पण आमच्या कुटुंबाची परिस्थिती चांगली नाही. गेली तीन वर्षं आमचं पीक फारसं चांगलं आलं नाही. कुटुंबाचा खर्च चालवणं पण कठीण होत चाललंय. तुम्ही मला थोडी बहुत मदत केलीत म्हणून तर मी आजपर्यंत शिकू शकलो. भाऊ कर्जबाजारी झालेत. "

" मी पैसे देईन. तू पुढचं शिक्षण चालू ठेव. " राघवय्या म्हणाले.

" आता आणखी कर्ज काढणं अशक्य आहे. आम्हाला जमीन बिमीन विकावी लागेल. मी नोकरी करणंच बरं. " राजू म्हणाला.

राघवय्यांनी पत्नीकडे पाहिलं.

राजम्मानं बोलणं सुरू केलं– " राजू तुझं अभ्यासात डोकं आहे. हुशार आहेस. पण व्यवहारात अगदी कच्चा आहेस. आमचं म्हणणं आजपर्यंत तुझ्या लक्षात आलेलं नाही. आमची तुला कर्जरूपानं पैसे देण्याची इच्छा नाही. याचा अर्थ असा की आमच्या जावयाच्या शिक्षणाची आम्ही व्यवस्था करतो आहोत. आता कळलं का ? अनुराधेशी तुझं लग्न लावण्याची आमची इच्छा आहे. तुझ्या घरी जाऊ आणि तुझ्या भावाला आणि वहिनीला सांग. " नोकरीबीकरीच्या भानगडीत पडायची जरूरी नाही. एम्. एस्.सी. चा फॉर्म भर. पैशाची व्यवस्था करू. "

राघवय्या हसले आणि म्हणाले, " माझंही हेच मत आहे " राजूचे डोळे अनुराधेला शोधू लागले.

राजू गावी गेला. राघवय्यांचं म्हणणं सांगितलं, पण त्यातला लग्नाबद्दलचा भाग वगळला.

" तू काय उत्तर दिलंस ?" शिवय्यांनी विचारलं.

" मी सांगितलं– भाऊंना विचारायला हवं. " या उत्तरानं शिवय्या खूष झाले. म्हणाले, " ठीक आहे, विचार करू. ";

" वेळ कमी आहे. फॉर्म लवकर पाठवावा लागेल. नाहीतर जागा मिळणं कठीण आहे. "

" जागा का नाही मिळणार ?" मीनाक्षीनं विचारलं.

" वहिनीसाहेब, माझ्यासारखे अनेक लोक असतील."

" मग अर्ज करून टाक. पैशाची व्यवस्था मी करतो. घर आहेच. त्यावर पैसे मिळतील. " शिवय्यांनी सांगितलं.

त्या दिवशी राजूनं अर्ज पाठवून दिला.

राजूला प्रवेश मिळाला. तीन दिवसांच्या आत पैसे भरायचे होते. राघवय्यांकडून काही कळलं नाही. " कोणीही फुकट पैसा कशाला देईल ? राघवय्यांनी गमतीनं काहीतरी म्हटलं असेल. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून बसलं तर कसं चालेल ? " मीनाक्षी म्हणाली.

शिवय्या सुब्बिशेट्टीकडे गेला. " खेड्यात घर कोण घेणार ? तुझा भाऊ शिकतोय. तरीपण मी तुझ्याकडे पाहून पैसे देतो. " सुब्बिशेट्टी म्हणाला. घर गहाण लिहून घेऊन आठशे रुपये दिले.

पैसे घेऊन शिवय्या घरी परत आले. पाहिलं तर घरासमोर मोटार उभी होती. खेड्यात कधी कुठली मोटार येत नाही. फक्त निवडणुकीच्या दिवसांत येते. ड्रायव्हर पांढरे कपडे घालून मोठ्या साहेबासारखा दिसत होता. मोटारीला मुलांनी चारीही बाजूंनी घेरलं होतं.

घरात चार-पाच माणसं होती. गावचे लोक मोठ्या कुतूहलानं त्या लोकांकडे पाहात होते.

मोटारीतून पांढरेशुभ्र कपडे घातलेली एक व्यक्ती उतरली. तिच्याबरोबरच सिल्कची साडी नेसलेली, दागिन्यांनी मढवलेली एक स्त्री उतरली. जेव्हा ते दोघं शिवय्यांच्या घराची चौकशी करीत होते तेव्हा सर्वांना कळलं, ते राघवय्या आहेत.

खोलीत मुन्सफांच्या घरच्या तीन खुर्च्या मांडल्या होत्या. समोर खाटेवर बाई बसल्या होत्या. राजू ओटचावर होता. मीनाक्षी तीन ग्लासांतून दूध आणि काही खाद्य पदार्थ घेऊन आली.

"हेच माझे भाऊ–" राजूनं शिवय्यांची ओळख करून दिली.

शिवय्या आणि राघवय्यांनी एकमेकांना नमस्कार केला.

"नमस्कार आईसाहेब! आपली ओळख आधीच करून दिलीय. आज आपलं दर्शन घडलं. मोठा आनंद वाटला. आमच्या खेड्यात खुर्च्याही चांगल्या नमतात." शिवय्या म्हणाले.

"खुर्च्या, कोच वगैरे आता आलेत. आधी खाटेवरच भागवलं जात होतं." राघवय्या म्हणाले.

"भाषण बंद करून कामाबद्दल बोला." राजम्मानं नवऱ्याला टोकलं.

"राजूनं आपल्याला सांगितलंच असेल. . . ."

हे ऐकताच मीनाक्षीचा चेहरा पांढराफटक पडला. कर्ज देण्यासाठी नवराबायको इतक्या लांब आलेत! आल्यापासून राजम्मा त्या घरातली प्रत्येक वस्तू चिकित्सक दृष्टीनं पाहात होती. इतरांचा विचार न करता कुचकुचत होती.

मीनाक्षीच्या मनात आलं, आईत आणि मुलीत केवढं अंतर आहे.

राघवय्यांचं म्हणणं शिवय्यांच्या लक्षात आलं नव्हतं. तरी पण ते म्हणाले, "हो राजूनं सांगितलं, पण तुम्हाला त्रास देणं बरं नाही म्हणून दुसरीकडून व्यवस्था केलीय."

राजम्मा चकित झाली. आम्ही मुलगी द्यायला आलोत आणि हा झोपड्यात राहाणारा मोठा मिजास मारतोय. "पैशाच्या गोष्टीशिवाय राजूनं आपल्याला काहीच सांगितलं नाही?" राजम्मानं विचारलं.

राजूनं मान खाली घातली.

मीनाक्षी आणि शिवय्या या बोलण्यावर गप्प झाले.

" राजूनं काही सांगितलं नाही. " शिवय्यांनी उत्तर दिलं.

" आम्ही म्हटलं होतं अनुराधेचं राजूशी लग्न करायचं– याबद्दल राजूनं तुम्हाला सांगावं. "

" राजू तू काहीच बोलला नाहीस ?"

शिवय्यांनी आश्चर्य व्यक्त केलं.

राजू गप्प राहिला.

" स्वतःच्या लग्नाबद्दल स्वतःच बोलणं राजूला अवघड वाटलं असेल." मीनाक्षीनं राजूची बाजू घेतली.

" ठीक आहे. आता तर गोष्ट स्पष्ट झाली आहे ना ? आम्हाला तुमचं मत हवंय. " राजम्मा म्हणाली.

" आपल्यासारखे थोर लोक आमच्या घरी येऊन मुलगी देण्याचं वचन देतात; तर आम्ही कसे नाकारणार ? " शिवय्यांनी विनयानं म्हटलं.

" असं पाहा शिवय्याजी, अनुराधा माझी एकुलती एक मुलगी आहे. अनुराधेला आपण पाहिलीच आहे. शहरात माझी तीन घरं आहेत. माझा साखर कारखाना आहे. काही कंपन्यांत शेअर्स आहेत. माझी सगळी इस्टेट राधेची होईल. गेली तीन वर्ष आम्ही तुमच्या भावाला पाहातोय. मुलगा चांगला आहे. विनयशील आहे. राधेलाही राजू आवडलाय.

" श्रीमंत जावयाच्या लोभानं आम्हाला मुलगी लांब द्यायची नाहीय. राजू जावई झाला तर जोडपं आमच्या डोळ्यांसमोर राहील, एवढीच इच्छा आहे. " राघवय्यांनी स्पष्ट सांगितलं.

शिवय्यांना उत्तर देता आलं नाही. त्यांनी मीनाक्षीकडे पाहिलं.

" आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला कबूल असेल तर हळद वाटून वाङ्निश्चय करता येईल. " राजम्मा म्हणाली.

" म्हणजे तुम्ही राजूला घरजावई करणार आहात ? " शिवय्यानं विचारलं.

" तसं नाही पण स्पष्ट बोललेलं बरं. एवढं शिक्षण घेतल्यावर राजू काही खेड्यात राहाणार नाही. नोकरी किंवा व्यापाराच्या निमित्तानं त्याला एखाद्या शहरातच राहावं लागेल. माझे तीन वाडे आहेत. एकात ते राहातील. एवढंच माझं म्हणणं. अनुराधेचं सुख ते आमचं सुख. तीच आमची मुलगी, मुलगा सर्व काही आहे. शिवाय हे गाव आणि शहर यात अंतर ते किती ? तिकडे गाडीत पाय ठेवला की इकडे घरी पोचला. " राघवय्यांनी समजावलं.

" जी गोष्ट तुम्ही अनुराधेच्या बाबतीत म्हणालात, तीच मला राजूबद्दल सांगायची आहे. माझ्या पत्नीनं राजूचं पालनपोषण करून त्याला वाढवलं. माझा

भाऊ, मुलगा सगळं तोच आहे. मला शंका आली की, तुम्ही त्याला घरजावई करणार आहात. आपण गैरसमज करून घेऊ नका." शिवय्या म्हणाले, " जर राजूला हे लग्न पसंत असेल तर आम्हालाही पसंत आहे."

राजम्माला ही बोलणी आवडली नाहीत. पण तिनं मनाशी विचार केला, लग्न होऊ दे, मग बघू.

गावातल्या बायका आल्या, मोटारीतून वस्तू बाहेर काढल्या. अर्ध्या तासात हळद लावली गेली. वधू-वरांकडून रिवाजाप्रमाणं शकुनाचे आहेर दिले गेले. वाङ्‌निश्चय झाला.

" आपण खूप चतुर आहात. घरून येतानाच सगळी व्यवस्था करून आलात !" मीनाक्षी म्हणाली.

" सारखं सारखं येणं कठीण पडतं. अनुराधा खूप स्तुती करीत होती. असो. आता आपण सोयरे झालोत." राघवय्या म्हणाले.

राजम्मा गप्प होती.

मोटर निघाली. पुलापर्यंत पोचली तेव्हा राजम्मा म्हणाली, "अगदी भाटासारखे तुम्ही त्या मीनाक्षीची स्तुती करीत होतात."

" मीनाक्षी चांगली आहे. भरली घागर आहे."

" बाप आणि लेक दोघं मीनाक्षम्माचं भजन करीत राहा. पण आत्ताच सांगून ठेवते— इतकं डोक्यावर चढवलंत तर वर्षभराच्या आत मीनाक्षी, नदीवरून पाणी आणण्यासाठी तुमच्या मुलीच्या डोक्यावर घागर देईल !"

" बरंच होईल. त्यामुळं प्रकृती सुधारेल. नाहीतर तुझ्यासारखीच राधा पण गरगरीत होईल."

राजम्मा काहीतरी बोलणार होती, पण ड्रायव्हरकडे पाहून गप्प बसली.

5

शिक्षणासाठी आणलेला पैसा लग्नात खर्च झाला. अनुराधेसाठी शिवय्यानं दोन रेशमी साड्या घेतल्या. राजूसाठी सूट शिवला.

अनुराधा आणि राजू यांचं लग्न मोठ्या धूमधडाक्यानं झालं. चहा-पाणी जेवण, भरतनाट्यम् वगैरे चांगले कार्यक्रम होते. काही लोक वधूला भेट देऊन गेले. वऱ्हाडातले सगळे लोक अगदी खूष झाले.

पण का कोण जाणे लग्नात शिवय्याना वाटलं आपला अपमान होतोय.

"अपमान नाही, आपण त्या वातावरणाशी अपरिचित आहोत." मीनाक्षी नवऱ्याची समजूत काढीत होती.

लग्नाच्या त्या तीन दिवसांत राजम्मा चांगली वागली. मुलीच्या आईमारखंच तिचं वागणं विनयशील होतं. राजम्माच्या वागण्यावर मीनाक्षीही खूष होती.

पूर्णेची देखभाल करण्याचं काम अनुराधेनं आपल्यावर घेतलं. पूर्णा अनुराधेला सोडीतच नव्हती.

"आपल्या घरी अशी मुलगी असती तर किती बरं झालं असतं." अनुराधा आईला म्हणाली.

"ते ठीक आहे. त्या मुलीचे पाय बघ, किती धुळीनं माखलेत ! तुझी साडी मळेल." आई म्हणाली.

"मी पूर्णेचं तोंड बघतेय, तर तू पाय बघतेस," म्हणत अनुराधा आईपुढून निघून गेली.

"सासरचा केवढा मान ठेवतेय. काल्च तर लग्न झालं." राजम्मानं नवऱ्याला म्हटलं.

"अनुराधेला पूर्णा फार आवडते." राघवय्या म्हणाले.

राघवय्यांचं कुटुंब जेव्हा गावातून शहरात जायला निघालं तेव्हा मीनाक्षीनं शेवंतीचा एक दागिना अनुराधेला दिला. म्हणाली, "ही तुझ्या मामूची भेट आहे, त्यांचा आशीर्वाद म्हणून मिळालेली वस्तू आहे."

"मग तुम्हीच मला घाला." अनुराधा म्हणाली.

मीनाक्षीनं दागिना चढवला.

एवढ्यात राजम्मानं हांक मारली, "चल लवकर."

त्या दिवशी राजू कॉलेजमधून लवकर आला. काही विचार करीत आपल्या खोलीत जात होता. एवढ्यात, अनुराधेनं पाठीमागून येऊन राजूच्या खांद्यावर हात ठेवला.

"राधा!" म्हणून राजूनं राधेचा हात हातात घेतला.

"महाशय रस्ता विसरलात. ती तुमची जुनी खोली आहे. आता खोली बदललीय. ती इकडे आहे." राधेनं रस्ता दाखवला.

"राधा, आज दिवसभर माझी हीच अवस्था होतेय. लेक्चरर वर्गात काहीतरी

शिकवत होते, माझ्या काही लक्षात येत नव्हतं. म्हणून मी लवकर घरी निघून आलो. राधा, तू कॉलेजला नाही गेलीस ?"

"तुम्हाला वर्गात बसावंसं वाटत नाही तर मला कॉलेजला जायचीच इच्छा झाली नाही. बिछान्यावर पडल्या पडल्या रात्रीच्या गोष्टी आठवत कल्पनेच्या रम्य जगात विहार करीत होते."

"या सगळ्याचं कारण ?" राजूनं भोळेपणानं विचारलं.

"कारण मला माहीत आहे."

"काय कारण आहे ?"

"विवाहो विद्यानाशाय– तुम्ही कधी ही म्हण ऐकली नाहीत का ?"

"तसं कधी होतं का ?"

"होऊ नये– अशीच माझी इच्छा आहे."

"मग काय करावं ?"

"तुम्हीच सांगा– "

"तर मग मी होस्टेलवर जातो."

"समोरच्या त्या ओट्यावर बसून मुलींचा वाडा पाहायला का ?"

"मग तूच काहीतरी मार्ग दाखव."

"काही नाही. आपलं नवीनच लग्न झालंय. 'नवं ते हवं आणि जुनं ते टाकावं" अशी म्हण आहे. हळूहळू आपला अनुभव जुना होईल.

"हळूहळू आपल्याला त्याची सवय होईल. नवानवाच अनुभव आहे म्हणून आपण बावरून गेलो आहोत." राधेनं समजावलं.

"तुला बऱ्याच म्हणी येतात तर !"

"ते जाऊ दे. आपण आधी कपडे बदला."

"पुन्हा तू 'आपण' म्हणायला लागलीस."

"कोण जाणे का, 'आपण' म्हणण्यात मला आनंद वाटतो. तेव्हाच तुमचा मान मी राखतेय अशी भावना माझ्या मनात निर्माण होते."

"मग मी पण तुला आपण म्हणायला सुरुवात करू ?"

"तेव्हा मला असं वाटेल, की आपण मला दूर करताय."

"तुझं म्हणणं चमत्कारिक वाटतं राधा."

"यात चमत्कारिक वगैरे काही नाही. आपल्यात नवऱ्याचा मान राखण्यासाठी 'आपण' म्हणायची पद्धत आहे आणि अशा पद्धती सोडायच्या म्हणजे नवेपणा वाटणारच."

"प्रत्येक गोष्टीचं असंच असतं. ती आधी विचित्र वाटते, नंतर आपल्याला

त्याची सवय होते."

" यात दुसरीही एक गोष्ट आहे. पहिल्यासारखं मी एकेरी हाकारलं तर या घरातले इतर लोकही तसंच म्हणतील. या घरात आपला मान कमी झालेला मला आवडणार नाही. या बाबतीत पुढाकार घेऊन घरातल्यांसाठी उदाहरण घालून द्यायचं मी ठरवलंय."

अनुराधा राजूवर बेहद्द खूष होती. पण तिच्या मनात अशी शंका होती, की आर्थिक विषमतेमुळे आईवडील आणि इतर लोक राजूचा योग्य मान ठेवणार नाहीत. याच कारणानं सासरहून आपल्या घरी परत आल्याच्या दुसऱ्याच दिवशी तिनं आईवडिलांना स्पष्ट सांगितलं –

" या घरात काहीही कारणानं राजूचा अपमान झाला तर मी एक दिवसही या घरात राहाणार नाही." विशेषत: आईला सांगितलं, " मी या घरात राहावं अशी तुझी इच्छा असेल, तर राजूशी तुझं वागणं समंजसपणाचं असायला हवं. गेली तीन वर्ष राजू आपल्या घरी आहेत. ते आपल्याला अगदी निकटचे झाले आहेत. तू बोल- ण्यात फार उतावळी आहेस. मन मोडलं, तर सांधणं कठीण जाईल. आई, माझी तुला विनंती आहे की तू आपल्या मुलीच्या आयुष्याचा नरक करू नकोस."

राजम्मा अनुराधेच्या बोलण्यानं हेलावली. म्हणाली, " हे काय तू बोलतेस ?" खुळी कुठली ! राजूचा अपमान झाला तर तो या घराचा अपमान नाही का होणार ? राजू राघवय्यांचा जावई आहे. .... असं कधीही होणार नाही."

अनुराधेला बरं वाटलं, पण आईच्या बोलण्यात तिला दर्प वाटत होता.

घरातले नोकर चाकर राजूशी अदबीनं वागत होते. एके दिवशी भरय्या चौकी- दार अगदी हलक्या प्रतीचं बोलला.

राजू कॉलेजला जाण्यासाठी कारजवळ उभा होता, अनुराधा पुस्तकं आणण्या- साठी वर गेली होती. ड्रायव्हर माळयाशी गप्पा मारीत होता. भरय्या राजूजवळ आला आणि म्हणाला, " कॉलेजला निघालात का ?"

" होय, निघालोय."

" राजू, तू तर अगदी लाथ मारल्यावर मिठाईच्या टोपलीत पडलास. घर पाहायला आलास आणि जावई होऊन बसलास–" भरय्या म्हणाला.

अनुराधा तिथे कधी आली ते राजूनं पाहिलंच नाही.

" जर तुला लाथ मारली तर कुठे पडशील ठाऊक आहे भरय्या ? फाटकाच्या बाहेर पडशील. तू या घराचा चौकीदार आहेस हे लक्षात ठेवून बोलत जा." अनुराधा रागानं बोलली.

भरय्याला कापरं भरलं. "क्षमा करा. चूक झाली," म्हणत भरय्या अनु-

राधेच्या पाया पडला.

कार फर्लांगभर गेली, तरी अनुराधेचा चेहरा लाल होता. राजू म्हणाला, " तो आपल्यापेक्षा वयानं मोठा आहे. त्याला क्षमा कर. "

" राजू नोकरांचं वागणं असंच असतं. जरा गोड बोललं की डोक्यावर बसतात."

एकदा राजूनं मीनाक्षीपाशी या घटनेचा उल्लेख केला तेव्हा मीनाक्षी म्हणाली, " अनुराधेनं बरोबरच केलं. मी तिला शाबासकीच देईन. नवऱ्याचा अपमान तोच बायकोचा अपमान. "

नवरात्राच्या सुट्टीत राजू आपल्या गावी गेला नाही. उत्सव पाहाण्यासाठी अनुराधेबरोबर म्हैसूरला गेला. परत येईपर्यंत कॉलेज उघडलं.

त्यानं वहिनीला पत्र टाकलं, की एक दिवस जरी कॉलेज बुडवलं तरी अभ्यास फार बुडतो.

पण हे लिहिताना त्याचा हात थरथरत होता— राधेशी गप्पा मारताना तो कितीदातरी वर्गाला गेला नव्हता.

रविवारीही क्लास असतो असंही त्यानं लिहिलं. पण वहिनीला तरी त्यानं खोटं का लिहावं ?

त्याला अनुराधेलाही मोडवत नव्हतं आणि वहिनीलाही दुखवता येत नव्हतं.

गावातल्या लोकांनी मीनाक्षीला विचारलं, " नवरात्राच्या सुट्टीत राजू गावी का नाही आला ? "

मीनाक्षीनं म्हैसूरबद्दल सांगितलं. पण तिचंही मन प्रसन्न नव्हतं.

संक्रांत जवळ आली तशी मीनाक्षीनं मोठ्या धामधुमीनं तयारी केली. राजू, राजूची बायको दोघं गावी येतील. राजू आणि राधेसाठी शिवय्यांनी नवे कपडे आणले.

संक्रांतीच्या चार दिवस आधी शिवय्यांना राघवय्यांचं पत्र मिळालं—

' संक्रांतीच्या पहिल्या वर्षी जावयानं सासुरवाडीला राहायचं असतं. तुम्ही दोघं पूर्णेला घेऊन आमच्या घरी येऊन संक्रांत साजरी केलीत तर मला फार आनंद होईल.'

' खळ्यात धान्य असतं. मला गाव सोडता येणार नाही.' एवढंच उत्तर शिवय्यांनी राघवय्यांना पाठवलं.

भोगीच्या दिवशी (संक्रान्तीच्या आदल्या दिवशी) मीनाक्षी पूर्णेला अभ्यंगस्नान घालत होती तेव्हा तिचे डोळे आसवांनी भरून आले. दरवर्षी मीनाक्षी स्वत: राजूला अभ्यंगस्नान घालत असे.

तिच्या मनात आलं, पोटची पोरंसुद्धा मोठी झाल्यावर आईबापापासून वेगळी होतात. मी काही सख्खी आई नाही. मग माझी काय गणती !

भोगी आणि संक्रांत दोन्ही दिवस राजूच्या अनुपस्थितीतच गेले. मीनाक्षीनं संक्रांतीच्या दिवशी गावात हळदी–कुंकू लुटलं.

" राजू आलाच नाही. एवढी पक्वान्नं कशाला केलीस ? शिवय्यांनी विचारलं.

" राजू नाही आला पण पूर्णा तरी आहे नं ? " मीनाक्षीनं उत्तर दिलं.

पण मीनाक्षीचं मन शिवय्या जाणून होते. त्यांना तिची दया आली.

तिसऱ्या दिवशी संध्याकाळी राजू गावी पोचला. मीनाक्षीनं राजूचं स्वागत केलं.

" मी कालच येणार होतो. पण त्या लोकांनी मला सोडलंच नाही." राजू म्हणाला.

" ठीक आहे राजू ! तू कुठेही राहा, सुखी राहा. आम्हाला तेवढंच पाहिजे. " मीनाक्षी म्हणाली.

दुसरे दिवशी पोळ्याचा सण होता. मीनाक्षीनं गुरांना हळदीकुंकू लावलं. त्यात खूप वेळ गेला. स्वैपाक साधाच केला. शिवय्यांनी विचारलं, " हा कसला स्वैपाक केलास तू ? "

मीनाक्षीनं उत्तर दिलं, 'सासुरवाडीला गोड खाऊन कंटाळला असेल. हेच जेवण बरं.'

त्या शब्दांमागे मीनाक्षीची व्यथा दडली होती.

दुसरे दिवशी कॉलेज उघडणार होतं. राजूनं शहरात जायची तयारी केली तेव्हा मीनाक्षी म्हणाली, " बरं, जा. "

राजू म्हणाला, " वहिनी, या खेपेला तू उडदाची मिठाई बनवली नाहीस ? वहिनी, मी कुठेही राहिलो, काहीही खाल्लं तरी तुला विसरणं कसं शक्य आहे ? मला ठाऊक आहे, संक्रांतीच्या दिवशी मी आलो नाही म्हणून तू दुःखी आहेस, राधेला माझ्याबरोबर पाठवायला ते लोक तयार नव्हते. राधेचं मन दुखवणं मला पसंत नव्हतं, म्हणून नाही आलो. वहिनी, क्षमा कर. "

" तुम्ही दोघं नवराबायको सुखी राहा एवढीच माझी इच्छा आहे. मन थोडं व्याकुळ झालं, त्यामुळे दुःख झालं. तू काही मनावर घेऊ नकोस. " म्हणत मीनाक्षीनं मिठाईनं भरलेला डबा राजूच्या हातात ठेवला.

तो घरी पोचताच राधेनं विचारलं, " सगळी मिठाई तुम्हीच खाल्लीत की माझ्यासाठी काही आणलंत ? "

" मी अजून डबा उघडला नाही. दोघं मिळून खाऊ " राजूनं उत्तर दिलं.

राधेनं डबा उघडला, राजूला एक तुकडा दिला. एक आपण तोंडात टाकला. म्हणाली, " राजू मिठाई कशी आहे ?"

" तुझ्या ओठांपेक्षा जरा फिकी आहे."

" मग तुमच्या वहिनीला असं कळवू का ?"

" लिही. राजूला चव कळते हे वहिनीला कळेल."

" आणखी चांगली मिठाई बनवा असंही लिहीन."

" मग वहिनी उत्तर लिहील, ' मिठाई बनवणं कठीण आहे. राधेचं चुंबन घे.' तेच बरं होईल."

अनुराधेचा चेहरा आरक्त झाला. ती लाजून चूर झाली. म्हणाली, " इश्श ! तुम्ही असलं काय बोलता ?"

नवराबायकोत गप्पा सुरू झाल्या, " हे बघ राधा. सगळं कसं विचित्र आहे. मी जेव्हा ओटयावर बसत होतो त्यावेळी जर कुणी म्हटलं असतं की तू या घरचा जावई होशील तर त्याला मी वेडयात काढलं असतं. आता मी विचार करतोय, मी कोण आहे ? कुठून आलोय ? या घराशी माझा काय संबंध आहे ?"

" खुळेच आहात ! ते सगळं तुम्ही विसरा. आयुष्यभर मी तुमची सावली होऊन राहीन. आयुष्यभर साथ देईन.

" हे आपलं घर आहे. पवित्र मंदिर आहे."

राधेनं राजूचं डोकं करपाशात घेतलं.

उन्हाळयाच्या सुट्टीत राधा आणि राजू काश्मीर पाहायला गेले.

परत आल्यावर दोघंही वहिनीच्या गावी गेले. अनुराधेनं मीनाक्षीसाठी रेशमी साडी आणि पूर्णासाठी खेळणी आणली.

राजूनं भावासाठी कानपुरी चप्पल, काश्मिरी शाल आणली.

" प्रवासात खूप खच झाला असेल. एवढं सगळं कशाला आणलं ?" मीनाक्षीनं विचारलं.

" ताई, यात आम्हाला आनंद आहे" राधेनं उत्तर दिलं. पूर्णा खेळणी पाहून खूष झाली. ते पाहून शिवय्यांना खूप आनंद झाला.

राधा वातानुकूलित घरात वाढली होती. गावी राधेला थोडासा त्रास झाला, पण ती आनंदात होती. एवढयात राजम्मानं राधेला परत शहरात बोलावून घेतलं. राजू गावीच राहिला.

राधेला सोडून एकटं राहाणं त्याला जड वाटू लागलं. मोठ्या मुष्किलीनं दहा दिवस गेले. कॉलेजच्या नावाखाली राजूही शहरात निघून गेला.

मीनाक्षीला हे कळत नव्हतं असं नाही. दिराला तिनं आनंदानं शहरात पाठवून दिला.

"इतक्या दिवसांनी तुम्हाला माझी आठवण झाली ना ?" राधा लटक्या रागानं म्हणाली.

"तू तर आईवडिलांजवळ होतीस. कुठे जंगलात तर नव्हतीस ना ?"

"तरी पण तुम्ही जवळ नव्हतात नं ?"

"इतके दिवस मी जवळ होतो का ? तू इतकी मोठी झालीस नी."

"तेव्हा मला ठाऊक नव्हतं– की माझ्यासाठी ईश्वरानं तुम्हाला निर्माण केलंय." राधेनं राजूच्या गळ्यात हात टाकले.

"राधा डोळ्यांत प्राण आणून तू माझी वाट पाहात असशील याची मला कल्पना नव्हती."

"आता तुम्ही असंच म्हणणार. जेव्हा मी तुमच्यापासून लांब जाईन तेव्हा तुम्हाला कळेल."

"राधा, थट्टेतसुद्धा तू असं काही बोलू नकोस. तुला सोडून मी वेगळा होऊच शकत नाही. अशी गोष्ट ऐकूसुद्धा शकत नाही. तू जवळ नसशील तर माझं काय होईल, मी काय होईन सांगता येत नाही."

"राजू, मी कुठेही जाणार नाही. मी कुठेच जाणार नाही." ती राजूला बिलगली.

"राजू, एक मागते, सुख आणि दु:ख, दोन्हींत आपण स्थिर राहायला हवं. पाय नेहमी जमिनीवर रोवलेले हवेत. आपण तसा प्रयत्न करायला हवा. जीवनाचं ते ध्येय राहिलं तर आपल्याला काही कठीण जाणार नाही."

राजू एम्.एस्.सी. च्या शेवटच्या वर्षाला होता. राधा बी.एस्.सी. च्या शेवटच्या वर्षाला होती. दोघांनीही चांगले मार्क मिळविण्याचा निश्चय केला. या अवधित राजू दोन-तीन वेळा आपल्या गावी जाऊन आला होता.

राजू आणि राधा यांची परीक्षेबद्दल आस्था पाहून राघवय्या दांपत्याला खूप आनंद झाला.

राघवय्या मुलीला व जावयाला वर्षाअखेर परदेशात पाठविण्याच्या मागे लागले. मुलांनी इतक्या लवकर परदेशी जावं अशी राजम्माची इच्छा नव्हती.

राघवय्यांनी तिला समजावलं, "एकदा धंद्याच्या मागे लागलं की नंतर काही जमणार नाही. लहान वयातच सगळा अनुभव यायला हवा. धंदा ही अजब गोष्ट आहे. यात कुणावरही विश्वास ठेवता येणार नाही. आपल्याला स्वतःलाच आपलं काम पाहावं लागतं. या सगळ्या गोष्टींचा विचार करूनच मी या लग्नाचा घाट घातला. तू म्हणत होतीस, त्यांच्या घरी शेण आहे, पडवी लहान आहे.

"त्यांचं घर कसं का असेना, आपल्याला तिथे जाऊन राहायचं नाही आहे. तुझी मुलगी तिकडे राहाणार नाही. शिवय्या काय म्हणाले, आता तूच सांग, राजू घर-जावई नाही, तर काय आहे ?"

राजम्मा होकार देत राहिली. राधेनं आणि राजूनं मोठ्या श्रद्धेनं परीक्षेची तयारी केली.

परीक्षा संपल्या. नवीन जोडपं मोठ्या आनंदानं बागेत फिरत होतं. एवढ्यात राघवय्या बाहेरून आले. ते अगदी खुषीत दिसत होते.

राघवय्या मुलांच्या जवळ आले. म्हणाले, "राजू, माझे प्रयत्न यशस्वी झालेत. तुम्हा दोघांची परदेशी जाण्याची तयारी सुरू झालीय. माझे सहा महिन्यांतले प्रयत्न यशस्वी झालेत त्याचा मला अत्यानंद झालाय."

"खरंच ?"

"खरं म्हणजे ?– तुम्ही दोघं ऑगस्टमध्ये परदेशी जाल. कार्यक्रम ठरवा. एअर-इंडियावाल्यांना मी पत्र लिहिलंय. त्यांच्याकडून सविस्तर माहिती मिळेल. तू आपल्या भावाला या प्रवासाबद्दल एक पत्र लिहून टाक. या सुट्टीत कदाचित् तुला गावी जाता येणार नाही. प्रवासाची तयारी करावी लागेल. वाटलंच तर गाडीनं सकाळी गावी जा, आणि गाडीनंच परत ये. उद्या परवा वेगळी ॲंबॅसडर कार मिळणार आहे. जुनी कार तू तुला ठेवून घेऊ शकतोस." एवढं बोलून राजूच्या उत्तराची वाट न पाहाताच राघवय्या घरात निघून गेले.

"बाबांचा स्वभावच चमत्कारिक आहे. ऑगस्टच्या प्रवासाची आतापासून काय तयारी करायचीच ? मीनाक्षीताई तुमची वाट बघतील. तुम्ही गावी जाऊन या. चार दिवस विश्रांती घेऊन मीही तिकडे येईन."

सासऱ्यांनी एवढं सांगितल्यावरही दुसरे दिवशी गावी जाणं राजूला योग्य वाटलं नाही. परदेशवारीच्या वर्णनाचं एक पत्र त्यानं भावाला पाठवलं.

पत्र वाचून मीनाक्षीला खूप आनंद झाला. दीर खूप मोठा होतोय. मीनाक्षीनं

पत्र लिहिलं, 'राजू मला निदान एकदा भेटून परदेशी जा.'

'वहिनी हे तू काय लिहिलंस ? तुला भेटल्याशिवाय, तुझा आशीर्वाद घेतल्याशिवाय मी परदेशी जाईन ? कधीच नाही.' राजूनं वहिनीला पत्र टाकलं.

जुलै महिन्यात पाऊस पडला तरी आकाश स्वच्छ असतं. पण या खेपेला सतत पाऊस पडत राहिला. नेहमी ढग आलेले असत.

परदेशगमनाची बरीचशी तयारी झाली होती. नवदांपत्य खोलीत बसून गप्पा मारीत होतं. टेबलावर कॉफी, काजू वगैरे होते. राजू आणि राधा दोघं तल्लीनतेनं गप्पा मारीत होते.

एवढ्यात राजूला वाटलं, खाली कुणाचा तरी ओळखीचा आवाज येतोय. राजूचं लक्ष तिकडे गेलं.

तेव्हा राधेनं विचारलं, "तुम्ही काय ऐकनाय ?"

"राधा खाली कोणीतरी बोलतंय."

'बाबांकडे कोणीतरी आलं असेल."

"नाही, माझ्या ओळखीच्या कुणाचा तरी आवाज आहे. आमच्या गावाहून कोणीतरी आलंय वाटतं."

"तुमच्या गावाहून आतापर्यंत कोणी आलं नाही. आज कसे येतील ? कॉफी घ्या, मग बघू."

"राधा, आत्ता एक मिनिटात आलो. तो कुणी ओळखीचा माणूस आहे."

"मग बघून या."

राजू खाली उतरतच होता तेवढ्यात राजम्मा दिसली. म्हणाली, "तुमच्या गावाहून कोणीतरी आलंय."

"माझ्याकडे आलंय ? कोण आहे?"

"माहीत नाही. कुणी घाणेरडा माणूस आहे. चिखलाच्या पायांनी त्यानं सगळी जमीन घाण करून टाकली."

आपल्या गावच्या माणसाला राजम्मा अशा तऱ्हेनं नांव ठेवायला लागली तेव्हा राजूला फार राग आला. त्याच्या गावाहून कोणी येतच नाही. एक-दोघांना चौकीदारानं आत येऊ दिलं नव्हतं.

गाववाले म्हणत होते, 'राजू तुझ्या घरात कोणी येऊच देत नाहीत. चौकीदार बाहेर घालवून देतो.'

एकजण म्हणाला, "ते घर थोडंच राजूचं आहे ? ते आहे राघवय्यांचं. जेव्हा राजूचं घर होईल तेव्हा तो आपला मान ठेवील."

राजू हॉलमध्ये गेला.

बुज्जीगाडू आला होता. तो राजूचा मित्र होता. तो अन्नमय्याचा मुलगा होता.

"बुज्जी, एवढ्या पावसात कसा आलास ? बस, बस."

त्या मऊ खुर्चीवर बसण्याची इच्छा असूनही बुज्जी बसला नाही, उभाच राहिला. राजूनं दोनतीनदा आग्रह केल्यावर कोचावर बसला.

जावयाच्या पाठोपाठ राजम्माही हॉलमध्ये आली. पण मागल्या पावली वर निघून गेली.

"राजूला विवेक कमी आहे. त्या गावंढळाला कोचावर बसवलंय. त्या गावंढळाच्या पायांवर दोन मण चिखल आहे. काश्मिरी गालिच्याचा सत्यानाश झालाय."

"तू गप्प बैस आई. या चार वर्षांत त्यांच्या गावचं कोणी आपल्या घरी आलं नाही. गालिचा उन्हात टाकून वाळवता येईल." अनुराधा म्हणाली. तीही खाली आली. त्या आगंतुकाला पाहून अनुराधेलाही राग आला. तिला वाटलं वर. व्हरांड्यात बोलता आलं असतं. त्याला राजूनं कोचावर कशाला बसवलं ? गालिचा साफ करायला किती खर्च येईल, कदाचित् राजूला कल्पना नसेल.

राधा राजूजवळ आली. राजू दोन्ही हातांत डोकं धरून बसला होता. त्याच्या तोंडावर विषादाची छाया पसरली होती. आगंतुक हळुहळू काहीतरी सांगत होता. पाहुण्याच्या डोळ्यांकडे पाहिल्यावर मग राधेनं गालिच्याकडे पाहिलं नाही.

ती घाईनं राजूजवळ आली. त्यानं तोंड वर केलं. विचारलं, "काय झालं ?"

"पूर्णेला ताप आलाय, तिची तब्येत फार खराब आहे."

"आठवड्यापूर्वी तर चांगली होती. आपल्याला पोचवायला वडिलांबरोबर गावच्या वेशीपर्यन्त आली होती."– अनुराधेचा विश्वास बसेना.

"मीही तेच म्हणत होतो. पण हा आपल्याला सांगायला आलाय. हा माझा मित्र आहे. याच्या बोलण्यावर अविश्वास दाखवणं योग्य होणार नाही."

बुज्जी उठला. म्हणाला, "राजू, आता मी जातो."

"थांब, मीही येतो."

"बाहेर पाऊस पडतोय. वाराही वाहातोय. मोटार येईल. थोडा वेळ थांबा."

"मोटार कधी येईल कुणास ठाऊक !" राजू म्हणाला. राजम्माची धाकटी बहीण मुलांना घेऊन माहेरी आली होती, तिथून राजम्माला पत्र लिहिलं, मी तुम्हाला भेटायला येतेय. म्हणून त्यांना आणायला मोटार राजम्माच्या वडिलांच्या घरी गेली होती. दुसरी मोटार बिघडली होती. दुरुस्तीला गेली होती.

"एवढ्या पावसात कसे जाणार ! जरा वेळ बसा. मग पाहू." राजम्मा म्हणाली.

"वर्षानुवर्षं पायाखालचा रस्ता आहे. राधा मला जाऊ दे." राजू म्हणाला.

"तुम्ही पायी जाऊ शकाल. पण आम्हाला या शहरात तोंड दाखवायचंय.

लोक म्हणतील राघवय्यांचा जावई पायी गेला." राजम्माचं म्हणणं होतं.

राघवय्या बाहेर आले, त्यांनी विचारलं, "काय भानगड आहे? राजू कुठे चाललाय?"

"राजूच्या भावाची मुलगी पूर्णा आजारी आहे. त्यांच्या गावचा कुणी माणूस आताच बातमी घेऊन आलाय. राजू पायी गावी जायचं म्हणतोय." राजम्मानं सांगितलं.

"कार आता येईल. दहा-पंधरा मिनिटांत तिकडे पोचवील."

राजू म्हणाला, "मला वाटतं आज आपल्याला मोटारी मिळणार नाहीत. मी तुमचा जावई जरूर आहे. पण त्या नात्यामुळं मला बांधून ठेवायचा प्रयत्न करू नका."

या दरम्यान वज्जीगाडू तिथून सटकला.

"भरय्यालाही बरोबर घेऊन जा." राघवय्या म्हणाले.

"तुमचं डोकं फिरलंय! महिनाभरात परदेशी जायचंय. या पावसात भिजून प्रकृती बिघडली तर तुमचे सगळे प्रयत्न वाया जातील." राजम्मानी नवऱ्याला दटावलं.

राघवय्यांनी सर्व्हिसवाल्याला फोन केला. म्हणाले, "दुरुस्ती चालू झाली नसेल तर गाडी पाठवून द्या."

उत्तर मिळालं, "दुरुस्ती चाललीय. तासाभरात गाडी पाठवू."

एक तासात साठ मिनिटं असतात. साठ मिनिटं राजूला साठ वर्षांसारखी वाटली असती. पूर्णा किती गोड गोड बोलत होती– 'आईला गोष्टी येतच नाहीत. राधाकाकीला छान गोष्टी येतात. काकी मला शहरात घेऊन जाईल, बिस्किटं खायला देईल. शहरात काकीजवळ राहून मी शिकेन.' जेव्हा राधा आणि राजू यायला निघाले तेव्हा पूर्णेच्या डोळ्यांत पाणी आलं. राधा म्हणाली, "रडतेय बघ!"

"नाही, डोळ्यांत कचरा गेला." असं म्हणून पूर्णेनं हसायचा प्रयत्न केला...

घड्याळात सहा वाजले.

"बाबा, तुम्ही पुन्हा एकदा त्यांना फोन करा ना." राधा म्हणाली.

सर्व्हिस स्टेशनवर आधीचा माणूस नव्हता. 'मोटर उद्या द्यायची होती ना?.. बरं...अर्ध्या तासात मिळेल. आपण आपला ड्रायव्हर पाठवा–' असं उत्तर मिळालं.

"गाडीचा ड्रायव्हर गावात नाही आहे. तुम्ही तुमचा ड्रायव्हर पाठवा." राघवय्यांनी फोनवर सांगितलं.

“अंधार होतोय. अर्ध्या तासानंतर तिकडे पायी जाणं योग्य होणार नाही तिकडे साप फिरत असतात.” राधा घाबरली होती.

“पोरी तू बघतेच आहेस. राजू पायी गेला असता तर आतापर्यंत गावी पोचला असता. थांब, मीच राजूबरोबर जातो.” राघवय्या म्हणाले.

“तुम्ही कोणाची तरी गाडी मागवा ना!” राधेनं सल्ला दिला. राघवय्यांनी दोन-तीन ठिकाणी फोन केले. काही उपयोग झाला नाही. कोणी फोनवर भेटलेच नाहीत.

इतक्यात कंपनीतून फोन आला, “गाडी तयार आहे. आमच्याकडे ड्रायव्हर नाही. आपण ड्रायव्हर पाठवून गाडी मागवा.”

कोणी ड्रायव्हर नव्हता. एक गावी गेला होता. दुसरा राजम्माच्या वडिलांच्या गावी गेला होता.

“मरो तो ड्रायव्हर आणि ती गाडी! वेळेवर एकाचाही उपयोग नाही.” राघवय्या वैतागून म्हणाले.

राजू उठला. सासऱ्यांना म्हणाला, “मला जाऊ द्या. अनुराधेला पण यायचंय. गाडी आल्यावर तिला पाठवा.”

“ठीक आहे. राजू, तू जा.”

राजू गेला.

अप्पण्णांची गाडी पुलावरून चालली होती.

“रामुलू, ए रामुलू” राजूनं ओरडून हाक मारली. रामुलूनं गाडी थांबवली.

“राजूबाबू! एवढ्या पावसात?”

राजूनं विचारलं “पूर्णाचा ताप कसा आहे?”

“पूर्णम्माला ताप आलाय?”

“बुज्जी येऊन सांगून गेला.”

“मला माहीत नाही. मी सकाळीच चिंच घेऊन शहरात आलो. आता परत निघालोय” रामुलू म्हणाला.

राजू गाडीत बसला.

“तुमच्या ढंगदार मोटारींचं काय झालं?” रामुलूनं विचारलं.

“त्यांच्याच पायी एवढा उशीर झाला. त्या गाड्या माझ्या नाहीत. माझ्या सासऱ्यांच्या आहेत.” राजूनं उत्तर दिलं.

6

त्या गावात एका नवीन डॉक्टरनं प्रॅक्टिस सुरू केली होती. तो येऊन पूर्णेला तपासून गेला. म्हणाला, "तासाभरात मुलगी शुद्धीवर येईल. आपण तिला दूध पाजा. मला कळवा."

मीनाक्षी ओक्साबोक्शी रडत होती. देवाची प्रार्थना करत होती –

"परमेश्वरा, माझ्या मुलीला वाचव."

मीनाक्षी धावत देवघरात गेली. दिवा लावून ती देवाची प्रार्थना करू लागली, "माझे प्राण घे. पण पूर्णेचं रक्षण कर."

ज्योतीमधे तिला पूर्णेचा हसरा चेहरा दिसला.

पूर्णा म्हणत होती, "मी काकीबरोबर शहरात जाईन, मला शहर आवडतं. मी जाते. मला धरू नकोस. मी जाते. . . जाते. . ." अर्धवट शुद्धीत पूर्णा बडबडत होती.

ज्योतीतून जणू पूर्णेचं ते बोलणंच प्रतिध्वनित होत होतं.

"पोरी, मी नाही अडवणार. काकीबरोबर जरूर पाठवीन."

हळूहळू पूर्णेच्या चेहऱ्याच्या जागी अन्नपूर्णेचा चेहरा दिसू लागला.

"अन्नपूर्णा, अन्नपूर्णा, तू आता का आलीस ? मी तुझं काय वाकडं केलंय ? मी तुझ्या मुलाचं पालन-पोषण करून वाढवलं. माझ्या मुलीला तू हात लावू नकोस. मी गावातल्या लोकांच्या शब्दावर विश्वास ठेवला नाही. मला वाटलं, तू माझं भलं करशील. अन्नपूर्णा, तू जा, चालती हो – माझ्या मुलीला सोड–" बोलता-बोलता मीनाक्षी बेशुद्ध होऊन पडली.

शुद्धीवर आली तेव्हा मीनाक्षीच्या उशाशी राजू बसलेला होता.

"वरदम, तू कधी आलास ? बाळा तू का रडतोयस ? माझ्यासाठी रडतोयस ? मला काही झालेलं नाही. जरा चक्कर आली. तुझे भाऊ कुठे आहेत ? पूर्णेच्या खोलीत आहेत का ? पूर्णा कालपासून तुझी आठवण काढत होती."

"वहिनी, पूर्णा. . ." मीनाक्षीला मिठी मारून वरदराजू लहान मुलासारखा रडू लागला.

"काय झालं वरदम ? पूर्णेला काय झालं ?" ती धावत पूर्णेच्या खोलीत गेली.

पूर्णेचं शरीर वरपासून खालपर्यंत पांढऱ्या कापडानं झाकलं होतं. शिवय्या खाटेवर डोकं टेकून स्तब्ध बसले होते. "पूर्णा, पूर्णा..." मीनाक्षी आक्रोश करीत होती.

लोक शिवय्यांची समजूत घालायचा प्रयत्न करत होते.

"मला एकटाच राहू द्या–" शिवय्यांनी विनवलं.

राजूच्या पाठोपाठ ड्रायव्हर मोटार पळवत आला. त्यानं शहरात जाऊन राघवय्यांना सगळी हकीकत सांगितली.

दुसरे दिवशी सकाळी राघवय्या, राजम्मा आणि अनुराधा तिघंही गावी पोचले. राजू स्वतः प्रेतयात्रेची तयारी करीत होता.

"हा लहान आहे. ही सगळी कामं तो का करतोय ? दुसऱ्या कुणाला तरी स्मशानात पाठवायला हवं." राजम्मा राघवय्यांना म्हणाली.

"तू गप्प बस." राघवय्यांनी राजम्माला झटकून टाकलं.

संध्याकाळी राघवय्या आणि राजम्मा दोघं शहरात परत गेले. अनुराधा तिथेच राहिली. राजम्माला अनुराधेचं तिथं राहाणं आवडलं नाही. राधा ऐकेना म्हणून ती गप्प बसली.

रात्रंदिवस जवळ राहून अनुराधेनं मीनाक्षीचं दुःख कमी करण्याचा प्रयत्न केला. राजू आणि शिवय्या इतके गप्प होते की ते घरात आहेत असं कुणाला वाटतच नव्हतं. त्या घरात कुणी झोपत नव्हतं, काही खात नव्हतं. राधा सगळ्यांना आर्जवून, विनवून काहीतरी खायला लावायची.

सात दिवस होतात न होतात तो अनुराधेला पडसं झालं. तापही येऊ लागला.

"पोरी तू इथं राहू नकोस. हे घर पापी आहे. पूर्णेला या घरानंच खाल्लंय. तू आपल्या वडिलांकडे जा." मीनाक्षीनं आग्रह केला.

राजूनं राधेला ताप आल्याचं सासऱ्यांना कळवलं.

राजम्मा, राघवय्या दोघंही आले.

राजम्मा रडू लागली–"पोरी कसा ग ताप आला तुला ? मी आधीच तुला सांगितलं होतं. पण तू ऐकलं नाहीस."

सासू-सासरे राधेला शहरात घेऊन गेले. दुसरे दिवशी राधेचा ताप कमी झाला. थोडं पडसं होतं. राधेनं राजूला तसं पत्र लिहिलं.

मरणाऱ्याच्या पाठोपाठ दुसरा काही जात नाही हेच खरं. मीनाक्षी उठून घरात हिंडू फिरू लागली.

वहिनीकडे पाहून राजूचं मन विकल व्हायचं. राजूला कळत नव्हतं–'असं का व्हावं ? देव असं का करतो ?–' राजूचा देवावरचा विश्वास उडू लागला. तेव्हा

मीनाक्षीनं राजूची समजूत घातली, "अरे हे आपलं नशीब म्हणायचं! देवाला शिव्या देऊन काय उपयोग?"

"अन्नपूर्णेनं पूर्णेला आपल्या कुशीत घेतलंय. त्या दिवशी अन्नपूर्णेला मी भूत समजले होते. त्या भूत नाहीत, देवता आहेत. म्हणूनच त्यांनी माझ्या कुशीत जन्म घेतला. याच कारणानं पूर्णेला राजूचा इतका लळा होता. त्यानी मुलाचं लग्न झालेलं पाहिलं. आपलं काम झालेलं पाहिलं. आपलं काम झालेलं पाहून त्या निघून गेल्या.

"मला वाटलं होतं. पूर्णा आणि अन्नपूर्णा वेगवेगळ्या आहेत. पण तो माझा भ्रम होता. मला वाटलं, अन्नपूर्णा माझ्या मुलीला मारायलाच आली." अधूनमधून मीनाक्षी असं काहीतरी बडबडायची.

सबंध महिनाभर राजू मीनाक्षीजवळ होता. त्यानं मीनाक्षीचं दुःख हलकं करण्याचा खूप प्रयत्न केला. पण मीनाक्षीची वेदना इतकी तीव्र होती की ती सहजी शांत होणं शक्य नव्हतं.

परदेशी जाण्याचे दिवस जवळ येत चालले, पण राजूचं शहरात येण्याचं काही लक्षण दिसेना. राजम्मा निरोप पाठवणार होती पण राधेनं अडवलं. तिचं म्हणणं होतं— त्यांचं मन तिथेच शान्त राहील. इकडे बोलावून त्यांना त्रास देण्याची माझी इच्छा नाही.

"बायकांसारखं त्या मेलेल्या पूर्णेसाठी रडत राहून उपयोग काय? पुढे परदेश प्रवासाचा इतका मोठा कार्यक्रम आहे. त्या खेड्यात पडून राहून काय करायचंय?" राजम्मानं नवऱ्याला विचारलं. राघवय्यांनी विचारलं, "राजूच्या लक्षात नाही का राहणार प्रवासाची गोष्ट?"

"राहील ना."

आई-वडिलांनी अनुराधेला आग्रह करून राजूला पत्र लिहायला सांगितलं. राधेनं पत्र लिहिलं तेव्हा तिसरे दिवशीच उत्तर आलं—

प्रिय राधा,

तुझं पत्र मिळालं. भावाला आणि वहिनीला अशा अवस्थेत सोडून माझी परदेशी जायची इच्छा नाही. जर माझी आई अशा परिस्थितीत असती तर मी जाऊ शकलो असतो का? मीनाक्षी माझी वहिनी आहे, पण आईहून अधिक आहे.

आपल्याला परदेशी पुन्हा केव्हातरी जाता येईल. तू वडिलांना हे सांगून क्षमा माग.

तुझा

राजू.

पुनश्च: आता मला नोकरीसाठी प्रयत्न करायला हवा. नोकरी शोधण्याच्या बाबतीत तू वडिलांची मदत घे. मी त्यांचा ऋणी राहीन."

अनुराधेनं पत्र वडिलांच्या हातात ठेवलं.

"काय उत्तर आलंय ?"

"तो परदेशी जाणार नाही. नोकरी करणार आहे. त्यासाठी माझी मदत हवी आहे." राघवय्यांनी उत्तर दिलं आणि पत्र परत राधेच्या हातात दिलं.

" वेड गेलं, मुसळ डोक्यावर बांधा " अशातलीच गोष्ट दिसतेय. परदेशी जायचं म्हणजे आपल्या गावीच जायचं असं जावईबापूंना वाटत असेल– व्यवस्था करणं किती कठीण आहे याची त्यांना कल्पना नसावी." राजम्मा म्हणाली.

"यासाठी मला आकाश–पाताळ एक करावं लागेलं. आता जर संधी सोडली तर ती पुन्हा मिळणार नाही. राजू काही डोकं चालवत नाहीय. परदेशी जाऊन आल्यानं अनुभवात भर पडेल याची त्याला जाणीवच नाही."

"तुम्ही त्याला इथे बोलावून घ्या आणि सगळं समजावून द्या." राजम्मानं सुचवलं.

"बरं प्रयत्न करतो."

राघवय्यांचं पत्र मिळताच राजू शहरात आला. राजू सुकून खारकेमारखा झाला होता.

"राजू तू इतका भोळमट आहेस ? दुःख सगळ्यांच्याच वाट्याला येतं. त्याला धीरानं तोंड दिलं पाहिजे. आम्हाला वाटलं, तू वहिनीची समजूत काढशील. आता तुझी समजूत काढायलाच आणखी एक माणूस हवं."

राधेनं नवऱ्याला खूप समजावलं. "त्या दिवशी मी काय सांगितलं ? आठवा बघू. आपल्याला दुःखाला तोंड द्यायचं आहे. धीरानं पुढं जायचंय. जमिनीवर पाय रोवले तरच चालण्याला गती येईल. नाहीतर अधांतरीच राहू."

ती रात्रभर नवऱ्याची समजूत काढीत राहिली– त्याला धीर देत राहिली.

7

दुसरे दिवशी राघवय्यांनी पुन्हा परदेशगमनाचा विषय काढला.

"मी राधेच्या पत्रात लिहिलंच होतं. यावेळी मी परदेशी जाऊ शकणार नाही. वहिनीची प्रकृती मुळीच बरी नाही, मधूनमधून काहीतरी बडबडत असते. मी

जवळ राहिलो तर तिला बरं वाटेल."

राघवय्यांनी आणि अधूनमधून राजम्मानेही खूप सांगून पाहिलं, पण त्यातून काही निष्पन्न झालं नाही, तेव्हा राजम्माला खूप राग आला.

"कुत्र्याला आणून सोन्याच्या गादीवर बसवण्याचा प्रयत्न केला तर काय उपयोग ?" असे शब्द ती बोलून गेली.

"तुमच्या मनात कितीतरी दिवसापासून ही भावना होती. ती आज तुमच्या तोंडून बाहेर पडली याचा मला अतिशय आनंद होतोय. तुम्ही मला कुत्रा म्हटलंत – त्याचं मला दुःख होत नाहीय."

"कुत्र्यासारखं इमान माझ्यात राहिलं तरी मी स्वतःला धन्य समजेन. वहिनीचे माझ्यावर जे उपकार आहेत, ते जर मी विसरलो तर मी कुत्र्यापेक्षाही नीच ठरेन." राजूनं सावकाश उत्तर दिलं.

"वहिनीबद्दल म्हणताय ते ठीक आहे. पण पैसे खर्च करून शिक्षण दिलं, मुलीशी लग्न लावून दिलं ते कोणी ? तुमच्या मामऱ्यांनी. त्यांच्या बोलण्याची तुम्हाला पर्वा करायला नको का ?" राजम्मानं विचारलं.

"मी सासऱ्यांचा कृतज्ञ आहे. कृतज्ञ राहीन. माझंही म्हणणं तुम्ही विचारात घ्यायला हवं. तुम्ही राधेच्या आई आहात. माझ्या मामूबाई आहात. तुम्ही काहीही म्हटलंत तरी मी त्याचा राग मानणार नाही. तुम्ही माझ्यावर सत्ता चालवू शकाल; पण माझी नाती, भावना तोडू शकत नाही. एवढं तरी तुम्ही जरूर लक्षात ठेवलं पाहिजे."

राजम्मा काहीतरी बोलणार होती. राधेनं मध्येच थांबवलं आणि म्हणाली, "आई, एवढी जबरदस्ती का करतेस ? संधी मिळाली तर पुन्हा कधीतरी इंग्लंडला जाऊ."

"तुमची मर्जी ! दोघं मिळून पुन्हा एकदा विचार करा." राघवय्या म्हणाले.

"तुम्ही पत्रात नोकरीबद्दल लिहिलं होतं– त्याचं काय झालं ?" राजूनं विचारलं.

"कुठली नोकरी ?" राजम्मानं विचारलं.

"तुला बोलावून घेण्यासाठीच मी पत्रात नोकरीचा उल्लेख केला. तू माझ्या साऱ्या इस्टेटीचा वारस आहेस. तुला कुणाच्या हाताखाली नोकरी करण्याची जरूर नाही." राघवय्यांनी स्पष्टपणे सांगितलं.

तुमची इस्टेट खूप असेल. पण मी माझं म्हणू शकेन असं काहीतरी हवंच. बायकोच्या इस्टेटीचा उपभोग घेत बसणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत नाही."

"श्रम करून जगावं ही स्तुत्य गोष्ट आहे. तू एम्. एस्.सी. पहिल्या वर्गात पास झालायस. तेव्हा नोकरी करावीशी वाटणं साहजिक आहे. मग हेही स्पष्ट सांग– ती नोकरी मिळवण्यात सासऱ्याचा हातभार असावा की नाही ? "

"माझं तसं म्हणणं नाही. तुम्ही मोठया मनानं मला शिकवलंत, मला तुमच्यापासून वेगळं राहायच नाही. तुम्ही तुमच्या कंपनीतच अशी काही व्यवस्था केलीत तर मी आपले उपकारच समजेन. तुमच्या हाताखाली काम करायला माझी काही हरकत नाही."

"राघवय्यांचा जावई कुणाच्या हाताखाली काम करणार नाही. उद्यापासून तू साखर कारखान्याचा मॅनेजर म्हणून कामाला लाग." राघवय्यांनी सांगितलं.

"एवढी मोठी जबाबदारी माझ्यावर टाकू नका. मला तेवढा अनुभव नाही. माझ्या आवाक्यातलं काही काम असलं तर सांगा."

"मी तुझ्यावर काही ओझं लादत नाहीय. माझी मदत तुला नेहमीच मिळेल. तू सगळं काम शिकेपर्यंत मी येऊन तुझ्याबरोबर ऑफिसात बसेन, तू माझा सल्ला घेत जा. स्वतःच्या इस्टेटीची देखभाल करतोय या भावनेनंच तुला काम करायला हवं."

राजूला हे पटलं. आज नाही तरी पंचवीस वर्षांनी का होईना मला हे काम करावंच लागेल. सासऱ्यांच्या बरोबर राहून काम शिकलो तर ते बरंच होईल.

भावाला आणि वहिनीला ही बातमी सांगायला राजू गेला. राजम्मा आणि राघवय्या, दोघांना आनंद झाला.

राजू आनंदानं गावी गेला. बातमी ऐकून शिवय्यांनाही आनंद झाला.

"कुठली नोकरी ?"

"दुसरीकडे कुठे नाही. त्यांच्याच कारखान्यात."

"असं आहे होय ? मला वाटलं कुठे दुसरीकडे नोकरी आहे."

सविस्तर कळल्यावर शिवय्यांचा उत्साह कमी झाला. त्यांनी विचारलं, "बरं, मग तू कधी जाणार ?"

"अजून मी ठरवलं नाही. तुमचा सल्ला घ्यायला आलोय."

"पगार किती ?" शिवय्यांनी विचारलं.

पगाराचंही ठरलं असतं तर बरं झालं असतं– राजूच्या मनात आलं.

"परदेश प्रवासाचं काय झालं ?" मीनाक्षीनं विचारलं.

"तो सध्या स्थगित झालाय!"

"त्याला कारण तूच आहेस' राजू मनात म्हणाला. पण त्यानं वहिनीला तसं सांगितलं नाही.

जरा थंडपणे विचार केल्यावर राघवय्यांनी निर्णय घेतला. राजूला एकदम मॅनेजर करण्याऐवजी थोडे दिवस त्याला आपल्याबरोबर बसवावं. त्यामुळं काम शिकणं सोपं जाईल. शिवाय लोकांनाही कळेल –राजूच भावी मालक आहे ते.

"राजू, मी काहीच करत नाहीय. तू राधम्माचा नवरा आहेस हेच मला खूप आहे." राघवय्या म्हणाले.

त्या दिवशी संध्याकाळी सासू-सासरे, राधा आणि राजू सर्व मिळून हिरवळीवर बसून कॉफी पीत होते. तेव्हा राजम्मानं अनुराधेची त्या घरात कशी हुकमत चालते त्याचं वर्णन केलं.

"म्हणजे काय आई, मी तुमचं काही ऐकत नाही का ?"

"कधी ऐकलंस ? एक तरी उदाहरण दे."

"मला न सांगता तुम्ही माझं लग्न ठरवलंत तर मी ऐकलं नाही ? आई-वडिलांची आज्ञा मी डोळे मिटून पाळली की नाही ? "

"तोंडानं बोलली नाहीस हे बरोबर आहे. पण ते या घरात आल्यापासून तू त्यांची जी सरबराई केलीस ती काय मला ठाऊक नाही का ? माझ्या मुलीच्या मनात काय आहे तेही मी समजू शकत नाही का ?"

"पण राजू, राधा जर म्हणाली मी मुलीलाच जन्म देईन तर तू मुळीच ऐकू नकोस. माझी ईश्वराजवळ प्रार्थना आहे –मुलीच्या जन्माचा शाप कुणालाही न मिळो –"

राघवय्या हसले. पण राधेचा चेहरा मात्र पडला.

"माझा जर तुम्हाला त्रास होत असेल तर तुम्ही मला मासरी पाठवून द्या. मी निघून जाईन. राजूला नोकरी लागली की आम्ही हे घर सोडू. आमच्यामुळे तुम्हाला जो काही त्रास होतोय त्याबद्दल क्षमा करा." राधा म्हणाली.

"राजू, थट्टेतल्या बोलण्यावरही बघ ही कशी रागावली."

राघवय्या उठले. अनुराधेच्या खुर्चीजवळ गेले आणि म्हणाले, "तू जर डोळ्यांसमोर नसलीस तर हे घर, ही दौलत कुणासाठी ग बाळा ? तुझ्या सुखातच आमचं सुख आहे."

राघवय्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

आईवडिलांचं मुलीवर किती प्रेम आहे हे राजू जाणून होता. परदेशगमनाबद्दल जेव्हा बोलणं चाललं होतं तेव्हा राधेच्या एका वाक्यानं राजम्मा गप्प बसली होती हे राजूला माहीत होते.

राधेच्या वागण्यावर राजू बेहद्द खूष होता. राधेमुळे स्वतःला भाग्यशाली मानत होता.

चार महिने अनुभव घेतल्यावर राजूच्या हाती सर्वाधिकार आले.

अधिकारपूर्वक राजू जेव्हा वातानुकूलित केबिनमध्ये बसला तेव्हा राजूला विचित्र वाटलं. आपलं पूर्ण बालपण आठवलं. लहानपणी वाचलेलं एक पत्र आठवलं. त्याचा अर्थ होता– 'संपत्ती जेव्हा स्वतःहून येते तेव्हा नारळाच्या आतल्या पाण्यासारखी येते. जेव्हा जाते तेव्हा हत्तीनं खाल्लेल्या कवठाच्या फळाप्रमाणे जाते.'

एकाएकी ब्रेक लागून गाडी थांबावी तसे विचार मधेच थांबले. राघवय्या दारावरचा पडदा बाजूला करून आत आले.

राजू खुर्चीवरून उठला.

राघवय्या म्हणाले, "ही खुर्ची तुझी आहे. माझ्यासमोरही संकोच करायचं काही कारण नाही. दिमाखात बसणं, विचारपूर्वक बोलणं ही अधिकाऱ्याची लक्षणं आहेत. वाईट लोकांशी मैत्री करणं हे घाण पाण्यात आंघोळ करण्यासारखं आहे."

राजूनं मनापासून सासऱ्यांचं बोलणं ऐकलं. घरातही राजूचं स्थान उंचावलं. नोकरचाकर त्याच्याशी पूर्वीपेक्षा जास्त अदबीनं वागू लागले.

एका दिवसातच राजूचं नाव घरभर 'छोटे बाबू' झालं. कॉफीचा कप हातात देत राधेनं विचारलं, "नोकरीचा पहिला दिवस कसा काय गेला?"

"मला तर सगळं स्वप्नच वाटतंय. असं वाटतंय, डोळे उघडले तर सगळं स्वप्न विरघळून जाईल."

"वेडचा हे स्वप्न नाही. इंद्रजालही नाही. हे चांगुलपणाचं आयुष्य आहे. तुम्ही आणि मी रचलेलं आनंदभवन आहे. या भवनाचे आपण दोघं दोन खांब आहोत. या घरात आपण दोघं सुखी कौटुंबिक आयुष्य घालवू. तुमच्या हातात माझा हात आहे. तो दृढपणे धरून ठेवा–" असं म्हणत राधा राजूच्या बाहुपाशात सामावली.

एका महिन्यात राजू सर्व काम शिकला. रात्री घरी आल्यावर तो सासऱ्यांचा सल्ला विचारायचा. आपल्या कामासंबंधी विचारविनिमय करायचा.

कधी-कधी त्याचा काही बाबतीत सासऱ्यांशी मतभेदही व्हायचा, पण त्यामुळे राजूच्या मनातला सासऱ्यांबद्दलचा आदर कमी झाला नाही.

त्या दिवशी एक तारीख होती. आपल्या श्रमाचं फळ मिळण्याची तारीख, सासरे किती पगार देतील, त्यातून काय काय खरेदी करायचं याचे मनसुबे रचत होता राजू.

दुसरे दिवशी रविवार. ऑफिसला जायची जरूर नाही. पगारातनं भावासाठी आणि वहिनीसाठी काहीतरी खरेदी करून नेईन. दिवसभर गावी राहीन. राधा-साठी छानशी साडी घेईन. राधेला घेऊन सिनेमाला जाईन.

राजूचे विचार धावत होते.

संध्याकाळी चार वाजता सर्व लोकांचा पगार झाला. सगळे लोक भरल्या खिशावर हात ठेवून घड्याळाकडे पाहात होते.

घड्याळानं आणखी अर्ध्या तासाचा टोला दिला. कॅशियरनं पेटी बन्द केली. म्हणजे आज मला काहीच मिळणार नाही ? राजू साशंक झाला.

सासऱ्यांना वाटलं असेल, 'घरी रहातो, जेवतो म्हणून पगार द्यायची जरूर नाही.' पगाराबद्दल आधीच ठरवून घ्यायला हवं होतं. चूकच झाली.

एवढ्यात राघवय्या केबिनमध्ये आले. राजूच्या हातात एक पासबुक आणि एक चेकबुक देऊन म्हणाले, " राजू, बँकेत लाख रुपये आहेत. लागतील तसे वापर."

एवढं सांगून ते निघून गेले.

राजू दहा-पंधरा मिनिटं अवाक् होऊन बसून राहिला. 'के. वरदराजू, मॅनेजर शुगर फॅक्टरी' याच्या नावावर बँकेत लाख रुपये होते. त्या दिवशी बँकेत ते पैसे जमा झाले होते.

दोन्ही पुस्तकं खिशात ठेवून राजू घरी गेला. त्याच्या चेहऱ्यावर उत्साह नव्हता.

राधेनं नवऱ्याला पहाताच विचारलं, "आज ऑफिसात काम जास्त होतं का ?"

" मूड नाही आहे–" राजूनं सांगितलं.

" बरेच दिवस भाऊना आणि वहिनींना भेटला नाहीत." राधा म्हणाली आणि जवळ येऊन टाय सोडवत तिनं विचारलं, " उद्या गावी जाणार ?" किती रविवार आले आणि गेले, राधेनं असं कधी विचारलं नव्हतं. राधेला वाटत असेल, मला पगार मिळालाय.

राघवय्यानी जी फसवणूक केली त्याची बहुधा राधेला कल्पना नसावी. " राधा, मला थोडे पैसे हवेत. पैसे देऊ शकशील ? " राजूनं विचारलं.

राधेला आश्चर्य वाटलं. ती हसत म्हणाली, " मला वाटत होतं पहिल्या महिन्याच्या पगारात तुम्ही मला काहीतरी बक्षीस आणाल म्हणून. तर उलट तुम्हीच माझ्याकडे पैसे मागताय. "

थट्टेत जेव्हा राजूनं भाग घेतला नाही तेव्हा ती समजली– प्रकरण गंभीर आहे.

नवऱ्याचं मन दुखावलंय. चटकन् कपाट उघडून तिनं चारशे रुपये नवऱ्याच्या हाती दिले.

राजूनं दोनशे रुपये घेतले. घरातून बाहेर पडला. ड्रायव्हर तिथेच उभा होता. त्याच्याकडे राजूनं लक्षच दिलं नाही.

राधेला शंका आली. वडलांना विचारण्यासाठी ती खाली आली तेव्हा ते कुणाशी तरी बोलत होते. त्यांच्याशी बोलायचो तिला संधी मिळाली नाही. ती पुन्हा वर निघून गेली. राजू घरी परत आला नाही. राधेला काळजी वाटू लागली. ती कोचावर बसली. तिचा डोळा लागला. खोलीत दिवा नव्हता.

राजू उशिरानं आला. त्यानं विचारलं, "दिवा का नाही लावला ? तू झोपलीस का ? प्रकृती बरी आहे ना ?" त्यानं राधेच्या कपाळावर हात ठेवला.

राधेनं राजूचे हात धरले. आपल्या हृदयावर ठेवले. ती म्हणाली, "तुम्ही का उदास आहात त्याचं कारण सांगा." "काही नाही. हे बघ मी भावासाठी आणि वहिनीसाठी कापडं आणलीत."

राधा उठून सावरून बसली. तिच्या लक्षात आलं, राजू काहीतरी लपवतोय— माझ्यावर त्याचा विश्वास नाही का ? कापडं हातात घेऊन म्हणाली, "कापडं छान आहेत."

पण राधेच्या तोंडावर उत्साह नव्हता. खरं तर तिनं कापडं नीट पाहिलीच नाहीत.

राजूला वाटलं राधेसाठी साडी आणली नाही म्हणून ती रुसलीय.

"राधा, तुझ्याच पैशातून मी तुझ्यासाठी कसं कापड आणू ? जेव्हा माझे स्वतःचे पैसे असतील तेव्हा आणीन." राजूनं तिची समजूत घातली.

राधेच्या डोळ्यावरचं पटल दूर झालं. आता तिच्या लक्षात आलं. तिला वडिलांचा खप राग आला. ती नवऱ्याजवळ बसली. म्हणाली, "ऐकलं का ? मी तुमच्यासाठी एक प्रेझेंट तयार केलंय."

"तूच मला परमेश्वरानं दिलेलं एक प्रेझेंट आहेस. तुझ्याकडून मी आणखी कसली अपेक्षा करू ?"

"तुम्ही अपेक्षा करा, अगर न करा मी तर देणारच आहे. तुम्हाला स्वीकारावंच लागेल." राजूनं बाहू पसरले.

"अंहं ! ते नाही." ती राजूला बिलगून बसली. त्याच्या कानात म्हणाली, "सात महिन्यानंतर तुम्हाला मुलगा देईन."

राजू चकित झाला. त्यानं आलिंगन दिलं.

"खरंच राधा ? इतके दिवस लपवलंस ना !" राजूनं राधेच्या कपाळावर

चुंबनांचा वर्षाव केला.

राजूला वाटलं, आपलं सारं दु:ख, सारी व्याकुळता दूर झाली आहे.

तो आपली मनोवेदना विसरला.

8

मीनाक्षी न्हाऊन केस वाळवत होती. वरदराजू आला. मागून पाहिल्यावर राजला वाटलं कुणी नात्यातली बाईच घरी आली आहे. पूर्णेची आठवण येईल या भीतीनं राजू तीन महिन्यांत गावाकडे फिरकला नव्हता.

मीनाक्षीनं राजूला पाहिलं. त्याचं स्वागत केलं. वहिनीचे पांढरे केस राजूनं कधी पाहिले नव्हते. वहिनीच्या डोळ्याखालीही काळी वर्तुळं दिसायला लागली होती.

"वरदम ! उभा का राहिलास ? बस. भाऊ शेतात गेलेत. तासाभरात येतील. सांग बघू राधा बरी आहे ना ? "

जेव्हा राजू नोकरीसाठी शहरात जायला निघाला तेव्हा मीनाक्षीनं सांगितलं होतं, "राजू, अधूनमधून गावी येत जा. आम्ही दोघं इथं आहोत. हे गाव धड सोडवत नाही, धड इथं रहावतही नाही."

वहिनीसमोर राजूला अपराध्यासारखं वाटू लागलं.

"मी भाऊना भेटून येतो", म्हणत राजू बाहेर निघून गेला.

शिवय्या वाटेतच भेटले. काठीच्या आधारानं लंगडत येत होते. "भाऊ", हाक मारत राजू शिवय्यांजवळ गेला.

शिवय्या उभे राहिले. डोळे ताणून भावाकडे पाहात राहिले.

"मी राजू आहे. घरी गेलो तेव्हा कळलं तुम्ही शेतात आहात. म्हणून इकडे आलो."

दोघं भाऊ उराउरी भेटले. मग गावाकडे चालू लागले.

"पायाला काय झालं ? लंगडता का ?" राजूनं विचारलं.

"शेतात पाय घसरला. जरा दुखतोय. घरून निघालो तेव्हा मी बरा होता. आता घरी गेल्यावर रक्तचंदनाचा लेप लावीन म्हणजे बरा होईल."

चालता चालता पिकाबद्दल बोलणं झालं.

" याही वर्षी पीक बुडालं. परमेश्वर अगदी परीक्षा घेतोय. आपल्या गावात असं कधी झालं नव्हतं. व्याजही देऊ शकत नाहीय." शिवय्या म्हणाले.

" राजू, माझी काम करायची शक्ती कमी होत चाललीय. शिवाय मी मेहनत तरी कुणासाठी करू ? माझ्या श्रमानं कुणाला आनंद व्हायचाय ? तू सासुरवाडीला आहेस. तुझ्याकडे भरपूर पैसा आहे. मुलगी जग सोडून गेली. आम्ही दोन जीव राहिलोत. आम्ही खाल्लं किंवा नाही खाल्लं तरी काळ थांबून रहाणार नाही. राजू ! प्रत्येक माणूस कुठल्यातरी आशेवर काम करतो. जेव्हा जीवनात आनंद असतो तेव्हा काही काम करण्याची इच्छाही असते. आमच्या जीवनात कुठला आलाय आनंद ?" बोलता बोलता शिवय्या एकाएकी ठेच लागल्यासारख थांबले.

राजूनं भावाच्या डोळ्यात पाहिलं. ते भकास आणि दीन वाटले.

" राधा बरी आहे ना ?"

राजू आनंदाची बातमी सांगायला धजावला नाही.

दोघंही गप्पगप्पच घरी पोचले.

" आलात का दोघं ? हे बघा, राजू पाणीसुद्धा न पिता तुम्हाला भेटायला बाहेर पडला. तुम्ही दोघं हात-पाय धुऊन घ्या तोपर्यंत मी वाढते."

मीनाक्षी म्हणाली.

राजू हातपाय धुऊन बाजेवर बसला. या घरात मी परका आहे ही भावना राजूचं मन पोखरू लागली. वहिनीनं हाक मारेपर्यंत तो स्वयंपाक घरात गेला नाही. जेवताना तिघंही बोलत होते पण त्यात आत्मीयता नव्हती की आनंद नव्हता.

नको म्हटलं तरी मीनाक्षी राजूच्या ताटात जास्त दही वाढायची, पण आज नको म्हणताच मीनाक्षी दही वाढायची थांबली. ते राजूच्या मनाला फार लागलं.

जेवून राजू बाहेर आला. मीनाक्षीनं शिवय्याला विचारलं, " तुम्ही लंगडताय का ? "

" पाणी ओढत असताना शेतात पडलो. " शिवय्यानी उत्तर दिलं.

राजू ऐकत होता.

भाऊनी हे मला का सांगितलं नाही ? खोटं का सांगितलं ? पाणी ओढण्याचं काम भाऊंनी का केलं ? नोकर कुठे गेला ? लाखो प्रश्न उभे राहिले. त्यानं विचारलं, " भाऊ मल्लय्या नोकर कुठे दिसत नाही तो ? काय झालं ? "

" त्याला कामावरून काढलंय. "

" का, काय झालं ? "

" आलेल्या पिकांवर दोघांचंही भागायचं नाही–"

राजू अवाक् होऊन भावाच्या तोंडाकडे पाहू लागला.

शिवय्या खाली बसले. दोर वळू लागले.

राजूच्या मनात आलं—आम्ही एका आईच्या पोटचे नाही आहोत, तरीही आम्ही भाऊ भाऊ आहोत. नोकरालाही कामावरनं काढून भाऊ शेतात राबतायत. मी फुकटचं खाऊन नावापुरती नोकरी करतोय—

मी श्रीमंताचा जावई आहे. म्हणूनच भावाला मदत करू शकत नाहीय. मी लहान राहिलो असतो, लहानशीच नोकरी केली असती. आणि त्या पैशांनी कर्ज फेडलं असतं तर बरं झालं असतं.

माझ्या हातात लाख रुपये आहेत तरीही भावाचं कर्ज फेडायला मी असमर्थ आहे.

लहान मुलाच्या हातात दहा पैसे दिले तर ते पटकन् काही ना काही विकत घेऊन खाऊन टाकतं. दहाची नोट दिली तर त्याला काही करता येत नाही.

माझ्या सासऱ्यानीही तसंच केलंय. दर महिन्याला शंभर-दोनशे रुपये मिळाले असते तर भावाला पाठवले असते. पण लाख रुपये मिळालेत. ते माझ्याही उपयोगाचे नाहीत की भावाच्याही उपयोगाचे नाहीत. त्या लाखातून ज्या दिवशी मी माझ्यासाठी काही खर्च करीन त्या दिवशी त्या घरातला माझाही मान कमी होईल. त्यामुळे माझं काही नुकसान होणार नाही. मी स्वतंत्र राहू शकेन पण त्यामुळे अनुराधेला दुःख होईल. ती बिचारी तिकडे आई-वडलांना सोडू शकत नाही इकडे नवऱ्यालाही सोडू शकत नाही.

मी स्वतः कुठल्याच उपयोगाचा नाही. काही करू शकत नाही. धड संपत्ती सोडू शकत नाही, धड भावाला मदत करू शकत नाही. माझ्यासाठीच भावाने जे कर्ज काढलं ते फेडू शकत नाही. कर्जात बुडालेल्या भावाला वाचवू शकत नाही

बी. एस. सी. चा अभ्यास करताना वाटत होतं — वहिनीच्या गहाण ठेवलेल्या बांगड्या सोडवून आणीन. त्या बांगड्या आता कर्जापोटी गेल्याच. आज मी त्या परत आणून वहिनीला देऊ शकत नाही. माझं जीवन इतकं निरर्थक का झालंय? याचं कारण काय? याला जबाबदार कोण? त्याचं अंतर्मन पुनःपुन्हा म्हणू लागलं—याला तूच जबाबदार आहेस. संपत्तीच्या मोहात पडून भावावर आणि वहिनीवर अन्याय करू पाहतोस.

मी अन्याय करतोय! मी अन्याय करतोय!

राजूच्या शरीराचा कण न् कण बंड करत होता. राजूला त्या घरात राहवेना नवी कापडं भावाच्या आणि वहिनीच्या हातात देववेनात.

राजू फार दुःखी होता. त्याची अक्कल चालेनाशी झाली होती.

" मी जातो भाऊ. वहिनी ! मी जातो–" म्हणून जाता जाता राधेच्या गरोदरपणाची बातमी त्याने सांगितली.

" वरदम ! तुला झालंय तरी काय ? ही किती चांगली गोष्ट आहे. ही सांगायची पद्धत झाली का ?" मीनाक्षी म्हणाली.

राजूला काही ऐकू येत नव्हतं. " वहिनी, माझ्या जीवनाची शिकार चाललीय. माझ्या जीवनात बरेवाईट याची शर्यत लागलीय. कुणाचा जय होईल सांगता येत नाही. मी जातो, वहिनी मी जातो."

राजू शहराकडे निघाला.

मीनाक्षी अवाक् झाली. राजूचं काय बिनसलंय ? राजू का इतका चिडलाय ? मीनाक्षीला काही कळेना.

अंधारात राजू घरी पोचला. " अंधारातून पायीच आलास ? " राजम्मांनी विचारलं.

राजू दोन-तीन दिवस वहिनीजवळ राहील अशी राजम्माची कल्पना होती. जेव्हा तो परत आला तेव्हा तिला वाटलं, बहुधा भावाभावांत काही भांडण झाल असेल; पुन्हा राजम्माला शंका आली– लाख रुपये तर भावाच्या हातावर ह ठेवून नसेल ना आला ? राजूच्या चेहऱ्यावर प्रसन्नता नाही, म्हणजे तसं काही झालं नसावं.

" बाहेरून पाय स्वच्छ धुऊन आलोय. तुमची लादी खराब नाही व्हायची. " असं म्हणत राजू वर निघून गेला.

त्या दिवशी अनुराधेनं किती विनवलं, किती आर्जव केली, पण राजू जेवला नाही. " मला एकटं राहू दे, " त्यानं सांगितलं.

दुसरे दिवशी लवकर उठून ऑफिसला गेला आणि संध्याकाळीही खूप उशिरा आला. राधेनं विचारलं तेव्हा राघवय्या म्हणाले, " राजू पाच वाजताच ऑफिसमधून बाहेर पडलाय."

राजू एकटा कुठेच जात नाही. काहीतरी बिनसलंय एवढं अनुराधेच्या लक्षात आलं.

" गावाहून आल्यापासून राजू असा हरवल्यागत वागतोय. इस्टेटीवरून गावी भांडण तर झाले नसेल ?" राजम्माने विचारलं.

" त्यांची ईस्टेट अशी किती आहे ? आई तू असं बोलू नकोस. " राधा आईला

म्हणाली.

" बरं पण आता राजू कुठं गेला असेल ड्रायव्हरला विचार बरं "

" मीच जाते " म्हणून राधा बाहेर पडली. नदीकिनाऱ्यावर गेली.

राजू तिथेच बसला होता. पुलाकडे पाहात होता. पुलाखालून वाहणाऱ्या प ाण्या वर त्याची दृष्ट स्थिर झाली होती. पुलापलीकडच्या शेतांकडे आणि बागांकडेही तो पाहात होता.

तो तिथेच जन्माला आला, वाढला. तिथेच त्याच्या व्यक्तिमत्त्वानं आकार घेतला. आता तो कोण आहे ? हा प्रश्न राजूच्या मनात होता. कोण आहे ? शिवय्यांचा भाऊ ? की राघवय्यांचा जावई ? त्यानं या दोघांपैकी कुणाशी कृतज्ञ राहावं ? आता तो कोण आहे ? कोणाचा आहे ? . . .कोणाचा आहे ?

राधेला पाहून राजू चमकलाच.

" राधा तू इथं कशी ? "

" मोटरनं आले. "

" मोटार दिसली; का आलीस हा प्रश्न आहे. "

" त्याचं उत्तर तुम्हीच द्या. " राधा म्हणाली.

" मी इथे आहे हे कुणी सांगितलं ? "

" माझ्या हृदयानं, ते नेहमीच तुमच्याजवळ असतं. "

" गार वारा वाहतोय. राधा ऊठ, घरी जाऊ. हे गार वारं तुला सोसणार नाही. "

" तुम्हाला सोसेल वाटतं ? म्हणून इकडे येऊन बसलात का ? "

" तू आता एकटी नाहीस. तुला आपल्या प्रकृतीची काळजी घ्यायला हवी. '

" तुम्ही काळजी घ्यायला नको का ? ही काळजी माझ्याबद्दल की येणाऱ्य वाळाबद्दल सांगा पाहू ! " राधेनं हसत विचारलं.

" तुझ्याबद्दलच. तुझ्यानंतर बाकी सगळे. " म्हणत राजूनं राधेचा हात धरला.

" आणि तुमची वहिनी ? "

'माझ्या जीवनात तुम्हा दोघींनाही महत्त्वाचं स्थान आहे.' असं राजू पूर्वी राधेला म्हणायचा. पण आज वहिनीचं नाव निघताच त्याचा चेहरा काळवंडला,

" चल राधा. " नवराबायको मोटारकडे वळले.

राधेची खात्री पटली– गावी नक्कीच काहीतरी घडलंय.

दोनतीनदा कारण विचारलं तेव्हा राजू म्हणाला, " मला काही विचारू

नकोस. वेळ आल्यावर मी स्वतःच सांगेन."

राघवय्यांचंही राजूकडे लक्ष गेलं. त्यांना वाटलं, एका ठिकाणाहून रोपटं उपटून दुसरीकडे लावलं की त्याची अशीच अवस्था होते.

दोन महिने गेले. शेवटी राजू एका निर्णयाशी येऊन पोचला. लाख रुपयांतून काही काढून भावाचं कर्ज फेडायचं. भाऊ आपल्या गावातच कर्जबाजारी झाल्यानं अपमानित होतोय. आता हे थांबवलं पाहिजे. कर्ज फिटल्यावर जी जमीन राहील ती भावाला आणि वहिनीला पुरेशी आहे. मी स्वतः नोकरी करून किंवा सासऱ्याच्या घरी राहून आपला निर्वाह करू शकतो.

राजूच्या डोक्यावरचा भार उतरल्यासारखं त्याला वाटलं. चेहऱ्यावर प्रसन्नता उमटली. हे काम लवकर झालं पाहिजे. भावाला कर्जमुक्त केलं पाहिजे.

मेचा शेवटचा आठवडा होता. ऑफिसात जास्त कामही नव्हतं. राजू दोन दिवसांसाठी गावी गेला.

राजम्माला वाटलं, यावेळी राजू इस्टेटीचा निर्णय करूनच शहरात येईल. गावाची कटकट जाईल.

" सुखानं जा. लाभानं या." राधा म्हणाली.

" मी काय व्यापार करायला जातोय की काय ? लाभानं या म्हणतेस ती ?" राजूनं विचारलं.

" ती एक म्हण आहे. तुम्ही भावाचा आणि वहिनींचा आशीर्वाद माझ्याही साठी घेऊन या." राधा विनयानं म्हणाली.

" वहिनीनं त्या दिवशीच आशीर्वाद पाठवलेत. पिकलेल्या फळासारखा मुलगा तिला हवा आहे."

राधेला खूप आनंद झाला. त्या आनंदातच तिनं राजूला निरोप दिला.

राजू सरळ गावी गेला. घरी पोचला तर चहूकडे भयानक शांतता नांदत होती. आत गेला तर पूर्णेचे कपडे जमिनीवर पसरून मीनाक्षी गुपचूप बसून होती.

" वहिनी–" राजनं हाक मारली.

" पूर्णा, पूर्णा तू आलीस ?" मीनाक्षी म्हणाली. त्याला असं वाटलं वहिनी वेडी होईल.

" वहिनी, मी राजू आलोय–"

" वरदम ! आलास बाळा ? पूर्णेचे कपडे अस्ताव्यस्त पडले होते ते आवरतेय."

"भाऊ कुठे आहेत?"

"ओटयावर नाहीत का? तर मग गोठ्यात गेले असतील."

गोठा रिकामा होता. तिथे फक्त एक अशक्त गाय आणि एक वासरू होतं.

शिवय्या गाईसमोर बसले होते. गाय मालकाचं डोकं हुंगत होती. जनावर किती विश्वास दाखवतं! माणूस मात्र विश्वासाला अपात्र ठरतो– राजूच्या मनात आलं.

'मी या कोटीतला रहाणार नाही.' राजूनं निश्चय केला.

"भाऊ–"

"राजू!" शिवय्या उठून उभे राहिले.

"गाई शेताहून आल्या नाहीत?"

"आता मी गाईंना शेतात पाठवत नाही. तिथे गवतही नाही. मी स्वतःच थोडंसं गवत घेऊन येतो. पेंड तर घरात आहेच."

"लाल गाय दिसत नाही ती?"

"विकून टाकली– घरात आम्ही दोघंच तर आहोत. दोन गायी ठेवून काय करणार?"

भावाच्या सांगण्यावर राजूचा विश्वास बसला नाही. कर्जाच्या बदल्यात कोणीतरी नेली असेल अशी शंका येऊन राजूचे डोळे अश्रूंनी भरले.

'भाऊ आजपासून तुमची अशी अवस्था रहाणार नाही. आता तुम्हाला आणखी अपमान सहन करावा लागणार नाही. हे जर मला आधीच सुचलं असतं तर अशी पाळी आली नसती.' राजू मनातच विचार करत होता.

दोघं भाऊ घरात आले तेव्हा मीनाक्षीनं काकडीचे काप आणि ताक दिलं.

त्या दिवशी गंभीरपणे कशाचाच विचार झाला नाही. दुसरे दिवशी राजूनं भावाला सर्व गोष्टी सांगितल्या.

शिवय्यांनी विचारलं, "राजू, तुझ्या सासऱ्याच्या पैशांनी मी माझं कर्ज कसं फेडू?"

"माझ्या नावावर पैसे आहेत. मी कर्ज फेडीन."

"ते ठीक आहे बाबा! जावई म्हणून सासऱ्यानी तुझ्या नावावर लाख रुपये ठेवलेत. ते पैसे अशा कामासाठी कधी खर्च करू नयेत. पैसा नसला तरी माणूस जिवंत राहू शकतो. विश्वास गमावून तर कधीच नाही." मीनाक्षीनं समजावलं.

भाऊ आणि वहिनी दोघंही राजूचं ऐकायलाच तयार नव्हते.

गावचा सरपंच भूषय्या याच्याकडे राजू गेला. भावाला समजावण्यात त्याची मदत मागितली.

राजू भूषय्याकडे जात होता तेव्हा वाटेत राजूचे जुने शिक्षक भेटले. ते म्हणाले, 'अरे राजू, तू शिकला सवरलेला आहेस. श्रीमंताचा जावई आहेस. पण ज्यांनी तुझं पालनपोषण केलं त्यांना तू वाऱ्यावर सोडलंस. आज तुझी वहिनी भिकारीण झाली आहे. कर्जाच्या ओझ्याखाली कुटुंब दडपलं गेलंय. तुला त्या वाड्यात झोप कशी लागते हेच मला कळत नाही."

दुसरा एकजण म्हणाला, "माणसाच्या म्हणजे श्रीमंताच्या शरीरातच विष असतं. राघवय्यांनी राजूला दंश केलाय. ते विष त्याच्या शरीरात भिनलंय. आता त्याला भाऊ कसा दिसेल ? वहिनी कशी दिसेल !"

"अरे वरदराजू, पिढ्यान् पिढ्या हे शेत तुमच्या घराण्यात होतं. तुझा भाऊ ते विकतोय. यात तुझं काय भलं होणार आहे ? लक्ष्मीसारखी लाल गाय जेव्हा सावकार कर्जापोटी ओढून नेत होता तेव्हा तुझ्या वहिनीच्या डोळ्यातून अश्रू गळले नाहीत, रक्त गळलं."

राजूला लोकांचं बोलणं ऐकवेना. तो घाईघाईनं सरपंचाच्या घरी गेला. "भूषय्या, मी तुमची मदत मागायला आलोय. तुम्हाला माझ्याबरोबर माझ्या घरी यावं लागेल."

राजूनं सर्व हकीकत सांगितली. "शिवय्याच्या कणाकणातून सच्चेपणा आहे राजू ! तुझे सासरे म्हणतील धाकट्या भावाला फुसलावून मोठ्या भावानं पैसा गडप केला. ते केसही करू शकतील. तुझा पगार निश्चित ठरला असता तर त्यातून तू कसाही खर्च करू शकला असतास. यावरून असं वाटतं की तुझ्या सासऱ्यांनी जाणूनबुजूनच ही व्यवस्था केलीय. तू सासऱ्यांची परवानगी घेतलीस तर बरं होईल." असा भूषय्यांचा सल्ला होता.

"तुम्ही आधीं भाऊंचं मन वळवा. पुढचं मी पाहून घेईन. हे सगळे पैसे, माझं शिक्षण, माझं लग्न यासाठीच खर्च झालेत. शेत विकून, घर विकून माझ्या भावानं हाल काढावेत हे मला सहन होत नाही."

"मी आपलं माझं मत सांगितलं. तरी पण मी तुझ्या घरी येईन. भावाला समजावून देईन." भूषय्या कबूल झाला.

भूषय्या घरात गेला, राजू जरा मागे रेंगाळला.

"ऐकलं की तुमचा भाऊ राजू आलाय. सहज राजूला भेटायला आलो.", भूषय्या म्हणाला.

इतक्यात राजूही आत आला. "तुझ्याचबद्दल बोलणं चाललं होतं राजू. अगदी शंभर वर्षं आयुष्य आहे तुला." भूषय्या म्हणाला.

थोडा वेळ इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्यावर भूषय्यानं स्वतःच विषय काढला.

"वरदराजू हे बघ, तू श्रीमंताचा जावई आहेस. नोकरी करतोयस. पण तू आपल्या भावाला गाव सोडायच्या स्थितीला आणून पोचवलंयस."

"त्याचसाठी मी इथं आलोय. आपण मदत करा. मध्यस्थी करून ज्यांचे जेवढे पैसे फेडायचेत ते फेडून टाका, मी आपल्या हाती पैसे देऊन जातो." राजू म्हणाला.

"शिवय्या, मग कसली काळजी ? शेत विकायच्या गोष्टी कशाला करतोस ? कुबेरासारखा भाऊ आहे. कर्ज फिटलं तर काही प्रश्नच उरणार नाही."

"जर असा प्रश्न सुटला असता तर मी तरी गाव सोडायचा विचार कशाला केला असता भूषय्याजी ? पैसा राजूचा नाही. राजूचा असता तर मी अवश्य घेतला असता. पैसा राघवय्यांचा आहे."

"पैशावर राघवय्याचं नाव लिहिलेलं नाही. तुझा भाऊ देतोय, तू घेतोयस. यापेक्षा जास्त खोलात जायची तुला जरूर नाही."

"तुम्ही मोठे आहात. तुम्हाला सगळं ठाऊक आहे. तुमचं मी ऐकणार नाही असंही समजू नका. मी दुसऱ्याच्या पैशानी शेत सोडवून घेतलं तरी त्याचा उप-भोग कोण घेणार ? आम्ही नवराबायको दोघंच आहोत. कुठे ना कुठे आम्हाला दोन वेळचं जेवण मिळेलच.

"जर राघवय्या उदार असते तर त्यानी स्वतः पैसे देऊन राजूला पाठवलं. असतं. दुसऱ्यासमोर हात पसरणं मला योग्य वाटत नाही."

"तरी पण तू पुन्हा एकदा विचार करून पाहा." म्हणत भूषय्या उठला.

राजू भूषय्याबरोबर काही अंतर गेला. त्यानं भूषय्याला विनंती केली, "काही दिवस तरी जमीन विकली जाणार नाही एवढी तुम्ही व्यवस्था करा. पुढे मी काही ना काही व्यवस्था करतो."

"राजू, जमीन विकायला तुझी सही लागेल. तू लवकर प्रयत्न कर आणि भावाला ऋणमुक्त कर. तुझ्या वहिनीचं ऋण फेडणं कठीण आहे. तुझ्यासाठी तिनं आपल्या सर्वस्वाचा होम केलाय."

9

राजू शहरात परत गेला. पैसे बँकेत भरून टाकले. गावात काय झालं ते शहरात कुणाला कळलंही नाही. राजम्मा वगैरेना वाटलं गावी दोन दिवस राहून आलाय.

एक महिना आणखी उलटला. राधेचं डोहाळेजेवण झालं. राजम्मानं शिवय्या आणि मीनाक्षीला बोलवणंही पाठवलं नाही. ती म्हणाली, " हालात असताना ते आता कसले येतात ? "

राजम्माचं वागणं राधेला मुळीच आवडलं नाही. राजूलाही फार वाईट वाटलं. राधेनं आपल्या आईला दोष दिला.

राजम्मा आपल्या तोलाच्या लोकांतच मिसळायची, त्यामुळे शहरात कुणी राजम्माच्या अशा वागण्याकडे फारसं लक्ष द्यायचं नाही.

समारंभ संपताच अनुराधा आपल्या नवऱ्याजवळ आली; त्याच्या पायाला हात लावून नमस्कार केला. राजूनं राधेला वर उठवलं, बाहुपाशात घेतलं. तिच्या कपाळाचं चुंबन घेतलं. राधेनं राजूचे दोन्ही हात धरले. आपल्या आईच्या वतीनं त्याची क्षमा मागितली, " माझ्या आईने हे काही चांगलं केलं नाही. मला कल्पना असती तर मी स्वत: जाऊन ताईना बोलावून घेऊन आले असते. अजूनही काही हरकत नाही. तुम्ही चला. आपण दोघं गावी जाऊन ताईंचा आशीर्वाद घेऊन येऊ. "

" राधा आता नदी पार करून ओलांडून तिकडे जाणं कठीण आहे. ही वेळ जाऊ दे. मी वहिनीलाच इकडे बोलावून आणीन. जे झालं ते झालं. ठीक आहे. तू हे विसरून जा. आपल्या प्रकृतीला जप. " राजू म्हणाला.

आषाढ लागला. वीस एक दिवस गेले. ढग इकडे तिकडे फिरत होते. राहून राहून मुसळधार पाऊस पाडत होते. शहरातल्या सर्व गल्ल्यांतून पाणी तुंबलं होतं. असं वाटत होतं की या वर्षी खूप पाऊस पडेल.

त्या दिवशी रविवार होता. खूप पाऊस पडत होता. राघवय्या आणि राजू हॉलमधे बसून गप्पा मारीत होते. राघवय्यांनी शेती आणि पीकपाण्याचा विषय काढला.

" राजू तू शेतकऱ्याचा मुलगा आहेस. हा पाऊस शेतीवाडीला उपयोगी आहे की नाही सांग बघू ? "

" तुम्हा शहरातल्या लोकांना जेवढं माहिती आहे तेवढंच मलाही माहीत आहे. "

" चांगलं खत घालून चांगलं बियाणं पेरलं तर पीक आपोआपच वाढतं. पण ते पीक पोत्यात भरून केव्हा आणि कसं विकायचं हे कळायला हवं. " राजूला वाटलं, भावाच्या कर्जासंबंधी राघवय्यांशी बोलावं.

एवढ्यात नोकर कॉफी आणि खाणं घेऊन आला. राधा आणि राजम्माही तिथंच आल्या. गप्पांचा ओघ बदलला आणि मुलांच्या पालनपोषणाकडे वळला.

" आता किती दिवस राहिलेत ? तीन महिन्यांत पोरगं आजोबांचं नाक धरील." राजम्मा म्हणाली.

" बघ राधा, तुझ्या आईला वाटतंय मुलगाच होणार " राघवय्या म्हणाले.

" मी पण राजूला तसंच वचन दिलंय." राधा म्हणाली.

" पण मला मुलगी आवडते." राजू हसत म्हणाला.

" एक मुलगा आणि एक मुलगी, दोन्ही व्हावं म्हणजे सगळ्यांच्या मनासारखं होईल " सगळे हसले.

एवढ्यात भरैय्यानं येऊन सांगितलं की गावाहून कोणीतरी आलंय. राजू त्या माणसाला भेटून आला. म्हणाला, " मला भाऊनी उद्या गावी बोलावलंय."

" एवढ्या पावसात माणूस पाठवायची काय गरज होती ? " राजम्मानं विचारलं.

" तो दुसऱ्या कामासाठी आला होता."

" जरा वेळ थांबून गेला असता तर बरं झालं असतं. फारच पाऊस पडतोय " राधा म्हणाली.

" गावच्या लोकाना पाण्यात काम करायची सवय असते. शिवाय हा पाऊस काही लवकर थांबणारा नाही."

राजम्माला शंका आली, राधेचं म्हणणं ऐकून राजू त्या माणसाला परत बोलावील.

सकाळी ऊन पडलं. राजू संध्याकाळपर्यंत शहरात परत येण्याचं कबूल करून गावी जायला निघाला.

राधा फाटकापर्यंत आली. नवऱ्याला निरोप दिला. गाडी निघून गेली. खूप चिखल झाला होता. मोटार पुढे जाईना तेव्हा राजूनं गाडी थांबवली. सूटकेस आणि छत्री घेऊन तो उतरला. ड्रायव्हरला त्यानं सांगितलं, " तू उद्या सकाळी ये. मी रात्रीच परत आलो तर निरोप पाठवीन."

मोटार परत गेली.

राजू पायी चालू लागला.

दोन पावलं गेला न गेला तोच पुन्हा पाऊस कोसळू लागला. राजू घरी पोचेपर्यंत वादळ सुरू झाल्यागत वाटू लागलं.

"एवढ्या पावसात कसा आलास राजू ?" शिवय्यानी विचारलं.

"तुम्ही बोलवलं होतंत."

"मीनाक्षी, पाणी आण बरं."

"सगळे कपडे भिजले की."

वाऱ्यामुळे छत्रीचा उपयोग झाला नाही. सगळी गावं बदलतायत. आपलं गाव मात्र चिखलानं भरलंय.'' राजू म्हणाला.

"तू मोठा झालायस – गावासाठी डांबरी रस्ता बांधून दे. मगळे तुझं नाव काढतील." मीनाक्षी म्हणाली.

मीनाक्षी गरम दूध आणायला आत गेली.

"राजू दस्तऐवज वगैरे लिहायचं सगळं काम पूर्ण झालंय. तुझी सही हवीय." शिवय्या म्हणाले.

"मला जमीन विकावीशी वाटत नाही."

शिवय्या अवाक् झाले. त्यांना वाटलं राजू जमीन विकायला विरोध करणार नाही. सहाशे रुपये आगाऊ घेतले होते. आता गावात बदनामी होईल.

"आपल्याला जमीन आणि घर विकायची जरूरच काय ? ही आपली वडिलार्जित संपत्ती आहे." राजू म्हणाला.

"मग तूच खरेदी कर. आता मला हे थांबवता येणार नाही. मला या जमिनीचा मोह नाही. खूप विचार करून मी हा निर्णय घेतलाय.

"राजू वादळासमोर आपल्याला डोकं खाली वाकवणं भागच पडतं. आपण एक ठरवतो; देव दुसरंच काही करतो. आता आपल्या घरात आहे कोण ? माझ्या सावलीसारखी तुझी वहिनी आहे. लग्नाच्या वेळी मी तुझ्या वहिनीला वचन दिलं होतं की मी तुझा भार वाहीन. ते निभावण्यासाठीच हा प्रयत्न आहे.

'राजू मी जीवनाची लढाई हरलोय. ठेचावर ठेचा खाल्ल्यात. या गावातून बाहेर पडून आपल्या जीवनाचा मार्ग बदलायची इच्छा आहे माझी. तसं झालं तरच मला जरा स्वस्थता मिळेल. जर ही जमीन वाचवायची असेल तर वाचव. आपल्या मुलांतला एक तरी मुलगा चांगला निघाला हे पाहून बाबांना स्वर्गात आनंद होईल."

राजू अतिशय भडकला.

"राजू ही भडकण्याची वेळ नव्हे. कर्ज तर फेडलंच पाहिजे. ती शक्ती तुझ्या गरीब भावामध्ये नाही. तू श्रीमंतीत आहेस, पण कर्ज फेडण्याची शक्ती तुझ्यातही नाही. नशिबानं आपल्याला साथ दिली नाही. सगळं काही विकण्याशिवाय दुसरा काही उपाय नाही.'' शिवय्या म्हणाले.

"तुला जर आपला हिस्सा विकायचा नसेल तर तसंही होईल. तुझ्या सासऱ्यांच्या लाखोंच्या संपत्तीत आणखी काही शेकड्यांची तू भर घाल. तुझे भाऊ आपला हिस्सा विकून कर्ज फेडतील. कर्ज पूर्णपणे फिटणार नाही. लोक शिव्या देतील. ठीक आहे. असंही होईल." दुधाचा ग्लास घेऊन येता येता मीनाक्षी म्हणाली.

"म्हणजे वहिनी तूही असंच समजतेयस– मी जमीन गडप करायला आलोय म्हणून ? तुला असं वाटतं का की तुझा राजू तुझ्या कृपेनं मोठा होऊन वहिनीला आणि भावाला घराबाहेर काढील ? वहिनी, मी अगदी कमनशिबी आहे. ज्या घरात मी दूध प्यालो त्याच घरात आज विष पितोय."

राजूचा गळा दाटून आला. त्यानं दोन्ही हातांनी आपलं तोंड झाकून घेतलं.

मीनाक्षी दोन मिनिटं गप्प उभी राहिली. मग स्वयंपाकघरात निघून गेली. कुणीतरी हाक मारली म्हणून शिवय्याही बाहेर गेले.

दुपारच्या जेवणाच्या वेळी राजूनं पुन्हा विषय काढला.

"भाऊ मला लवकर शहरात जायचंय. तुम्ही माझी सही घ्या. काम लवकर पूर्ण करा."

"आज पूर्ण होणार नाही. लोक उद्याच येणार आहेत."

राजूला त्या घरात राहायची इच्छा नव्हती. तो पावसाकडे पाहू लागला.

संध्याकाळपर्यंत पाऊस कमी झाला. लोकांची इकडे तिकडे ये-जा सुरू झाली. राजू नदीच्या किनाऱ्यापर्यंत गेला.

एका शेतकऱ्यानं विचारलं, "राजू, जवळ राहून जमीन विकतोयस ? नाहीतर तूच खरेदी कर ना !"

राजूच्या अंगाची आगहोळी झाली. "बरं, मीच खरेदी करीन," म्हणून तो परत आला.

ही बातमी गावभर वाऱ्यासारखी पसरली. गावातल्या सगळ्या लोकांना शिवय्याची कीव आली. ते म्हणू लागले– 'बिचारा भावासाठी धुळीला मिळाला.'

राजूनं त्या बोलण्याची पर्वा केली नाही. स्वतः वहिनीच जर भ्रमात आहे तर इतर लोकांची गोष्टच कशाला ?

पुन्हा आकाशात हत्तीएवढे ढग जमू लागले. रात्री पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली.

नदी दोन्ही काठांना लागून वाहात होती. पाणी लालभडक होतं. आदल्या वर्षी अवर्षण होतं. या वर्षी आषाढातच एवढा पाऊस !

राजू घरी पोचतो तो अंधार पडला होता. मीनाक्षीनं दिवा लावला. तिला पाहून राजूला लहानपणी ऐकलेली ब्रह्मराक्षसाची गोष्ट आठवली. त्याला भीती

वाटली. असं वाटलं की दिवा तिथून हलवावा.

सारं बालपण राजूच्या डोळ्यासमोर उभं राहिलं.

उद्यापासून या गावाशी माझा काही संबंध रहाणार नाही. पूल ओलांडायची काही आवश्यकता राहाणार नाही असं त्याच्या मनात आलं. अनुराधा, आपली नोकरी, समाजातली प्रतिष्ठा; सगळं आठवलं.

आतापर्यंत मी दोन होड्यांतून प्रवास करतोय. कोणत्याही दडपणामुळे दोरी तुटली की नदीत बुडणं निश्चित आहे. या दोन्ही नावा समांतर नाहीयेत. दोन्हींवर पाय ठेवून मला पुढे जाता येणार नाही. एकीला सोडावंच लागेल. परिस्थितीच मला त्या दिशेनं ढकलते आहे.

वाऱ्यानं केव्हातरी दिवा विझला. "लवकर उठून जेवणं उरकाल तर बरं होईल. पाऊस वाढला तर स्वयंपाकघरात बसून जेवणं कठीण जाईल. सगळी-कडे गळतंय" मीनाक्षी म्हणाली.

"राजूला दिवा दाखव. अंधार आहे" शिवय्या म्हणाले.

"हळूच आत या. स्वयंपाकघरात छोटासा दिवा आहे. वारा लागला तर तोही विझेल. कंदिलाची काच फुटली आहे." मीनाक्षीनं सांगितलं.

"काच फुटली?"

"दोघं भाऊ बसल्या बसल्या झोपलात काय? काच फुटल्याचा आवाज नाही ऐकू आला?" मीनाक्षी गमतीनं म्हणाली.

कसंबसं दोघांचं जेवण उरकलं. स्वयंपाकघरभर गळत होतं.

जेवणानंतर मीनाक्षीनं नवऱ्यासाठी आणि राजूसाठी दूध आणलं.

"आता दूध कशाला वहिनी?"

"राजू मला तुझी सवय ठाऊक आहे."

शिवय्या दूध प्याले नाहीत. ग्लास हातात घेताच शिवय्याना पूर्णेची आठवण यायची.

राजू आडवा झाला. वाटलं, कुठेतरी वीज पडली. मुसळधार पाऊस कोसळत होता. सोसाट्याचा वारा वाहात होता.

मीनाक्षी दार बंद करून पडली. बाहेरून हाक ऐकू आली,

"बाबू! राजूबाबू! छोटे बाबू!"

एवढ्या रात्री माझ्याकडे कोण येणार– राजूला शंका आली. त्यानं विचारलं,

"कोण आहे?"

"मी आहे वेंकटनायुडू ड्रायव्हर."

राजू उठला. त्यानं विचारलं, "एवढ्या रात्री कसा आला? घरी सगळे बरे

आहेत ना ? "

" छोटे बाबू, तुम्ही लवकर शहरात यायला हवं. राधाराणींची प्रकृती बिघडलीय. डॉक्टर आलेयत. नर्सेसची धावपळ चालली आहे. सगळे घाबरलेयत."

" वहिनी "– राजूनं हाक मारली.

मीनाक्षी बाहेर आली. म्हणाली, " गळतंय का ? छप्पर खराब झालंय."

राजूच्या समोर दुसरी व्यक्ती उभी होती. मीनाक्षीनं विचारलं, " राजू हे कोण ? "

ड्रायव्हरनं सर्व हकीकत सांगितली.

" वहिनी मी जातोय."

" छत्री घेऊन जा." शिवय्या म्हणाले.

" त्याची काही जरूर नाही."

" मोटार आली आहे का ? मीनाक्षीनं विचारलं.

" पुलावरून इकडच्या बाजूला उतरताच गाडी थांबली. रस्त्यात गुडघाभर पाणी आहे." नायुडू म्हणाला.

" मीपण येतो." शिवय्या तयार झाले.

" भाऊ तुम्ही येऊ नका." राजूनं विनवलं.

" पाऊस पडतोय. पाय घसरतील. शिवाय सापही असतील."

" सकाळपर्यंत राधेच्या प्रकृतीबद्दल कळव." मीनाक्षीनं सांगितलं.

राजू चालला होता. मीनाक्षी उभी होती. ती संपूर्ण भिजली. मोठ्या मुष्किलीनं शिवय्यांनी मीनाक्षीला घरात आणलं.

10

ढग जखमी वाघासारखे गर्जना करत होते. वाऱ्याशी हाणामारी करून नदी रक्त ओकत होती. झाडं धडाधड पडत होती. विजा जोरजोरात चमकत होत्या.

दोन पावलं पुढे गेलं की वारा चार पावलं मागे ढकलत होता. मोठ्या मुष्किलीनं दोघं मोटरपर्यंत पोचले.

" नायुडू ! गाडी वेगानं चालव." राजू म्हणाला.

पाणी पुलावरूनही वाहात होतं. ब्रेकवर पाय ठेवून नायुडू सावकाश काळजी-

पूर्वक गाडी चालवू लागला. तो म्हणाला, "एका तासात पोचलो तरी खूप आहे."

मोठ्या मुष्किलीनं गाडी पुलाच्या उंचवट्यावर चढली. ड्रायव्हर जपून जपून इंचाइंचानं गाडी चालवत होता.

राजू गाडीत बसला होता, पण त्याचं सारं लक्ष अनुराधेकडे लागलं होतं. 'सात महिनेही पूर्ण झाले नव्हते. सकाळी मी घरून निघालो तेव्हा तर तिची प्रकृती बरी होती.

मूल नाही वाचलं, आई वाचली तरी खूप आहे! सातव्या महिन्यातलं मूलंही वाचू शकतं.

राधा वाचली तर आपल्याला सर्व काही मिळालं. परमेश्वरा! राधा हा तुझा प्रसाद आहे. माझ्यासारख्या पामराला मिळाला आहे. तिला वाचव.' राजूनं देवाला नमस्कार केला.

मोटारच्या खाली पाणी? कसलं पाणी हे? प्रलयकाल तर जवळ आला नाही ना?

मी अनुराधेजवळ राहायला पाहिजे होतं. ती जीवनाशी झगडते आहे. तिच्या-जवळ पोचण्यासाठी मी झगडतोय. देवा रे, मी राधेला कधी भेटेन? मोटार कधी पूल ओलांडील?

एकाएकी कार थांबली. राजूचं तोंड पुढच्या सीटवर आपटलं.

"नायुडू काय झालं? घर आलं का?"

"केसभराच्या अंतरानं आपल्या दोघांचे प्राण वाचले."

"म्हणतोस काय?"

"समोर बघा."

मोटारच्या दिव्याच्या उजेडात दिसलं– पूल मोडला आहे.

"आता काय करायचं?"

"आपण मोटार सोडून मागे जाऊ. तिकडेही पूल मोडण्याची शक्यता आहे. मोटार गंगानदीत बुडून जाईल. आपल्याला ती मागेही नेता येणार नाही."

"शहरात कसं पोचणार?"

"उजाडल्यावरच त्याचा विचार करावा लागेल."

वेंकट नायुडू चाक सोडून खाली उतरला.

राजूनं त्याचं अनुकरण केलं. म्हणाला "पोहता आलं असतं तर नदी पार केली असती."

"यावेळी नदी पार करता येईल का?"

दोघं चालत होते. कुठे जात होते कोण जाणे! एवढ्यात वीज चमकली. त्या

प्रकाशात काही घरं दिसली.

"आपण गावात पोचलो." राजू म्हणाला.

दोघं घाईघाईनं पुढे गेले. ती घरं कोळ्यांची होती. कोळी घरात बसले होते. त्याच्या घरासमोर छोटयाछोटया होडया होत्या.

राजू खूष झाला. त्याला वाटलं, देवानंच आपल्याला इकडे पाठवलं, त्यानं हाक मारली.

"तुम्ही कोण आहात? एवढया रात्री एवढया पावसात कसे आलात? आमच्या घरात बसायलाही जागा नाही. त्या तिकडे ब्राह्मणांची घरं आहेत, तुम्ही तिकडे जा."

"आम्हाला झोपडीत जागा नकोय. होडीतून नदी ओलांडायची आहे."

राजूचा आवाज ओळखून एकजण बाहेर आला. तो जोगडु होता.

"वरदराजू, तू कसा काय आलास?"

"हेच तुझं घर का जोगा?"

एवढ्यात पुन्हा वीज चमकली.

"एवढया पावसात नदी कशी पार करणार?" एका म्हाताऱ्यानं विचारलं.

"जोगा, मला मदत कर. नदीच्या त्या काठाला पोचवून दे." राजूनं विनवलं.

"पूल आहे ना?"

"पूल मोडलाय. माझी मोटार पुलाच्या मध्यावर सोडून द्यावी लागली आहे."

राजूनं सारी हकीकत सांगितली. "काहीही करून मला राधेजवळ पोचलं पाहिजे."

"बरं मी प्रयत्न करतो." जोगडु कबूल झाला. उजाडेपर्यंत पाऊस जरा कमी झाला. पूल मोडल्याची बातमी गावात पसरली. मीनाक्षी आणि शिवय्या रडत रडत पुलाजवळ आले. पुलावर गाडी दिसली. 'बायकोची प्रकृती बिघडली म्हणून राजू रात्रीच शहराकडे जायला निघाला होता.' ही बातमी गावात पसरली.

ते गावातही आले नाहीत. कुठे दिसतही नाहीत. दोघांचं झालं काय, याचं सर्वांना कुतूहल होतं. सगळे लोक पुलाजवळ आले.

त्याचवेळी नायुडू, राजू आणि जोगडु एक लहानशी होडी पुलापाशी घेऊन आले.

शिवय्यानी विचारलं, "हे काय?"

"नायुडूनं होडी मिळवलीय. आम्ही आता नदी पार करणार आहोत."

"मी नाही जाऊ द्यायची." मीनाक्षी जवळ आली.

"वहिनी, यावेळी मला क्षमा कर." राजूनं हात जोडले. राजूनं जोगडूकडं पाहिलं.

" चढ राजू. मेलो तर आपण दोघं मिळून मरू." जोगडु म्हणाला.

" मी काय करू ?" नायुडूनं विचारलं.

" तुला वल्ही मारता येतात का ?" जोगानं विचारली.

" नाही."

" मग तू इथं रहा. "

नाव नदीतून पुढे सरकली.

मीनाक्षी हात जोडून देवाची प्रार्थना करू लागली.

नदीकाठावरून धावत धावत राजू घरी पोचला. शहराची स्थिती वाईट होती. झाडं पडली होती. दिव्यांचे खांब जमिनीतून उखडून पडले होते.

पाऊस कोसळतच होता. राजू धावत घरात गेला. कपडे चिखलानं भरले होते.

सारं घर शांत होतं. त्या शांततेनं राजू भयभीत झाला.

'राधा, राधा' त्यानं जोरात हाक मारली; पण आवाजच फुटला नाही. खोलीतून एकाएकी रडण्याचा आवाज ऐकू आला. डॉक्टर खिन्नपणे राजूसमोरून बाहेर निघून गेले.

" राधा –" किंकाळी फोडून राजूनं राधेच्या शरीरावर स्वत:ला झोकून दिलं.

" रात्रभर ती तुझ्या नावाची जपमाळ घेऊन बसली होती आणि तू आता आलास राजू ?" राजम्मा रडत होती.

राजू काही बोलला नाही. त्याला काही ऐकू येत नव्हतं. राजम्माला आवरणं कठीण झालं. राघवय्या खोलीतच बसून राहिले. सगळे नातेवाईक आले.

सगळी क्रियाकर्म झाली. राजू एकटाच राहिला. घरात लोकांची गर्दी होती. सगळे राजम्माचं सांत्वन करीत होते. राजूकडे कोणी लक्षच दिलं नाही, राजूचं आपलं असं कोणी आता त्या घरात नव्हतं.

दोनतीनदा राजूला कुणीतरी जेवणासाठी हाक मारली. कुणीतरी जेवण खोलीत आणून ठेवलं.

राजू राधेच्या फोटो समोर बसला होता. त्याच्या दु:खाला पारावार नव्हता.

मीनाक्षी आणि शिवय्या दोघं आले. जावयाकडे कोणीचं लक्ष देत नव्हतं. त्या घरात; तर मीनाक्षी आणि शिवय्याकडे कोण लक्ष देणार? तेही दोन दिवस राहिले. राजूची मुलगी वेगळ्या खोलीत होती. ही गोष्ट मीनाक्षीला कळली. नर्सला सांगून ती आत गेली. मुलीला पाहून मीनाक्षीला भडभडून आलं.

ही मुलगी राजूची आहे हे मनात येऊन मीनाक्षी स्वत:ला आवरू शकली नाही. मुलीला उचलण्याचा तिनं प्रयत्न केला पण नर्सनं अडवलं.

मीनाक्षी राजूजवळ गेली, म्हणाली, " बारावं झालं की तू गावी निघून ये."

" वहिनी, मला येता येणार नाही."

" मुलीकडे लक्ष दे. आता ही मुलगीच राधा समज !" मीनाक्षीनं सल्ला दिला.

राजूनं अजूनपर्यंत मुलीला पाहिलंच नव्हतं. मीनाक्षीचा सल्ला ऐकल्यावर त्याला शुद्ध आली. मुलीच्या खोलीत गेला.

नर्सला जेव्हा कळलं की राजू हा मुलीचा बाप आहे तेव्हा ती त्याला अडवू शकली नाही. राजूचं खोलीतलं बोलणं ऐकून तिला शंका आली—राजूला वेड तर नाही लागलं ?

राजम्मा दोनतीनदा येऊन मुलीच्या प्रकृतीची चौकशी करीत असे. " हे इथं कसे आले ?" असं तिनं विचारल्यावर नर्सनं सांगितलं की ते मुलीचे वडील आहेत, नेहमी मुलीशी काहीतरी बोलत असतात.

हळूहळू राजूच्या येण्यानं नर्सला सुटका मिळू लागली. मुलीचा भार त्याच्या-टाकून नर्स खुर्चीवर बसून झोपू लागली.

राजू जेवणखाण, झोप सगळं विसरला. त्याच खोलीत भिंतीला टेकून बसायचा, तसाच झोपायचा, तसाच जागायचा.

अर्ध्या रात्री राजूनं नर्सला जोरानं हाक मारली. लगेच डॉक्टरला फोन गेला, डॉक्टर आले. राघवय्याही डॉक्टरबरोबर आले. डॉक्टरानी मुलीला पाहिलं, पांढऱ्या कपड्यानं तिचा देह झाकून बाहेर निघून गेले. म्हणाले,

"राघवय्या, मला फार वाईट वाटतं, मी आईलाही वाचवू शकलो नाही आणि मुलीलाही ! "

राघवय्या स्तब्ध उभे राहिले. राजू समजला. मुलीचं शव मांडीवर घेऊन रात्रभर बसून राहिला.

छोटी राधाही गेली.

मुलीला नेल्यानंतर राजू बाहेर आला. बागेतल्या झाडाझुडपांकडे त्यानं पाहिलं. कुत्र्याकडे पाहिलं. कुत्रा राजूजवळ आला. राजूनं त्याच्या डोक्यावर हात ठेवला— थोडा वेळ उभा राहिला.

राघवय्या वरच्या मजल्यावरच्या खोलीतून बाहेर आले. राजूकडे पाहिलं. दोघांची नजरानजर झाली आणि राघवय्या आत निघून गेले.

राजूनं घर सोडलं. नदीच्या काठी गेला. नदी पूर्ण भरून वाहात होती. मोडका पूल समोर दिसत होता. त्यानं पुलाकडे, आपल्या गावाकडे पाहिलं. इकडे शहराकडे पाहिलं.

' संकटात जमिनीवर पाय घट्ट रोवले पाहिजेत ' राधेचे शब्द आठवले.

" राधा, मी तुझी आज्ञा पाळीन."

एवढ्यात गाडीचा आवाज ऐकू आला. नायुडू राजूजवळ आला. त्याच्या हातात एक पाकीट दिलं.

'राधेनं तुझ्यावर आणि आमच्यावर अन्याय केला. ती निघून गेली.

'तुला या घरात आणलं त्यावेळी मी खूप खूप विचार केला होता. तुला सुखी करीन. मोठा करीन. राधेशी तुझं लग्न लावून देऊन मीही सुखी होईन.

'पण माझ्या नशिबात हे सारं लिहिलेलं नाही. तू ही संपत्ती, हे घर सोडून जेव्हा घरातून बाहेर पडलास तेव्हा तुला थांबवूही शकलो नाही.

'राधा आपल्या दोघांत मोठी दरी निर्माण करून गेली आहे. तू समोर आलास की मी राधेला विसरू शकणार नाही. आणि तिला विसरल्याशिवाय मी जगू शकणार नाही.

'तुझेच स्वत:चे पैसे आहेत, मी पगार काय देणार असं समजून मी तुला काही दिलं नाही. जे दिले त्यातून तू एक पैसाही घेतला नाहीस. तुझ्या स्वाभिमानाचा मी मान राखतो.

'मी तुला असाच सोडला तर राधा मला क्षमा करणार नाही. या पंचवीस हजारातून काही उद्योग सुरू कर. माझ्या सांगण्याचा मान ठेव.'

पत्र आणि बँकेचा चेक दोन्हीही राजूनं पुन्हा पाकिटात ठेवले. नायुडूच्या हाती परत दिलं. सांगितलं,

"नायुडू त्याना सांग, त्यांचे आशीर्वादच मला पुरे आहेत."

नदीवर नावेत जोगडु बसला होता. पाण्यात जाळं फेकत होता.

"जोगा, जोगा !" राजूनं मोठ्यानं हाक मारली.

जोगडूनं राजूकडे पाहिलं.

जोगडु जवळ आला. त्यानं विचारलं, "वरदराजू, तू कोण आहेस ? शिवय्याचा भाऊ की राघवय्यांचा जावई ? मीनाक्षीचा दीर की राधेचा पती ?"

"जोगा, मी फक्त वरदराजू आहे !"